रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | शुक्रवार । दि. २ ऑक्टोबर २०२६ । अंक ११६ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## आता दस्तनोंदणीसाठी आधार अनिवार्य!

**मुंबई :** कोणत्याही दस्त नोंदणीसाठी आता आधार ओळखपत्र महसूल विभागाने अनिवार्य करण्यात आले आहे. आधार नसेल तर दस्तनोंदणी होणारच नाही, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले. १ ऑक्टोबरपासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. मालमत्ता खरेदी विक्रीतील फसवणूक टाळण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून हा निर्णय घेण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.बावनकुळे म्हणाले, राज्य शासनाच्या महसूल विभागांतर्गत काम करणाऱ्या नोंदणी व मुद्रांक पान २ वर

## सुरेश वराडे यांचे निधन



**अलिबाग :** महाराष्ट्र पोलीस सेवेत उत्कृष्ट कामगिरी बजावणारे निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त सुरेश वराडे यांचे गुरुवारी (दि. १) अकस्मात निधन झाले. सुरेश वराडे अलिबागसह रायगड जिल्ह्यातील पोलीस दलात कार्यरत होते. त्यांनी जिल्हा पोलिसांच्या वाहतूक शाखेचा कारभार सांभाळला होता. त्याचबरोबर जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी असणाऱ्या अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक म्हणून त्यांनी उत्तम काम पाहिले होते.

# विद्यार्थ्यांवर काळाचा घाला

## दिवेआगरच्या समुद्रात आळंदीचे आठ जण बुडाले

## पाण्याचा अंदाज न आल्याने भीषण दुर्घटना



समीर रिसबूड/मकरंद जाधव

। श्रीवर्धन ।

पुणे जिल्ह्यातील आळंदी येथून दिवेआगर समुद्रकिनारी पर्यटनासाठी आलेल्या विनर्स अॅकॅडमी फॉर ११ अँड १२च्या विद्यार्थ्यांवर गुरुवारी (दि. १) काळाने घाला घातला. समुद्रात पोहण्यासाठी उतरलेल्या विद्यार्थ्यांपैकी तब्बल आठ विद्यार्थ्यांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. समुद्रातील पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने ही भीषण दुर्घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेने दिवेआगरसह संपूर्ण श्रीवर्धन तालुक्यात आणि आळंदी येथील शैक्षणिक वर्तुळात शोककळा पसरली आहे.

विनर्स अॅकॅडमी फॉर ११ अँड १२ची २५ मुले, १७ मुली आणि सहा शिक्षक असे एकूण ४८ जण पर्यटनासाठी दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दिवेआगर समुद्रकिनारी आले होते. समुद्राचा आनंद घेण्यासाठी काही विद्यार्थी पाण्यात उतरले. मात्र, पाण्याची खोली, लाटांचा वेग आणि समुद्रातील प्रवाहाचा अंदाज न आल्याने आठ विद्यार्थी पाण्यात बुडाले.दुर्घटनेनंतर मृतदेह बोर्ली पंचतन पान २ वर

### मृत विद्यार्थ्यांची नावे

या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे वय १६ वर्षे असून, ते आळंदी, पुणे येथील रहिवासी आहेत. मृतांमध्ये तन्मय दत्तात्रय वहीले, सुमित भरत अहिरे, प्रणव रामदास बनसोडे, कैवल्य सतीश वासनकर, राजवीर युवराज वहीले, यश किरण वानखेडे, सोहम तुकाराम भांडवलकर, कौस्तुभ संदीप दौंड यांचा समावेश आहे.

# फटाक्यांवर वेळेचे बंधन

- २४ तास फटाके फोडण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार
- सरसकट बंदी नाही, मात्र ठराविक वेळेतच फटाके फोडता येणार
- 'ग्रीन क्रॅकर्स'च्या वापरावर भर, प्रदूषण रोखण्यासाठी न्यायालयाचा संतुलित मार्ग

। नवी दिल्ली । प्रतिनिधी ।

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फटाक्यांमुळे होणारे वायू व ध्वनी प्रदूषण आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असतानाच सर्वोच्च न्यायालयाने फटाक्यांच्या वापराबाबत महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली आहे. फटाक्यांवर सरसकट पूर्ण बंदी घालणार नसल्याचे स्पष्ट करतानाच दिवसभर किंवा २४ तास फटाके फोडण्याची मुभाही दिली जाणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. धार्मिक भावना आणि पर्यावरण व आरोग्याचे संरक्षण यामध्ये संतुलन साधण्यासाठी फटाके फोडण्यासाठी ठराविक वेळ आणि परवानगी असलेल्या फटाक्यांपुरताच वापर मर्यादित ठेवण्याचा मार्ग न्यायालयाने सुचविला आहे.

सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश यांच्या खंडपीठाने फटाक्यांबाबत सुनावणीदरम्यान २४ तास फटाके फोडण्यास परवानगी दिल्यास त्याचा लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींवर मोठा परिणाम होऊ शकतो, असे नमूद केले. त्यामुळे सरसकट बंदीऐवजी विशिष्ट वेळ निश्चित करून त्याच कालावधीत फटाके फोडण्याची परवानगी देण्याचा मार्ग अवलंबण्याची भूमिका न्यायालयाने घेतली आहे.

फटाक्यांच्या विक्रीसाठी परवानाधारक विक्रेत्यांनाच परवानगी देणे, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या फटाक्यांची विक्री व वापर रोखणे तसेच परवानगी असलेल्या फटाक्यांचीच निर्मिती व विक्री सुनिश्चित पान २ वर

## वेधक

### व्हीएसआरला वाचविणारा मफलरवाला नेता कोण?

**मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाच्या प्रकरणात व्हीएसआर कंपनीला वाचविणाऱ्या एका बड्या नेत्याचा येत्या १० ऑक्टोबरला पर्दाफाश करणार असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) आमदार रोहित पवार यांनी सोमवारी केला. या नेत्याने एका कार्यक्रमात डिझाइनचा मफलर घातला होता, त्यामुळे आपण त्याला मफलरवाला नेता असे संबोधत असल्याचे त्यांनी सांगितले. अजित पवार यांच्या अपघाताला आठ महिने उलटूनही सरकार आणि सीआयडीकडून अपेक्षित तपास होत नसल्याचा आरोप रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत केला. पान २ वर

### आज 'नो यूपीआय डे'

मुंबई : यूपीआय व्यवहारांवर प्रस्तावित अतिरिक्त एमडीआर शुल्काला विरोध करण्यासाठी फेडरेशन ऑफ रिटेल ट्रेडर्स वेल्फेअर असोसिएशनने २ ऑक्टोबर रोजी 'नो यूपीआय डे' पाळण्याचा निर्णय घेतला आहे. या दिवशी सहभागी व्यापारी यूपीआयद्वारे पेमेंट स्वीकारणार नसून काळे कपडे परिधान करून शांततामय निषेध नोंदवणार आहेत. १५ ऑक्टोबरपासून दोन हजार रुपयांपेक्षा अधिक व्यापारी यूपीआय व्यवहारांवर ०.४ टक्के एमडीआर आकारण्याच्या निर्णयाला व्यापाऱ्यांचा विरोध आहे. महाराष्ट्र, गुजरात, पश्चिम बंगाल, पंजाब, ओडिशा, दिल्लीसह विविध राज्यांतील व्यापारी संघटनांनी आंदोलनाला पाठिंबा दिल्याचे संघटनेने म्हटले आहे.

### मुंबईचा प्रवास महागला

**मुंबई :** मुंबईच्या पाच प्रवेशद्वारांवरील वाशी, ऐरोली, मुलुंड, एलबीएस आणि दहिसर टोलनाक्यांवरील टोलच्या दरात १ ऑक्टोबरपासून वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) केलेल्या या दरवाढीनुसार मिनी बस आणि एलसीव्ही वाहनांना आता ७५ ऐवजी ९० रुपये, ट्रक व बसला १५० ऐवजी १८० रुपये, तर अवजड वाहनांना १९० ऐवजी २२५ रुपये टोल मोजावा लागणार आहे. दरम्यान, हलकी वाहने, बेस्ट बस, एसटी आणि शालेय वाहनांना ऑक्टोबर २०२४ पासून टोलमधून सवलत देण्यात आली आहे. मुंबईतील ५५ उड्डाणपुलांचा खर्च वसूल करण्यासाठी या टोलनाक्यांवर पथकर आकारला जात आहे.

## निवडणूक आयोगाविरोधात

# डाव्या पक्षांचा एल्गार!

### आझाद मैदान घोषणांनी दणाणले; 'एसआयआर रद्द करा', 'ज्ञानेश कुमार राजीनामा द्या'ची मागणी




। मुंबई । प्रतिनिधी ।

'तानाशाही नहीं चलेगी', 'हुकूमशाही नहीं चलेगी', 'एसआयआर रद्द करा', 'वोट चोर गद्दी छोड', 'ज्ञानेश कुमार राजीनामा द्या' अशा जोरदार घोषणांनी गुरुवारी मुंबईतील आझाद मैदान दणाणून गेले. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत शेतकरी कामगार पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, भारतीय पान २ वर

# अन्यथा न्यायालयात जाणार

- खासदार तटकरेंचा प्रशासनाला इशारा
- दिघी बंदराच्या विस्ताराला मच्छिमारांचा तीव्र विरोध

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।



दिघी बंदराच्या प्रस्तावित विस्तार प्रकल्पाला तेरा गावांतील मच्छिमारांसह महादेव कोळी समाजाने तीव्र विरोध दर्शविला असून, या प्रकल्पासंदर्भातील मच्छिमारांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी करण्यात आली. याबाबत गुरुवारी (दि.१) जिल्हाधिकारी कार्यालयात खासदार सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. जनसुनावणीत मांडण्यात आलेले मुद्देच प्रशासनाने स्पष्ट करावेत. त्यामध्ये कोणताही विसंगतपणा आढळल्यास त्याविरोधात न्यायालयात पान २ वर

# गोदरेज कंपनीवर होणार कारवाई?

- जिल्हाधिकारी यांची माहिती
- अलिबागमध्ये झालेल्या बैठकीत निर्णय

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

गुरचरण जागेत अतिक्रमण करण्याबरोबरच आदिवासी समाजाच्या जमिनी हडप केल्याचा ठपका ठेवत खालापूरमधील गोदरेज कंपनीवर कारवाई केली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली. अलिबागमध्ये झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे गोदरेज कंपनीमध्ये अडचणीत सापडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

गुरचण जमीन कोणत्याही कारणासाठी देण्यात येऊ नये, असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. तरीदेखील गोदरेज कंपनीने गुरचरण जागेत अतिक्रमण केल्याचे तहसीलदारांनी मान्य केले आहे. आदिवासी समाजाच्या जमिनी हडप केल्या आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला न देता, जमिनी घेतल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे गोदरेज समूहाविरोधात कारवाई करण्याची मागणी खासदार सुनील तटकरे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती. पान २ वर

## गर्दीचा फायदा घेत सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला

। माणगाव । प्रतिनिधी ।

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर माणगाव बसस्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी असताना एका महिलेच्या अंगावरील सोन्याचे दागिने चोरून पसार झालेल्या दोन महिला संशयितांना माणगाव पोलिसांनी शिताफीने अटक केली. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेले सोन्याचे मंगळसूत्र व सोन्याचे गंठन असा सुमारे सहा तोळे वजनाचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास गणेशोत्सवानिमित्त आपल्या मूळ गावी महाड येथे पान २ वर

### सहा महिन्यांत व्यवसायात १,२६२ कोटींची वाढ | ६६व्या वर्धापनदिनी सहकारातील विश्वासाची परंपरा कायम

# आरडीसीसीची ८,३६७ कोटींची भरारी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

सहकाराच्या माध्यमातून रायगडच्या आर्थिक विकासाला बळ देणाऱ्या रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ६६ वर्षांचा विश्वासाचा प्रवास पूर्ण करताना विकासाची गतीही कायम ठेवली आहे. बँकेच्या ६६व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने बँकेच्या प्रगतीचा नवा टप्पा समोर आला असून, ३० सप्टेंबर २०२६ अखेर बँकेचा व्यवसाय ८,३६७.५७ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. २०२६-२७ आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत बँकेने ७०.२५ कोटी रुपयांचा ढोबळ नफा नोंदविला आहे.

सहकार, कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जोडलेली आपली भूमिका कायम ठेवत बदलत्या आर्थिक गरजांनुसार बँकेने विस्तारलेली सेवा आणि व्यवसायाची व्याप्ती यामुळे हा वर्धापनदिन बँकेच्या प्रगतीच्या नव्या पर्वाची नोंद करणारा ठरत आहे.

३१ मार्च २०२६ रोजी ७,१०५.१४ कोटी




रुपये असलेला बँकेचा व्यवसाय ११ जुलै रोजी झालेल्या ६५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेपर्यंत ८,००० कोटी रुपयांच्या पुढे गेला होता. सप्टेंबरअखेर बँकेने ८,३६७ कोटी रुपयांचा टप्पा गाठला पान २ वर

> "६६ वर्षांचा विश्वास आणि सातत्यपूर्ण प्रगती ही रायगड जिल्हा बँकेची खरी ओळख आहे. गेल्या अनेक वर्षांत बदलत्या काळानुसार बँकेला नवी दिशा देत आधुनिक बँकिंग आणि तंत्रज्ञानाचा स्वीकार केला. आजची व्यवसायवाढ ही सभासद, ग्राहक आणि कर्मचाऱ्यांच्या विश्वासाची व एकत्रित प्रयत्नांची फलश्रुती आहे. रायगडच्या आर्थिक विकासाला अधिक बळ देत बँकेची ही प्रगतीची वाटचाल अशीच सुरू राहील."
> – जयंत पाटील, अध्यक्ष

> "व्यवसायवाढीसोबत ग्राहकसेवा अधिक गतिमान करण्यावर बँकेचा भर आहे. शासकीय योजनांचा लाभ पात्र शेतकरी सभासदांपर्यंत वेळेत पोहोचविण्यासाठी शाखास्तरावर विशेष प्रयत्न सुरू आहेत. बँकेच्या प्रगतीत अधिकारी, कर्मचारी आणि ग्राहकांचे योगदान महत्त्वाचे आहे; त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार."
> – मंदार वर्तक, मुख्य कार्यकारी अधिकारी



## पान १ वरुन

## विद्यार्थ्यांवर काळाचा घाला

येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आले. या ठिकाणी विधान परिषदेचे आमदार अनिकेत तटकरे तसेच श्रीवर्धनचे तहसीलदार महेंद्र वाकलेकर यांनी भेट देऊन परिस्थितीची माहिती घेतली.

**क्षणात आनंदाचे रूपांतर आक्रोशात**

विद्यार्थी समुद्रात बुडाल्याचे लक्षात येताच घटनास्थळी एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिक, पर्यटक आणि बचाव पथकाने तातडीने समुद्रात शोधमोहीम सुरू केली. दिवेआगर येथील 'भाऊ मारुती साळुंखे महाकाली वॉटर स्पोर्ट्स'चे मालक भाऊ साळुंखे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रसंगावधान राखत समुद्रात उतरून बचावकार्य सुरू केले. अथक प्रयत्नांनंतर बुडालेल्या आठही विद्यार्थ्यांचे मृतदेह समुद्रातून बाहेर काढण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच दिघी सागरी बोर्ली पंचतन पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी हे पोलीस पथकासह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह ताब्यात घेत पुढील वैद्यकीय व कायदेशीर कार्यवाही सुरू केली. मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी बोर्ली पंचतन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलविण्यात आले आहेत. पोलिसांकडून घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

## डाव्या पक्षांचा एल्गार!

कम्युनिस्ट पक्ष (मा.ले.) यांच्यासह विविध डावे, पुरोगामी पक्ष, संस्था-संघटना आणि विद्यार्थी संघटनांनी निवडणूक आयोगाविरोधात एल्गार पुकारला. मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेला विरोध, निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखणे आणि पात्र मतदारांची नावे मतदार यादीतून वगळली जाऊ नयेत, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनस्थळी विविध मागण्यांचे फलक झळकवत कार्यकर्त्यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर जोरदार घोषणाबाजी केली.

'ज्ञानेश कुमार चले जाव', 'आग लगे बस्ती में, हम अपनी मस्ती में' यांसह विविध घोषणांनी आझाद मैदान परिसर दणाणून गेला. निवडणूक आयोगाच्या कारभाराबाबत आंदोलकांनी गंभीर आक्षेप नोंदवत संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांचा राजीनामा घेण्याची मागणी केली. तसेच निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास आणि पारदर्शकता कायम राखण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात शेकापचे राज्य कार्यालयीन चिटणीस ॲड. राजेंद्र कोरडे, पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा ॲड. साम्या कोरडे, शेकाप नेत्या तेजस्वी घरत, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. मिलिंद रानडे, भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. शैलेंद्र कांबळे, भारतीय कम्युनिस्ट पक्ष मा.ले.चे डॉ. विजय कुलकर्णी यांच्यासह विविध डावे व पुरोगामी विचारांच्या पक्षांचे कार्यकर्ते, संस्था-संघटनांचे प्रतिनिधी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरम्यान, शुक्रवारी होणाऱ्या कॉकरोज जनता पार्टीच्या आंदोलनाला तसेच दि. ४ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या महाविकास आघाडीच्या आंदोलनालाही यावेळी पाठिंबा देण्याची घोषणा करण्यात आली.

दरम्यान, निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसंदर्भातील २०२३चा कायदा रद्द करावा, तसेच निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे, अशी मागणीही आंदोलकांनी केली.

**एसआयआर प्रक्रियेलाच विरोध**

एसआयआर प्रक्रियेदरम्यान अन्याय्य पद्धतीने मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या सर्व पात्र आणि खऱ्या मतदारांचा पुन्हा मतदार यादीत समावेश करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. पात्र मतदारांचे नाव कोणत्याही कारणाने वगळले जाऊ नये आणि प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार अबाधित राहावा, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत आक्षेप नोंदवत सध्याची प्रक्रिया तात्काळ थांबवावी, अशी मागणीही करण्यात आली.

## आता दस्तनोंदणीसाठी आधार अनिवार्य!

विभागातर्फे स्थावर मालमत्तांच्या दस्तनोंदणीची प्रक्रिया पार पाडली जाते. खोटे साक्षीदार, खोटे पक्षकार उभे करून होणारी फसवणूक आता हद्दपार होईल. यामुळे नोंदणी प्रक्रियेतील मानवी हस्तक्षेप कमी होऊन फसवणुकीचे प्रकार टळतील आणि संपूर्ण कामकाज अधिक कार्यक्षम व पारदर्शक होण्यास मदत होईल. ज्यांचा आधार क्रमांक नाही त्यांनी आधार नोंदणी केल्याची पावती व त्यासोबत अन्य सरकारी ओळखपत्रे तसेच व्यवहार होत असलेल्या संबंधिताचे नाते सिध्द करणारी कागदपत्रे अर्जासोबत जोडावी लागतील. पडताळणी झाल्यानंतरच व्यवहार अंतिम होणार आहे. आधार पडताळणीत रत्नागिरी जिल्हा दुसरा. बालकांसाठी व विशेष घटकांसाठी नियम१८ वर्षांखालील मुलांच्या बाबतीत त्यांच्या माता-पिता किंवा कायदेशीर पालकांच्या संमतीनेच आधार नोंदणी अर्ज केला जाईल. केवळ आधार क्रमांक उपलब्ध नसल्याच्या कारणावरून कोणत्याही बालकाला किंवा पात्र लाभार्थ्याला दस्तनोंदणीच्या लाभापासून वंचित ठेवले जाणार नाही, अशी स्पष्ट तरतूद या अधिसूचनेत करण्यात आली आहे.

## व्हीएसआरला वाचविणारा मफलरवाला नेता कोण?

या प्रकरणातील तांत्रिक तसेच गुन्हेगारी तपासाबाबत प्रश्न उपस्थित करताना त्यांनी एआयबीच्या अहवालाची प्रतीक्षा केली जात असल्याचे म्हटले. अजित पवार यांना लोक विसरतील, असे सरकारला वाटत असेल; मात्र तसे होणार नाही, असेही त्यांनी सांगितले. मफलरच्या मागे एक चेहरा असून त्या व्यक्तीचे नाव आणि छायाचित्र १० ऑक्टोबरच्या मुंबईतील पत्रकार परिषदेत जाहीर करण्यात येईल, असा दावा पवार यांनी केला.

## गोदरेज कंपनीवर होणार कारवाई?

त्यांना याबाबत पत्र दिले होते. गोदरेज समूहाने अनधिकृत गौण उत्खनन केलेले आहे. सुमारे २२ कोटींची दंडात्मक कार्यवाही त्यांच्यावर करण्यात आली आहे. अनधिकृत गौण खनिजाचे उत्खनन व अतिक्रमणाची तात्काळ सखोल चौकशी करून कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनातून केली होती. अखेर याबाबत गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत निर्णय घेण्यात आला. गुरचरण जागेसह आदिवासी समाजाची जमीन हडप केल्याचा ठपका या बैठकीत ठेवण्यात आला. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी संबंधित कंपनीवर कारवाई लवकरच केली जाईल, अशी माहिती बैठकीत दिली.

## गर्दीचा फायदा घेत सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला

जाण्यासाठी एक महिला माणगाव बसस्थानकात बसमध्ये चढत होती. याच गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तींनी तिच्या पर्समधील सोन्याचे दागिने लंपास केले. या घटनेनंतर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन माणगाव पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. बसस्थानक परिसरातील हालचाली, मिळालेली माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा माग काढला. तपासादरम्यान माणगाव ते कोणगाव तसेच भिवंडी परिसरापर्यंत पोलिसांनी शोधमोहीम राबवली. अखेर दोन महिला संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता चोरीचा उलगडा झाला.

या कारवाईत चोरीस गेलेले सोन्याचे मंगळसूत्र आणि सोन्याचे गंठन असा मुद्देमाल १०० टक्के हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. ही कारवाई रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवधरे आणि माणगाव विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी शशिकांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती आंबेकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

## आरडीसीसीची ८,३६७ कोटींची भरारी

असून, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत बँकेच्या व्यवसायात तब्बल १,२६२ कोटी रुपयांहून अधिक वाढ झाली आहे. १९६० मध्ये स्थापन झालेल्या रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ६६ वर्षांच्या प्रवासात कृषी, सहकार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देत विश्वासाची भक्कम परंपरा निर्माण केली आहे. बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञान आणि नवे बँकिंग स्वीकारत आता १० हजार कोटींच्या व्यवसायाच्या नव्या टप्प्याकडे बँकेची वाटचाल सुरू आहे. दरम्यान, बँकेच्या आज झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत बँकेच्या व्यवसायविस्ताराला अधिक गती देण्यासाठी स्वतंत्र विपणन विभाग सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या विभागाचे प्रादेशिक कार्यालय पनवेल येथे सुरू करण्यात येणार असून, बदलत्या बाजारपेठेच्या गरजा आणि नव्या ग्राहकांपर्यंत बँकेच्या सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे मानले जात आहे.

कर्जमाफीत बँकेचा पुढाकार

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेच्या २०२६ मधील अंमलबजावणीतही रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतकरी ग्राहकांना तत्पर सेवा दिली आहे. शासनाने जाहीर केलेल्या दुसऱ्या व तिसऱ्या यादीत बँकेच्या एकूण ७,३४२ पात्र सभासदांचा समावेश आहे. त्यापैकी ३,३९२ सभासदांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले असून, त्यांच्या खात्यात एकूण २०.४६ कोटी रुपयांची कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली आहे. उर्वरित पात्र सभासदांचेही आधार प्रमाणीकरण लवकरात लवकर पूर्ण व्हावे, यासाठी बँकेच्या शाखास्तरावर विशेष प्रयत्न सुरू असून, संबंधित शेतकरी सभासदांशी संपर्क साधून त्यांना आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य केले जात आहे.

## फटाक्यांवर वेळेचे बंधन

करण्याच्या उपाययोजनांवर न्यायालयाने भर दिला आहे. त्यामुळे नागरिकांनी दिवाळीत फटाके फोडण्यापूर्वी स्थानिक प्रशासनाने जाहीर केलेली वेळ आणि लागू असलेले नियम तपासणे आवश्यक ठरणार आहे.

प्रदूषण कमी करण्यासाठी पर्यावरणपूरक अर्थात 'ग्रीन क्रॅकर्स'च्या वापरावर भर देण्यात आला आहे. फटाक्यांमधील रासायनिक घटक, ध्वनीपातळी आणि पर्यावरणीय परिणाम याबाबतही न्यायालयीन प्रक्रियेत लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. नव्या पिढीतील ग्रीन क्रॅकर्सच्या निर्मितीला पर्यावरणीय निकषांच्या अधीन राहून परवानगी देण्यात आली असून, त्यांच्या उत्सर्जनाचा आणि पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास करण्याची प्रक्रियाही सुरू आहे.

फटाक्यांमध्ये बेरियमसह प्रतिबंधित रसायनांचा वापर, तसेच आवाजाच्या निर्धारित डेसिबल मर्यादेचे उल्लंघन यावर नियंत्रण ठेवण्याच्या सूचना यापूर्वीही सर्वोच्च न्यायालयाने दिल्या आहेत. फटाक्यांच्या नमुन्यांची तपासणी, परवानगी असलेल्या रसायनांचा वापर आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उत्पादक-विक्रेत्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर सोपविण्यात आली आहे. दरम्यान, दिल्ली-एनसीआरमधील फटाक्यांच्या वापराबाबतचे काही विशिष्ट निर्बंध आणि बेरियमयुक्त फटाक्यांच्या परिणामांचा अभ्यास यावर पुढील सुनावणीत अधिक स्पष्टता होणार आहे. केंद्र सरकार आणि संबंधित तज्ज्ञ संस्थांना पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी १५ ऑक्टोबरपर्यंतची मुदत देण्यात आल्याचे वृत्त आहे.

## अन्यथा न्यायालयात जाणार

जाणार, असा स्पष्ट इशारा खासदार सुनील तटकरे यांनी प्रशासनाला दिला. दिघी पोर्ट लिमिटेडकडून दिघी बंदराची माल हाताळणी क्षमता सध्याच्या २३.६५ एमएमटीपीएवरून तब्बल १४० एमएमटीपीएपर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव आहे. प्रकल्पामुळे पारंपरिक मासेमारी क्षेत्रावर थेट अतिक्रमण होऊन मच्छिमारांची उपजीविका हिरावली जाण्याचा धोका असल्याचे सांगण्यात आले. या प्रकल्पासाठी सुमारे ४४५ हेक्टरपर्यंत समुद्र व खाडी क्षेत्रात भराव होणार असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच मोठ्या प्रमाणात गाळ काढण्याचे प्रस्तावित असल्याने समुद्रातील गाळ, पाण्याची गुणवत्ता, माशांचे अधिवास आणि मासेमारीवर दीर्घकालीन परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे दिघी, कुडगांव, तुरुंबाडी, मेंदडी, खरसई, पाभरे, खारगांव, वाशी हवेली, मांदाड, रहाटाड, खामदे, राजपुरी आणि एकदरा या तेरा गावांतील मच्छिमारांसह कोळी समाजाने प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शविला आहे. नुकत्याच झालेल्या जनसुनावणीतही तेरा गाव महादेव कोळी समाज संघटना राजपुरी खाडीच्या वतीने प्रकल्पाला विरोध करण्यात आला होता. मात्र, जिल्हा प्रशासनाकडून मच्छिमारांसह कोळी समाजाच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याची नाराजी बैठकीत व्यक्त करण्यात आली.

अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत खासदार तटकरे यांनी संबंधित विभागाकडून प्रकल्पाची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, संबंधितांकडून समाधानकारक माहिती उपलब्ध झाली नसल्याचे बैठकीत समोर आले. निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनाही तटकरे यांनी याबाबत जाब विचारला. त्यावेळी समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याने तटकरे यांनी प्रशासनाला स्पष्ट सूचना दिल्या.

जोपर्यंत मच्छिमारांच्या मागण्यांचा विचार होत नाही, तोपर्यंत प्रशासनाने कोणत्याही प्रकारची हालचाल करू नये, अशी सक्त ताकीद खासदार तटकरे यांनी जिल्हा प्रशासनाला दिली. मच्छिमारांसह कोळी समाजाच्या मागण्यांचा विचार करूनच पुढील कार्यवाही करावी, अशी सूचना त्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांना केली. तसेच जनसुनावणीतील मुद्दे आणि प्रशासनाची पुढील कार्यवाही यामध्ये विसंगती आढळल्यास न्यायालयात जाण्याचा इशाराही दिला.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, अपर जिल्हाधिकारी सचिन ढोले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, रायगड जिल्हा कोळी समाज संघाचे सचिव प्रवीण तांडेल, तेरा गाव महादेव कोळी समाज संघटना राजपुरी खाडीचे अध्यक्ष ज्ञानदेव तांडेल, जनार्दन गोवारी, अनिल बसवत, अनंत पाटील, गणेश मोन्नाक, गोवर्धन पाटील, मोरेश्वर पाटील, द्वारकानाथ पाटील, भांजी भुनेश्वर, खेळाराम पाटील, हरिश्चंद्र हातचांगे, कमळाकर हातचांगे आदींसह तळा, दिघी, पाभरे, तुरुंबाडी, राजपुरी येथील मच्छिमार व कोळी समाजातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेल्या मिळकती आमचे अशिल श्री. सुजय हेमंत विचारे रा. ऐ/१९, आत्मज सीएचएस दिनदयाल क्रॉस रोड, निअर शिवसेना ऑफिस, ठाकुरवाडी डोबिंवली वेस्ट, जि.ठाणे- ४२१२०२. यांनी मौजे वडवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथिल खालील वर्णनाच्या मिळकती तिचे मालक पी.आर.शर्मा व के.पी.शर्मा यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णनः-**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार रू.पै. |
|---|---|---|
| ४६/६ | एकुण क्षेत्र ०.०८.८० हे. आर. पॉ. | ०.०६ |
| ४४/७ | एकुण क्षेत्र ०.१७.०० हे.आर.पॉ. | ०.१९ |
| ४४/३/अ | एकुण क्षेत्र ०.७४.०० पैकी विकत दिलेले क्षेत्र ०.२८.०० हे.आर.पॉ. | ०.८४ |
| ४४/३/ब | एकुण क्षेत्र ०.६६.०० हे.आर.पॉ. | ०.६६ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध आहेत असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख :- ०२/१०/२०२६

**ॲड.कल्याणी रवी गायकर**
ओम श्रम साफल्य को.ऑप.हौसिंग सोसायटी
कोतवालनगर कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

### जाहीर नोटिस

सर्व लोकांस या नोटिसने असे कळविण्यात येते कि आमचे अशील यांनी मौजे आसलपाडा, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील शेतजमीन मिळकत सदर मिळकतीचे मालक श्री.संतोष रामचंद्र शेंडे, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असून, सदर मिळकतीचे वर्णन खाली प्रमाणे.

**मौजे आसलपाडा, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, येथील मिळकतीचे वर्णन**

| सर्वे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे आर. प्र | आकार |
|---|---|---|---|
| १५ | १/अ | ०.४३.०० | ०.५३ |

तरी वरील मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध साठेकारार बयाणापावती, गहाणखत, दान, बक्षीस, भाडेपट्टा, बोजा, जप्ती, कुळवहिवाट, इजमेंट, मृत्यूपत्रांकित, चार्ज, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास संबंधीतांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्या पत्त्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत रजिस्टर पोस्टाने पाठवण्यात यावी, याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आम्ही सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटिस दिली.

ठिकाण - कर्जत
तारीख : ०२.१०.२०२६

सही /-
**अधिवक्ता अविष्कार अरुण अभंगे**
पत्ता - नेमीनाथ हाईट, मुद्रे बुद्रुक,
कर्जत रायगड ४१०२०१
मो नं -८०८७३४९०१८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,
मौजे उणेगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे खालील वर्णनाची शेतजमिनीची मिळकत आहे.

| गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ६० | ५६/अ | ०-२०-५० पो.ख. ०-०२-८० | २.५० |

येणेप्रमाणे वर नमूद केलेल्या मिळकतीला यापुढे सदर जाहीर नोटीशीमध्ये सोयीकरीता ''सदर मिळकत'' असे संबोधिले आहे.
३)सदर मिळकत श्री. दिनेश दिनकर सत्वे व इतर सहहिस्सेदार यांचे ताबेकबजात, वहीवाटीत तसेच मालकी हक्कात आहे.
४)सदरची मिळकत निर्वेध व बोजारहीत श्री.दिनेश दिनकर सत्वे व इतर सहहिस्सेदार यांचे मालकीच्या, वहिवाटीच्या असल्याबद्दलची खात्री झालेली आहे. तरीही कोणाही त्रयस्थ व्यक्तिचा सदर मिळकतींमध्ये किंवा मिळकतींच्या एखाद्या भागात विरुद्ध कब्जाने किंवा वारसा, गहाण, दान, विक्री, देणगी, लीज, चार्ज, ट्रस्ट, लायसन्स, पोटगी, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, वचनचिठ्ठी किंवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क असल्यास, त्यांनी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात दिवसाच्या आत आपले प्रथमदर्शनी पुराव्याचे कागदपत्रांसहीत खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर्ड पोष्टाने दाखल कराव्यात.
५)वरील मुदतीत हरकती दाखल न झाल्यास, एखादा हक्क असल्यास तो रद्दबातल झाला आहे किंवा असल्यास जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे समजून वरील मिळकतीसंबंधी नियोजित खरेदीदार खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहुन कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीस श्री.दिनेश दिनकर सत्वे व इतर सहहिस्सेदार जबाबदार राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी

दिनांक : ०२.१०.२०२६

सही/-
**श्री.चेतन आर म्हात्रे**
ॲडव्होकेट पनवेल
मंजुषा को.ऑप.हौ.सोसायटी, गार्डन हॉटेलच्या मागे,
एच.ओ.सी.कॉलनीसमोर, पनवेल रायगड.
मो.नं. ९५९४२४२०९२५

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| **Tend-22/26-27 7000041736 ....2nd call** | Work of construction of RCC retaining wall at location No. 157 of 400kV Nagothane - Padghe I & II of 400kV Line maint. S/Dn. Nagothanes under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 500/- +GST** | Rs. 44,38,767.42 Including taxes. |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 02.10.2026 at 11:00 Hrs. to 12.10.2026 up to 11:00 hrs, Opening date:- 12.10.2026 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm) Mobile No. 8412050202, E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

सत्यमेव जयते
Government of Gujarat

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे कार्यालय,**
**तळा- रायगड**
ई-मेल आयडी : tahsildartala@gmail.com

क्रमांक: आस्था-२/महसूल सेवक (कोतवाल) पद भरती/जाहीरनामा/२०२६, दिनांक : ०२/१०/२०२६

**महसूल सेवक (कोतवाल) संवर्ग सरळसेवा भरती २०२६**
**जाहीरनामा**

**विषय:-** महसूल सेवक (कोतवाल) संवर्गातील आरक्षणानुसार रिक्त पदे भरण्याबाबत.
**विषय :-** महसूल सेवक (कोतवाल) संवर्गातील आरक्षणानुसार रिक्त पदे भरण्याबाबत.
**संदर्भ :-**
१. शासन महसूल व वन विभागाकडील पत्र क्र. पदभ-२०२५/प्र.क्र.९८/आस्था-१०, दि. ०३/०९/२०२६ व दि.०१/१०/२०२६
२. मा. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडील पत्र क्रमांक/मशा/आस्था-१/अ- ८(१)/कोतवाल भरती/२०२६ दि. ०३/०९/२०२६
३. दि. ०१/२०/२०२६ रोजी पार पडलेल्या महसूल सेवक (कोतवाल) आरक्षण सोडतीचे इतिवृत्त.

तळा तालुक्यातील १. मांदाड २. सोनसडे ३. मेढे या ०३ सजांचे रिक्त महसूल सेवक (कोतवाल) पदांची नेमणूक सरळसेवा निवड प्रक्रीयेद्वारे नेमणूक केली जाणार आहे. तरी ज्या व्यक्तीस महसूल सेवक (कोतवाल) म्हणून काम करणेची इच्छा आहे त्यांनी **तहसीलदार तळा यांचे कार्यालयात दि. ०२/१०/२०२६ ते दि. १७/१०/२०२६** रोजी कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) समक्ष पोहोच होईल अशा रीतीने विहित नमुन्यामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज दाखल करावा. विहित मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**महसूल सेवक (कोतवाल) पद नियुक्तीसाठी प्रवर्गनिहाय आरक्षण खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | आरक्षण | पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जमाती | ०१ |
| २ | इ.मा.व. | ०१ |
| ३ | एस.ई.बी.सी. | ०१ |
| | **एकुण पदे** | ०३ |

**१. महसूल सेवक (कोतवाल) पदाच्या भरतीसाठी उमेदवार खालील अटी व शर्तीस पात्र असावा :**
**१. शैक्षणिक अर्हता :** उमेदवार किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण असावा व त्यास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.
**२. वयोमर्यादा :**
२.१ सर्व प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी जाहिरनामा प्रसिद्ध होणाऱ्या दिनांकास म्हणजे दि. ०२/१०/२०२६ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ४० वर्षे वय असावे.
**३. रहिवास :** उमेदवार तळा तालुक्यातील रहिवाशी असावा, तसेच उमेदवारास गावाच्या स्थानिक व भौगोलिक परिस्थितीचे ज्ञान असावे.
**४. आरक्षण :**
**४.१** सामाजिक आरक्षणांतर्गत राखीव जागांच्या बाबतीत अर्जदाराला सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जातीचा /प्रवर्गाचा दाखला आणि नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र (लागू असेल तेथे) यांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.
**४.२** मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले मूळ जात प्रमाणपत्र व मूळ जात वैधता प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणी वेळी सादर करणे आवश्यक राहील. निवड होणाऱ्या मागासवर्गीय घटकातील उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ ब दि. १२/१२/२०११ यातील तरतुदीस अधिन राहून जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर बंधपत्र/शपथपत्र लिहून दिल्यानंतर तात्पुरती नियुक्ती दिली जाईल. नियुक्तीनंतर कमाल ६ महिन्यांच्या विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असून विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.
**२. अर्ज भरण्याची पद्धत:**
**२.१** प्रस्तुत पदासाठी विहित नमुन्यातील अर्ज तहसीलदार तळा यांचे कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावा. अर्जासाठी रोख स्वरुपात शुल्क रु. ५०/- आकारण्यात येतील. शुल्क पावती अर्ज घेतेवेळी प्राप्त करुन घ्यावी.
**२.२** तहसीलदार कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्यांत आलेला अर्जच ग्राह्य धरण्यात येईल. याव्यतिरिक्त अन्य मार्गाने (उदा. झेरॉक्स प्रतीवर अर्ज करणे, अन्य ठिकाणाहून छपाई करुन घेणे) दाखल केल्यास असा अर्ज छाननी वेळी बाद केला जाईल.
**२.३** अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत व कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करणे आवश्यक राहील. अन्य मार्गाने उदा. ई-मेलद्वारे आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. त्याचप्रमाणे विहित मुदतीनंतर अर्ज स्विकारला जाणार नाही.
**२.४** शैक्षणिक अर्हतेच्या व इतर प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती साक्षांकित करून अर्जासोबत जोडाव्यात.
**२.५** महिला उमेदवाराने पुर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
**३. अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**
**३.१** इयत्ता चौथी उत्तीर्ण गुणपत्रिका किंवा महत्तम प्राप्त शैक्षणिक गुणवत्ता दर्शविणारी गुणपत्रिका/ सनद.
**३.२** तळा तालुक्यातील गावचा रहिवाशी असलेबाबत तहसीलदार, तळा कार्यालयाचे रहिवाशी प्रमाणपत्र
**३.३** अर्जासोबत आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पॅनकार्ड यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची स्वसांक्षाकित प्रत जोडावी.
**४. परीक्षा शुल्क :**
**४.१** उमेदवारांनी परीक्षा शुल्क रक्कम रु. ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) रोख स्वरुपात तहसीलदार तळा यांचे कार्यालयात अर्ज दाखल करतेवेळी जमा करणे आवश्यक आहे. परिक्षा शुल्क पावती अर्ज दाखल करतेवेळी प्राप्त करुन घ्यावी.
**५. महसूल सेवक (कोतवाल) भरतीचा कालबद्ध कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे :**

| अ.क्र. | तपशिल | निश्चित केलेला दिनांक |
|---|---|---|
| १ | जाहीरनामा प्रसिद्ध करणे | दि. ०२/१०/२०२६ |
| २ | अर्ज दाखल करणे व अर्ज प्राप्तीचा शेवट दिनांक | दि. ०२/१०/२०२६ ते १७/१०/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) |
| ३ | अर्ज छाननी करणे | दि. १८/१०/२०२६ ते ०१/११/२०२६ |
| ४ | प्रवेशपत्र उपलब्ध करणे | दि. ०४/११/२०२६ ते १०/११/२०२६ (उमेदवारांनी समक्ष आपले ओळखपत्र दाखवून तहसील कार्यालय तळा येथून कार्यालयीन दिवशी व वेळी प्रवेशपत्र प्राप्त करुन घ्यावे.) |
| ५ | लेखी परिक्षा | दि. १५/११/२०२६ |
| ६ | उत्तरसुची आणि निकाल घोषणा | दि. १६/११/२०२६ |
| ७ | दस्तऐवज पडताळणी | दि. १७/११/२०२६ ते २७/११/२०२६ |
| ८ | नियुक्तीपत्र | दि. २८/११/२०२६ |

तथापि अपरिहार्य कारणास्तव वरील कार्यक्रमात बदल करणेचा संपूर्ण अधिकार निवड समितीकडे असून अशा प्रकरणी सुधारित कार्यक्रम तपशील तहसील कार्यालय तळा व उपविभागीय अधिकारी कार्यालय माणगाव येथील नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करणेत येईल.

टिप - महसूल सेवक भरती प्रक्रियेची सविस्तर कार्यपद्धती अर्जासोबत पुरविण्यात येईल. तसेच या कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात येईल. त्यामधील सर्व तरतुदीचे वाचन करावे व त्यामधील सूचनांचे पालन करावे.

**ठिकाण :** तळा
**दिनांक :** ०२/१०/२०२६

सही/-
**सदस्य सचिव, महसूल सेवक (कोतवाल)**
निवड समिती, तथा तहसीलदार तळा

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE....2nd call**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No :-7000041705** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-28/2026-2027** RFx e-tender for AMC for Repair/ Service/ Overhauling/ Problem attending of Compressor of 245/145 kV Circuit Breaker at various substation under EHV (O&M) Division Panvel....2nd **Call** **Tender amount Limited to Rs. 10,00,000/-, EMD amount Rs. 10,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **01.10.2026, 18:00 Hrs. to 11.10.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 11.10.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **12.10.2026 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**E.H.V. (O&M) Dn. Panvel**







# चित्रलेखा पाटील यांनी घेतले गणरायांचे दर्शन

मंडळांना भेटी देत घेतला आशीर्वाद





**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

साखरचौथ गणेशोत्सवानिमित्त शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या तथा महाराष्ट्र राज्य मीडिया सेलच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील यांनी अलिबाग विधानसभा मतदारसंघातील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना भेटी देत साखरचौथीच्या गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी गणरायाच्या चरणी सर्वांच्या सुख-समृद्धी, उत्तम आरोग्य आणि मंगलमय जीवनासाठी प्रार्थना केली.

गणेश चतुर्थीनंतर भाद्रपद वद्य चतुर्थीला विराजमान होणाऱ्या साखरचौथीच्या गणपतीला रायगडसह ठाणे, मुंबई, पालघर तसेच कोकण परिसरात विशेष धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. साखरचौथीच्या निमित्ताने मतदारसंघातील विविध गावांमध्ये आणि परिसरात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी आकर्षक सजावट व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. दरम्यान, साखरचौथीच्या गणरायाच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या श्रद्धेने सार्वजनिक मंडळांना भेट देत असतात. या पारंपरिक उत्सवाच्या निमित्ताने मतदारसंघातील नागरिकांशी संवाद साधण्याची संधीही मिळत असल्याने चित्रलेखा पाटील यांनी यंदाही विविध गणेशोत्सव मंडळांना भेटी देण्याची परंपरा कायम ठेवली. त्यांच्या भेटीदरम्यान मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांनी त्यांचे स्वागत केले. या भेटींमुळे गणेशोत्सवाचा उत्साह अधिक वाढल्याचे चित्र परिसरात पाहायला मिळाले. साखरचौथीच्या गणरायाच्या दर्शनासाठी चित्रलेखा पाटील यांनी घेतलेल्या या भेटींमुळे मतदारसंघातील नागरिक, गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी त्यांचा संवाद साधला गेला. तसेच मंडळांच्या पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच भाविकांशी त्यांनी संवाद साधून गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

भेटीदरम्यान चित्रलेखा पाटील यांनी, गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सांस्कृतिक परंपरा अधिक दृढ होत असल्याचे नमूद केले. तसेच, साखरचौथीचा गणपती हा रायगड आणि कोकणच्या सांस्कृतिक परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मतदारसंघातील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना भेट देऊन गणरायाचे दर्शन घेण्याचा आणि नागरिकांच्या शुभेच्छा स्वीकारण्याचा आनंद मिळाला. विघ्नहर्त्या गणरायाच्या चरणी सर्वांच्या सुख-समृद्धी, उत्तम आरोग्य आणि मंगलमय जीवनासाठी प्रार्थना केली, अशी भावना चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केली. तसेच, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या माध्यमातून विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. या परंपरेला प्रोत्साहन देत नागरिकांनी उत्सव आनंदात, भक्तिभावाने आणि सामाजिक सलोखा जपत साजरा करावा, असे आवाहनही चित्रलेखा पाटील यांच्यामार्फत यावेळी करण्यात आले.





● श्री. अभिषेक प्रदीप पाटील. मु. कामार्ले, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान साखरचौथ गणपती व उपस्थित कुटुंबातील सदस्य. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)

## शेतजमिनीवर विद्युत वाहिनीचे अतिक्रमण

### ■ वणी, चेराठी येथील शेतकऱ्यांनी घेतली खासदारांची भेट

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील उसर येथील गेल कंपनीकडून पेण तालुक्यात महावितरण कंपनीचे उच्च दाब वाहीनी टाकण्याचे काम सुरु केले आहे. त्यासाठी मोठे टॉवर उभारले जात आहेत. वणी आणि चेराठी येथील शेतकऱ्यांच्या शेत जमीनी वरून या वाहीनीचे अतिक्रमण सुरु झाले आहे. या विरोधात शेतकरी आक्रमक झाले असून, त्यांनी विरोध दर्शविला आहे. याबाबत शेतकऱ्यांनी खासदार सुनील तटकरे यांची भेट घेऊन गाऱ्हाणे मांडले. येत्या दोन दिवसांत हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन तटकरे यांनी आश्वासन दिले.

उसर येथ गेल कंपनीमध्ये करोडो रुपयांचा प्रकल्प उभा राहत आहे. या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे. गेल कंपनीकडून पेण तालुक्यापर्यंत वणी आणि चेराठीपर्यंत असंख्य महावितरण कंपनीचे उच्च दाब वाहीनीचे टॉवर उभारण्यास सुरुवात केली आहे. अलिबाग तालुक्यातील अनेक भागात हे टॉवर उभे केले आहेत. पेण तालुक्यातील वणी आणि चेराठी परिसरात शंभरहून अधिक शेतकऱ्यांची हजारो एकर जमीन आहे. या पिकत्या जमीनीमधून टॉवरसह उच्च दाब विद्यूत वाहिनीची हालचाल सुरु झाल्याची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचली. या कामाबाबत शेतकरी व ग्रामस्थांना कोणतीही पुर्व सुचना देण्यात आली नाही. जनसुनावणी चर्चा व कायदेशीर प्रक्रीया पुर्ण न करता, कंपनीकडून मनमानी पद्धतीने काम सुरु असल्याचा आरोप करण्यात आला आहे. जमीनीमध्ये भातशेतीसह इतर शेती व्यवसाय केला जात आहे. उच्च दाब विद्यूत वाहिनीमुळे भविष्यात शेतीच्या वापरावर आणि ग्रामस्थांच्या सुरक्षिततेवर परिणाम होण्याची भिती व्यक्त करण्यात आली. या प्रकल्पाला विरोध नाही. मात्र, विद्यूत वाहिनी शेत जमीनीतून न नेता पर्यायी मार्गाने नेण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी केली आहे.

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी अध्यक्ष आक्रमक

### ■ एमएसआयडीसी अन् कंत्राटदाराला कायदेशीर नोटीस

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग येथील रेवदंडा बाह्यवळण मार्गावरील रस्त्याचे काम महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाने नेमलेल्या ठेकेदारामार्फत करण्यात आले आहे. मात्र, कामातील हलगर्जीपणामुळे रस्त्याच्या बाजूला असलेल्या चिंतामणराव केळकर अर्थात डिकेटी विद्यालयातील सुमारे २ हजार विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा व आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमर वार्डे आक्रमक झाले असून, त्यांनी एमएसआयडीसी आणि संबंधित कंत्राटदाराच्या मनमानी कारभाराविरोधात वकिलांमार्फत अंतिम कायदेशीर नोटीस बजावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग शहरानजीक असलेल्या रेवदंडा बाह्यवळण मार्गावरील रस्त्याच्या लगत चिंतामणराव केळकर विद्यालय आहे. या विद्यालयामध्ये २ हजारहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेच्या बाजूला असलेल्या या डांबरी रस्त्याच्या जागी सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता एमएसआयडीसीमार्फत करण्यात आला आहे. त्यासाठी एका कंपनीला काम देण्यात आले. दरम्यान, हा रस्ता करताना शाळेच्या उत्तर बाजूकडील संरक्षक भिंतीलगत प्रचंड खोदाई करण्यात आली. त्यामुळे पावसाळ्यात नैसर्गिक पाण्याचा मार्ग बंद होऊन शाळेच्या पटांगणात दलदल व चिखल साचत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. यादरम्यान, हा रस्ता सुमारे एक फुटाने उंच झाल्यामुळे शाळेच्या प्रवेशद्वारासाठी रॅम्प बांधणे, बुजलेली गटारे नव्याने खोदून कॉंक्रिटायझेशन करणे आणि शाळेसमोरून काढलेले गतिरोधक पुन्हा बसवून देणार असल्याचे कंत्राटदाराने मान्य केले होते. परंतु, प्रत्यक्षात मात्र कोणतेही शाश्वत काम न करता केवळ मातीचा भराव टाकण्यात आला आहे. तसेच, गतिरोधक न बसवता रस्ता तसाच सोडून देण्यात आला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याप्रकरणी दत्ताजीराव खानविलकर एज्युकेशन ट्रस्ट आणि चिंतामणराव केळकर विद्यालयाचे अध्यक्ष अमर वार्डे यांनी फेब्रुवारी आणि जून मध्ये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे लेखी पत्रव्यवहार करून लक्ष वेधले होते. परंतु, संबंधित शासकीय यंत्रणा आणि कार्यकारी अभियंता, एमएसआयडीसी यांच्याकडून या गंभीर प्रकाराची कोणतीही दखल घेतली गेली नाही. पालक संघाकडून सातत्याने होणाऱ्या तक्रारींमुळे शाळेच्या व्यवस्थापनावर ताण आला असून, ॲड. एस. एन. जोशी यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ व ठेकेदाराला नोटीस पाठविण्यात आली आहे.

## ७२६ किलो अमली पदार्थ नष्ट

**पनवेल** : नवी मुंबई पोलिसांनी 'ड्रग्जमुक्त नवी मुंबई' अभियानांतर्गत मोठी कारवाई करत तब्बल ७२६ किलो अमली पदार्थ नष्ट केले. या अमली पदार्थांची अंदाजे किंमत २६ कोटी ३० लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली. बुधवार दि.३० सप्टेंबर रोजी तळोजा येथील शासनमान्य अधिकृत केंद्रात ही विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया पार पडली. यावेळी पदार्थांची तस्करी, विक्री आणि वापराविरोधात कारवाई अधिक तीव्र करण्यात आली आहे. तसेच, कोट्यवधी रुपयांचे अमली पदार्थ नष्ट करण्यात आल्याने पोलिसांच्या कारवाईची व्याप्ती अधोरेखित झाली आहे.



## वेध नवरात्री उत्सवाचे

**खांदेश्वर** : नवरात्रीच्या उत्सवाचे वेध लागले असून, पनवेलच्या भिंगारी येथील श्री गणेश कारखान्यात देवीच्या विविध मूर्ती साकारण्याच्या कामाला वेग आला आहे. नवरात्री अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने मूर्तिकारांकडून मूर्तींना अंतिम रूप देण्यासाठी दिवसरात्र लगबग सुरू आहे. कारखान्यात काही लहान देवीच्या मूर्तींचे अखेरचे काम सुरू असून, कुठे मूर्तींना नाजूक कलाकुसर केली जात आहे, तर काही मूर्तींवर पहिल्या रंगाचा थर फवारण्यात येत आहे. देवीच्या चेहऱ्यावरील भाव, मुकुट, दागिने आणि वस्त्रांची सजावट याकडे मूर्तिकार विशेष लक्ष देत आहेत. मात्र, अवकाळी पावसाने मूर्तिकारांची चिंता वाढवली आहे.

## टोरंटच्या भूसंपादनाला लेखी विरोध

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत तालुक्यात होऊ घातलेल्या टोरंट प्रकल्पासाठी रस्ते तयार करण्यास शासनाने काढलेली अधिसुचनेला स्थानिक लेखी हरकत घेऊन विरोध केला आहे. त्यासाठी कर्जतमधील शेतकरी अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयात पोहचले होते. तेथे जिल्हा भूसंपादन अधिकारी यांना शेतकऱ्यांनी रस्त्यासाठी जमिनीची अधिग्रहण करू नये, असे पत्र सादर केले.

पाली तर्फे कोतवाल खलाटीमध्ये प्रस्तावित असलेली टोरंट एनर्जी पॉवर सोल्यूशन लिमिटेड कडे जाण्यासाठी ५.९१ किलोमीटर लांबीचा रस्ता बनविला जाणार आहे. तशी अधिसूचना राज्य सरकारने काढली आहे. जिल्हा भूसंपादन अधिकारी यांच्या माध्यमातून काढलेली अधिसूचना यांना ६ महिने पूर्ण झाले असून, ३०० हून अधिक शेतकऱ्यांनी आपली जमीन देण्यास विरोध केला आहे. त्याचवेळी स्थानिक पातळीवर रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीची मोजणी सार्वजनिक बांधकाम विभागला करू दिली जात नाही. मात्र, तरीदेखील टोरंट प्रकल्प कंपनी आणि प्रशासनाकडून सातत्याने स्थानिक शेतकरी यांच्यावर दबाव टाकला जात आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रकल्पाकडे जाणारा रस्ता ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीमधून जाणार आहे, त्या आंबोट, पाली, पोटल, सायडोंगर येथील शेतकऱ्यांनी अलिबाग येथे रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन हरकत घेतली.

पेणमधील साखरचौथ गणेशोत्सवात ध्वनीप्रदूषणाचा उच्चांक | दोन दिवसांत कोट्यवधींची उलाढाल

## विसर्जन मिरवणुकीत 'आवाजाची स्पर्धा'

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण शहरातील साखरचौथ गणेशोत्सव यंदाही मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा झाला. मात्र, भक्तीच्या या उत्सवाला यंदा ध्वनीप्रदूषणाच्या कर्णकर्कश स्पर्धेची किनार लाभली. यावेळी पेण मधील ६५ सार्वजनिक गणेश मंडळांनी विसर्जन मिरवणुका काढल्या.

पेण शहरातील विसर्जन मार्गावर बुधवार दि.३० सप्टेंबर रोजी सायंकाळी डीजेच्या दणदणाटासोबतच लेझर लाईटचा झगमगाट सुरू होता. मोठमोठे साऊंड सिस्टीम, डीजे आणि लेझरच्या



रोषणाईमुळे संपूर्ण परिसर अक्षरशः दणाणून गेला. उत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असली, तरी त्याचवेळी नागरिकांना होणारा ध्वनीप्रदूषणाचा त्रास आणि सार्वजनिक आरोग्याचा प्रश्नही चर्चेत आला. गणेशोत्सव हा श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव आहे. मात्र, विसर्जन मिरवणुकीत भक्तिगीतांपेक्षा डीजेचा आवाज आणि आवाजाची पातळी यांनाच अधिक महत्त्व मिळाल्याचे दिसून आले. दरम्यान, पेण पोलिसांनी परिस्थितीवर लक्ष ठेवत रात्री बरोबर १०.०० वाजता डीजे आणि ध्वनिवर्धक यंत्रणा बंद करण्याची कारवाई केली.

### मंडळांसमोर आव्हान

साखरचौथ गणेशोत्सवानिमित्ताने दोन दिवसांत मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होते. व्यापारी, खाद्यपदार्थ विक्रेते, सजावट, विद्युत रोषणाई, साऊंड सिस्टीम, वाहतूक आणि विविध व्यवसायांना याचा फायदा होतो. मात्र, या आर्थिक उलाढालीसोबत पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामांकडेही गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. गणपती बाप्पाच्या उत्सवाची भव्यता ही आवाजाच्या तीव्रतेत नसून भक्ती, शिस्त आणि सामाजिक बांधिलकीत असते, हे पुढील वर्षीच्या उत्सवात सिद्ध करण्याचे आव्हान आता गणेश मंडळांसमोर आहे.



# औषध 'किमतींची भेसळ'

कर्करोगावरच्या औषधांवरच्या किमतीवरून सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी संताप व्यक्त केला. यामुळे आता तरी या मुद्द्याची कायमची तड लागावी अशी अपेक्षा आहे. औषधांच्या किमती आणि इस्पितळांचे दर हा गोरगरिबांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. एका आजारपणाने घरदार उद्ध्वस्त होते व एकेक कुटुंब आयुष्याच्या शर्यतीत कायमचे मागे पडते, अशी उदाहरणे रोज दिसतात. त्यामुळे यावर इलाज करणे अत्यंत तातडीचे झाले आहे. सर्वोच्च न्यायालयापुढच्या सुनावणीदरम्यान कर्करोगावरच्या एका औषधाची मूळ किंमत २७०० रुपये असताना त्यावरची एमआरपी २७००० रुपये म्हणजे दहा पट दाखवलेली असल्याचे दाखवून देण्यात आले. म्हणजे उत्पादक कंपनी हे औषध २७०० रुपयांना विकत असताना रुग्णालये रुग्णांकडून २७००० रुपये वसूल करतात. हा एक हजार टक्के नफा झाला. असा नफा कदाचित अमली पदार्थांच्या बेकायदा धंद्यातही मिळत नसावा. आता ही लूट समोर आल्याने केंद्र सरकारला काहीतरी हालचाल करावी लागेल. पण हा प्रश्न केवळ कर्करोगाच्या एका औषधापुरता मर्यादित नाही. औषध नियंत्रण कायद्यानुसार बाजारातील एक हजार औषधांच्या किमतींवर सरकार नियंत्रण ठेवून आहे. त्यामध्ये कोणत्या औषधांवर किती नफा घ्यायचा, कमाल किंमत किती घ्यायची हे सरकार ठरवून देते. ही औषधे अत्यावश्यक म्हणून गणली जातात. मात्र प्रत्यक्षात रुग्णांना हजारो अन्य प्रकारची औषधे लागत असतात. बाजारात सध्या ६० हजार ब्रँड्स आहेत. त्यातील सुमारे ८२ टक्के औषधे सरकारच्या यादीत नाहीत. म्हणजेच ती नियंत्रणाच्या बाहेर आहेत. त्यामुळे औषध कंपन्या आणि रुग्णालये वाट्टेल त्या दराने ती विकत राहतात. अलिकडे बहुतांश रुग्णालयांची स्वतःची औषधांची दुकाने असतात व तिथे दाखल रुग्णांनी याच दुकानांमधून औषधे आणावीत अशी जवळपास सक्ती केली जाते. रुग्णांच्या नातेवाईकांनाही तिथल्या तिथे ही सेवा मिळत असल्याने ही व्यवस्था बरी वाटते. पण प्रत्यक्षात यामधूनच प्रचंड लूट केली जाते. किंबहुना, रुग्णालयांचे प्रचंड नफे याच दुकानांमधून येत असतात.

### इस्पितळांचे साटेलोटे

अलिकडे अंबानींपासून तमाम बड्या लोकांनी शहरांमधून कॉर्पोरेट रुग्णालये सुरू केली आहेत. यामध्ये पंचतारांकित हॉटेलांप्रमाणे रुम सर्व्हिस वगैरे दिली जाते. या प्रत्येक गोष्टीचा खर्च कित्येक पटीने वसूल केला जातो. आता सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीवरून हे दिसेल की औषधांच्या दुकानांमधूनही शेकडो पट नफा अशी रुग्णालये मिळवत असली पाहिजेत. हीच स्थिती साध्या साध्या गावातील डॉक्टरांनी सुरु केलेल्या छोट्या नर्सिंग होम्स किंवा इस्पितळांचीही आहे. या इस्पितळांची स्वतःची दुकाने नसतात. पण तेथील डॉक्टरांना विशिष्ट औषधे लिहून देण्याबद्दल प्रचंड कमिशन मिळत असावे असा तर्क करता येतो. याला अर्थातच अनेक सन्मान्य अपवाद असे डॉक्टर आहेत. ते रुग्णाला परवडेल अशा रीतीने औषधे देत असतात. पण ते वगळता इतर अनेकांच्या बाबतीत लुटीचा अनुभव येतो हेही खोटे नाही. औषधी कंपन्यांचे विक्रमी नफे, दुकानांचे फुटलेले पेव आणि इस्पितळे व या कंपन्या किंवा दुकाने यांचे संगनमत ही भयंकर अशी साखळी आहे. ती तोडण्यासाठी व तिला धडा शिकवण्यासाठी केंद्र तसेच राज्य सरकारांना जालीम उपाय करण्याचीच गरज आहे. अलिकडेच राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी या संदर्भात केंद्रीय यंत्रणांना एक पत्र लिहिले होते. त्यात त्यांनी दिलेली आकडेवारी धक्कादायक होती. सलाईन लावण्यासाठीच्या आयव्ही इन्फ्युजन सेटची उत्पादन किंमत ११ रुपये असताना त्याची बाजारातील छापील किंमत ३२५ रुपये आहे. नफ्याचे हे प्रमाण २२४१ टक्के होते. सिरींजची खरेदी किंमत ६.७५ रुपये असताना छापील किंमत ५७.२० रुपये आहे. कॅथेटरची किंमत तीस रुपये असताना तो ३१० रुपयांना विकला जातो. राष्ट्रीय किंमत नियंत्रण प्राधिकरणाने या राक्षसी नफ्यांवर नियंत्रण आणावे असे मुंढे यांनी सुचवले. अन्न आणि औषध प्रशासन भेसळीच्या संदर्भात कारवाई करू शकते. पण किमतीतील ही भेसळ रोखणे हे केवळ केंद्र सरकारी यंत्रणाच करू शकतात. मुंढे यांनी जाहीरपणे हे आवाहन केल्यानंतरही अजून याबाबत हालचाली झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे राजकारणी, सरकारी अधिकारी व औषधी कंपन्या यांचे काही साटेलोटे आहे की काय अशी शंका कोणी घेतली तर ती गैर मानता येणार नाही.

### 'न खाने दूंगा'चे काय झाले?

न खाऊंगा न खाने दूंगा अशी गर्जना करून नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले. पण त्यांच्या राज्यात गेल्या बारा वर्षात या लुटीबाबत काहीही केले गेलेले नाही. मधल्या काळात त्यांनी सर्वांसाठी आरोग्य विम्याची योजना आणली. त्याचा भयंकर गाजावाजा केला गेला. गरिबांच्या औषधोपचार तसेच इस्पितळांच्या खर्चाची रक्कम सरकार देईल अशी तरतूद झाली. पण यामुळे मुळावर घाव घातला गेला नाही. उलट औषध कंपन्यांच्या लुटीला सरकारने अप्रत्यक्ष हातभारच लावला. कारण या या कंपन्या किंवा दुकानदार ज्या किंमतीला औषधे वा सिरींजच्या नळ्या इत्यादी विकतील ते पैसे सरकारच्या खजिन्यातून दिले जातील अशी व्यवस्था झाली. या विमा योजनेचे पैसे वेळेवर मिळत नाहीत अशी रुग्णालयांची तक्रार आहे. सर्व आजार यामध्ये कव्हर होत नाहीत असे रुग्णांना वाटते. तरीही जो काही अब्जावधींचा खर्च केंद्र सरकार यामध्ये करीत आहे तो औषधी कंपन्या व रुग्णालयांसाठी मोठा तोहफाच आहे असे म्हणावे लागेल. सर्वोच्च न्यायालयातील ताज्या सुनावणीवरून तरी हाच निष्कर्ष काढावा लागेल. ही लूट थांबवण्याऐवजी सरकारने जेनेरिक औषधांच्या दुकानांचा एक उपाय पुढे आणला. त्यानुसार, मूळ ब्रँडेड औषधांऐवजी त्यांचीच ब्रँडवाली नसलेली स्वस्त आवृत्ती विकण्यात येऊ लागली. अगदी छोट्या गावांमधूनही ही जेनरिक औषधांची दुकाने उघडण्यात आली व त्यावर नरेंद्र मोदींचे फोटो लावण्यात आले. पण या दुकानांमध्ये ब्रँडेड औषधे देखील विकली जातात. कंपन्या औषधे तयार करण्यासाठी संशोधनासाठी काही खर्च करतात. तो गृहित धरून त्यांना विशिष्ट औषधांसाठी पेटंट बहाल केले जाते. त्याची नक्कल इतर कोणीही करू शकत नाही. हे पेटंट ठराविक वर्षांसाठी असते. त्यानंतर त्याच मिश्रणाचा वापर करून इतर कंपन्या हे औषध बनवू शकतात. त्याला जेनेरिक म्हणतात. अशा जेनेरिक औषधांचा दर्जा मूळ औषधांइतकाच असतो. मात्र आपल्याकडच्या एकूण जुगाड संस्कृतीमुळे अनेकदा पेटंट संपण्याआधीच दुसऱ्या कंपन्यांची अशी जेनेरिक औषधे बाजारात येतात. शिवाय त्यांच्यात भेसळही असू शकते. यावर सरकारचे खूपच कमी नियंत्रण असते. त्यामुळे जेनेरिक म्हणजे कमी दर्जाची औषधे असा एक समज प्रसृत झालेला आहे. याचा फायदा औषध कंपन्या घेतात व शेकडो टक्के नफे घेऊन आपली उत्पादने विकत राहतात. लोकांच्या जिवाशी खेळणारा हा धंदा बंद करण्याची हीच योग्य वेळ आहे. सर्वोच्च न्यायालयाने आता पुढाकार घेऊन सर्वच औषधांच्या किंमतीवर नियंत्रण आणता येईल अशी काहीतरी व्यवस्था निर्माण करायला हवी. याखेरीज सीरींज, हृदयविकारात टाकले जाणारे टेंट इत्यादींच्या किमतीतील नफेखोरीवरही चाप लावायला हवा. राष्ट्रीय कार्य क्रमांक एक समजून ही किमतीतील भेसळ रोखण्याची गरज आहे.

---

**विचार**

# आर्थिक बरकत, पण खासगी गुंतवणूक वाढेना

*अर्थमंत्री निर्मला सीतारामन देशातील खासगी उद्योगविश्वाला भांडवली गुंतवणूक वाढवण्याचे आवाहन सातत्याने करत आहेत. सरकारने पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणावर खर्च केला असून कररचनेत सुलभता आणली आहे. तरीही खासगी गुंतवणुकीचा वेग अपेक्षेइतका वाढत नाही. अर्थात हा प्रश्न केवळ आकडेवारीचा नसून भारतीय अर्थव्यवस्थेच्या संरचनेशी, उद्योगांच्या मानसिकतेशी आणि सरकारच्या धोरणांवरील विश्वासाशी संबंधित आहे.*



**हेमंत देसाई**

खासगी उद्योगपतींना गुंतवणूक करण्याचे आवाहन करणे ही सरकारची भूमिका असू शकते; पण केवळ आवाहन करून गुंतवणूक येत नाही. उद्योगपती भावनेने नव्हे, तर परतावा, जोखीम, बाजारपेठ, धोरणातील स्थैर्य आणि व्यवसाय सुलभता या निकषांवर निर्णय घेतात. सरकारने 'गुंतवणूक करा' असे सांगण्याऐवजी भारतामध्ये गुंतवणूक करणे फायदेशीर आणि सुरक्षित असल्याचा विश्वास निर्माण करणे अधिक महत्त्वाचे आहे. भारतामध्ये खासगी क्षेत्राची गुंतवणूक पूर्णपणे थांबलेली नाही. पोलाद, सिमेंट, वाहननिर्मिती, इलेक्ट्रॉनिक्स, अक्षय ऊर्जा, दूरसंचार आणि काही उत्पादनक्षेत्रांमध्ये मोठ्या प्रकल्पांची घोषणा होत आहे. पीएलआय योजनेमुळे काही उद्योगांना उत्पादनक्षमता वाढवण्यास प्रोत्साहन मिळाले आहे. पायाभूत सुविधांमध्ये सरकारी भांडवली खर्च वाढल्यामुळे सिमेंट, पोलाद, अभियांत्रिकी आणि बांधकामाशी संबंधित उद्योगांना मागणीही मिळत आहे; मात्र या गुंतवणुकीचा विस्तार अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांमध्ये समान प्रमाणात झालेला नाही. मोठ्या उद्योगसमूहांना सरकारच्या प्रोत्साहन योजना, मोठी बाजारपेठ, निर्यात संधी किंवा धोरणात्मक महत्त्व असलेली क्षेत्रे आकर्षित करतात; परंतु मध्यम उद्योग, लघुउद्योग आणि रोजगारनिर्मितीची मोठी क्षमता असलेल्या अनेक क्षेत्रांना अजूनही भांडवल, कर्ज, जमीन, कुशल मनुष्यबळ, तंत्रज्ञान आणि बाजारपेठेच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. म्हणजेच गुंतवणूक अपेक्षित वेगाने आणि व्यापक पातळीवर होत नाही, हा खरा मुद्दा आहे. भारतीय उद्योगसमूह परदेशात प्रकल्प उभारत आहेत याचा अर्थ भारत त्यांच्यासाठी आकर्षक राहिलेला नाही, असा सरळ निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.

जागतिक उद्योगव्यवस्थेत कंपन्या बाजारपेठेच्या जवळ जाणे, कच्च्या मालाचा स्रोत सुरक्षित करणे, निर्यात साखळी मजबूत करणे आणि जागतिक ग्राहकांपर्यंत पोहोचणे यासाठी विविध देशांमध्ये गुंतवणूक करतात, परंतु भारतातील कंपन्या देशाबाहेर गुंतवणूक का करतात, हा प्रश्न सरकारने गांभीर्याने विचारायला हवा. काही देशांमध्ये जमीन संपादन तुलनेने सोपे आहे. तिथे परवानग्या जलद मिळतात. कर आणि नियमनाचे नियम दीर्घकाळ स्थिर असतात. बंदरे, रेल्वे, वीज आणि लॉजिस्टिक व्यवस्था उद्योगांच्या गरजेनुसार विकसित केलेली असते. जागतिक पुरवठा साखळीतील कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी सरकारे थेट आणि स्पष्ट सवलती देतात. भारतीय अर्थव्यवस्थेने चालू आर्थिक वर्षाच्या, म्हणजेच एप्रिल ते जून २०२६ या काळात ७.८ टक्के इतकी वाढ नोंदवल्याचे केंद्र सरकारने जाहीर केले आहे. परंतु या आकडेवारीबाबत केंद्र सरकारचे माजी अर्थसचिव सुभाषचंद्र गर्ग यांनी शंका उपस्थित केली आहे. देशातील अर्थतज्ज्ञांमध्ये याबाबत उलटसुलट चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर त्यातल्या त्यात दिलासादायक बाब म्हणजे, जुलै २०२६ मध्ये भारताची विविध मालाची निर्यात २० टक्क्यांनी वाढून ४४ अब्ज डॉलर्सवर जाऊन पोहोचली. परंतु त्याच वेळी देशाच्या आयातीत १७ टक्के वाढ झाली आणि पश्चिम आशियातील संघर्षामुळे भारताचा आयातखर्च ७६ अब्ज डॉलर्सवर जाऊन पोहोचला. त्यामुळे देशाची व्यापारी तूट ३२ अब्ज डॉलर्सवर गेली आहे. हा गेल्या सहा महिन्यांमधील उच्चांक आहे.

व्यापारी तूट वाढते, तेव्हा परकीय गंगाजळीवर त्याचप्रमाणे विनिमय दरावर दबाव येतो. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्यंतरी वायफळ खर्च टाळा, गरज नसल्यास विदेश दौऱ्यावर जाऊ नये आणि सोने खरेदी करू नका, असे आवाहन केले. नोंदवण्याजोगी बाब म्हणजे पश्चिम आशियातील देशांमधील भारताची निर्यात स्थिरावली असून आग्नेय आशियाई देशांमधील आपली निर्यात टप्प्याटप्प्याने वाढत आहे. जुलैमध्ये संयुक्त अरब अमिराती, नेदरलँड्स, जर्मनी, दक्षिण आफ्रिका, टांझानिया, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, श्रीलंका, इटली, व्हिएतनाम या देशांमध्ये भारताच्या निर्यातीमध्ये लक्षणीय वाढ झाली. परंतु ब्रिटन, बांगलादेश, सौदी अरेबिया आणि नेपाळ या देशांमध्ये होणाऱ्या निर्यातवाढीचा वेग मंदावला. त्याचप्रमाणे रशिया, दक्षिण कोरिया, सिंगापूर, जर्मनी, ओमान, मलेशिया, तैवान आणि ब्राझील या देशांमधून भारतात होणारी आयात वाढली. वाहन उद्योगाचे भारतीय अर्थव्यवस्थेतील एकूण योगदान २२ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक राहिले असून, देशाच्या एकूण वस्तू आणि सेवा कर संकलनात या क्षेत्राचा वाटा १५ टक्के आहे. वाहन उद्योगातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे तीन कोटींपेक्षा अधिक रोजगार उपलब्ध झाले आहेत. तसेच संबंधित उद्योग आणि विस्तृत पुरवठा साखळीवर या क्षेत्राचा मोठा परिणाम झाला आहे. २०२५-२६ मध्ये देशांतर्गत बाजारपेठेसह वाहनांच्या निर्यातीतही या उद्योगाची कामगिरी दमदार राहिली आहे.

आज देशात इलेक्ट्रॉनिक वाहनांच्या स्वीकारार्हतेलाही वेग आला आहे. प्रवासी वाहने, दुचाकी आणि तीनचाकी या प्रमुख वाहन प्रकारांमध्ये २०२५-२६ मध्ये नव्या वाहनांच्या नोंदणीमध्ये ईव्हीचा वाटा दुहेरी अंकाने वाढला आहे. म्हणूनच वाहन उद्योगाला प्रोत्साहन देणारी आणखी कोणती उपाययोजना करता येईल, याचा सरकारने अवश्य विचार केला पाहिजे. चिंतेची बाब म्हणजे सरलेल्या आर्थिक वर्षात भारतातील खाजगी भांडवल गुंतवणुकीचे चक्र मंदावले असल्याचा निष्कर्ष बँक ऑफ इंडियाच्या संशोधन अहवालातून पुढे आला आहे. २०२५ मधील विक्रमी १२.३० लाख कोटी रुपयांच्या तुलनेत उद्योगांनी पाऊल मागे घेत २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये ११ लाख ९० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली; जी वार्षिक आधारावर २.८ टक्क्यांची घसरण दर्शवते. कोरोनाची साथ ओसरल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्था पुन्हा जोमात आली होती. त्यावेळी खाजगी गुंतवणूक लक्षणीयरीत्या वाढली होती. २०२४-२५ मध्ये तर तिने विक्रमी पातळी गाठली होती. २०१५ ते २०२६ या कालावधीत खाजगी भांडवली गुंतवणुकीमध्ये जवळपास अडीच पटीने वाढ झाली होती. परंतु अमेरिकेचे जबरी आयात शुल्क आणि अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण संघर्ष यामुळे ही भांडवली गुंतवणूक कमी झालेली दिसते. अर्थात केंद्र सरकारची प्रशासकीय धोरणे आणि अंमलबजावणी याचाही टक्का बसलेला असणार.

भांडवली खर्च आणि जीडीपी म्हणजे सकल राष्ट्रीय उत्पादन यांचे गुणोत्तर आर्थिक वर्ष २०२२ मधील २.९ टक्क्यांवरून वाढून आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ३.६ टक्क्यांवर गेले. परंतु आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ते घसरून ३.४ टक्क्यांवर आले आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण दर दोन महिन्यांनी खाजगी उद्योगपतींना भांडवल गुंतवणूक करण्याचे आवाहन करतात, पण त्याला प्रतिसाद मिळत नाही, उलट असंख्य उद्योगपती भारताऐवजी परदेशांमध्ये प्रकल्प उभारत आहेत. पोलाद, सिमेंट, अपारंपरिक ऊर्जा, वाहन उद्योग आणि उत्पादनाशी संलग्न प्रोत्साहन योजनेचा लाभ घेणाऱ्या निवडक उद्योगांमध्ये गुंतवणूक होत आहे. परंतु तरीही अन्य क्षेत्रांमध्ये त्या प्रमाणात गुंतवणूक होत असल्याचे दिसत नाही. शिवाय पायाभूत सुविधांमध्ये सरकारी गुंतवणुकीत वाढ होत असली, तरीदेखील अनेक ठिकाणी अशा सुविधांची अवस्था बिकट आहे. त्यामुळे पुण्यासारख्या शहरातदेखील अनेकदा वीज खंडित होत असते. हिंजवडी या आयटीनगरीमध्ये रस्त्यांची अवस्था बिकट असून पिंपरी-चिंचवड आणि चाकणमधील उद्योगांची अशीच अवस्था झाली आहे. तेथील उद्योजकांनी तक्रारी करूनदेखील कोणतीही सुधारणा झालेली नाही. त्यामुळे आम्ही या भागातून गाशा गुंडाळून अन्य शहरात वा परराज्यात जातो, असा इशाराही तेथील उद्योग संघटनांनी दिला आहे. म्हणूनच केंद्र आणि राज्यस्तरावर पायाभूत सुविधांच्या देखभालीकडे लक्ष देण्याची गरज आहे. असे असूनही मध्यम मुदतीसाठी भारताच्या गुंतवणूक चक्राचे चित्र आशादायी आहे, हे खरे.

हरित ऊर्जा, डेटा सेंटर, सेमीकंडक्टर, इलेक्ट्रॉनिक्स आणि संरक्षण या क्षेत्रांमुळे भारतात भविष्यात नवीन गुंतवणुकीच्या संधी निर्माण होतील, असा विश्वास जाणकारांना वाटतो. परंतु प्रकल्पांची अंमलबजावणी कार्यक्षमतेने व्हायला हवी, हेही खरे. भारतात ग्रामीण भागातील मागणी सुस्तावली असून, बड्या कंपन्यांचा आर्थिक ताळेबंद मजबूत असला, तरी त्यांच्या गुंतवणुकीत उल्लेखनीय वाढ झाल्याचे दिसून आलेले नाही. जुलैच्या तुलनेत ऑगस्ट २०२६ मध्ये भारतातील सेवा क्षेत्रातील वाढ ही दर चार वर्षांमधील नीचांकी स्तरानजीक राहिली असल्याचे नुकतेच आढळून आले आहे. अनेक कंपन्यांच्या मालाची मागणी कमी झाली असून स्पर्धादेखील वाढली आहे. अर्थव्यवस्थेतील या दोषांकडे अथवा बदलत्या वास्तवाकडे सरकारने लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

---

**चर्चा आजची**

# जबाबदारीने वापरल्यास मानवतेसाठी एआय वरदान

**सुयोग आंग्रे**

इतिहास साक्षी आहे की जेव्हा नवीन तंत्रज्ञान आले तेव्हा नवे स्वप्न आणि नवीन भीती दोन्ही घेऊन आले. विमाने आली तेव्हा रेल्वेत घबराट पसरली होती, ईमेलमुळे टपाल सेवेत घबराट पसरली होती, संगणक आल्यावर नोकऱ्या गेल्याच्या अफवा पसरल्या होत्या. आज आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच एआयच्या आगमनाने ते मानवतेसाठी धोकादायक ठरू शकते अशी भीती लोकांना वाटते. पण सत्य हे आहे की प्रत्येक तंत्रज्ञान आपल्यासोबत उपाय आणि समस्या दोन्ही घेऊन येतो.आपल्या दैनंदिन जीवनात त्याचा पूर्णपणे समावेश झाला आहे. स्मार्टफोन, ऑनलाइन खरेदी, औषध, शिक्षण, बँकिंग आणि पोलिसिंगपासून, एआय आपली राहण्याची आणि काम करण्याची पद्धत बदलत आहे. एआय तंत्रज्ञान अधिक शक्तिशाली होत असताना, एक महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो की एआय भविष्यात मानवजातीसाठी मोठा धोका बनणार आहे का? याचे थेट उत्तर होय किंवा नाही मध्ये देता येणार नाही. एआय स्वतः धोकादायक नाही. खरी समस्या ही आहे की मानव त्याचा विकास, नियंत्रण आणि वापर कसा करतो. मोबाईलने आम्हाला जोडले असताना, चुकीची माहिती पसरवण्याचे ते एक माध्यमही बनले. त्याचप्रमाणे, एआयचा वापर चांगल्या आणि वाईट दोन्हीसाठी देखील शक्य आहे.एआय हे मानवी इतिहासातील पहिले तंत्रज्ञान आहे ज्यात स्वतः विचार करण्याची, समजून घेण्याची आणि कृती करण्याची क्षमता आहे. अलिकडेच त्याचा गैरवापर आणि हॅकिंगची प्रकरणे समोर आली आहेत, त्यामुळे समाजात भीतीचे वातावरण वाढले आहे. पण काही अपघातांमुळे संपूर्ण तांत्रिक क्रांती थांबवणे शहाणपणाचे नाही.जर या प्रणालींची रचना योग्यरित्या केली गेली नाही किंवा त्यांना बँका, शस्त्रे किंवा गंभीर पायाभूत सुविधांमध्ये अनियंत्रित प्रवेश दिला गेला तर त्याचे परिणाम भयानक असू शकतात. अलिकडे, अशी प्रकरणे समोर आली आहेत जेव्हा एआयएजंट्सना, खाती आणि ओळखींवर अखंड प्रवेश दिला जातो, ते नियंत्रणाबाहेर गेले आणि वेबसाइट आणि सिस्टम हॅक करण्यास सुरुवात केली. दुसरी मुख्य चिंता नोकऱ्यांची आहे. एआयपूर्णपणे लोकांची जागा घेणार नाही, परंतु ते काम करण्याची पद्धत बदलेल. पुनरावृत्ती आणि सुलभ कार्ये स्वयंचलित होतील. याचा अर्थ सर्वजण बेरोजगार होतील असे नाही. इतिहास दाखवतो की नवीन तंत्रज्ञान नवीन संधी आणि नवीन व्यवसाय देखील आणते. समाजाने हे सुनिश्चित केले पाहिजे की लोकांना नवीन कौशल्ये शिकण्याची संधी मिळेल. यासोबतच खोटी माहिती पसरवणे हाही मोठा धोका आहे. एआयपूर्णपणे वास्तविक दिसणारी चित्रे, व्हिडिओ आणि ध्वनी तयार करू शकते. एआयचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी करता यावा यासाठी आपल्याला असे नियम आणि प्रणाली बनवाव्या लागतील. एआय हे विजेसारखे आहे जे सर्वत्र उपस्थित असेल आणि प्रत्येकावर परिणाम करेल. ज्याप्रमाणे विजेने जगाची रचना आणि कार्यपद्धती बदलली, त्याचप्रमाणे एआय आपले आणि भावी पिढ्यांचे जीवन बदलेल. भारतासारख्या देशात, जिथे अजूनही अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि रोजगाराची आव्हाने आहेत, तिथेएआय वरदान ठरू शकते. जे मूल शाळेत जाऊ शकत नाही ते मोबाईलवरएआय सह अभ्यास करू शकतात. एक शेतकरी आपले पीक उत्पादन वाढवू शकतो आणि एक तरुण नवीन स्टार्टअप तयार करू शकतो. इंडिया एआय इम्पॅक्ट समिटने हे देखील दाखवले की त्याचा योग्य वापर करून आपण जागतिक स्तरावर सकारात्मक बदल कसा आणू शकतो. तथापि, एआयचा विकास खूप वेगवान आहे आणि जागतिक स्तरावर अमेरिका आणि चीनमधील कंपन्या त्यात पुढे आहेत. भारत सरकारने त्याचा नैतिक आणि जबाबदार विकास सुनिश्चित करण्यासाठी एआय गव्हर्नन्स मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. तंत्रज्ञानाच्या इतिहासावरून असे दिसून येते की युद्धांमध्ये डायनामाइटसारखे नागरी तंत्रज्ञान वापरले गेले, तर अणुऊर्जेसारखे लष्करी तंत्रज्ञान वीज निर्मितीसाठी वापरले गेले. त्याचप्रमाणे, एआय देखील स्वतःमध्ये चुकीचे नाही. भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे वस्तू आणि सेवांचा पुरवठा वाढवणे आवश्यक आहे आणिएआय यामध्ये मोठी भूमिका बजावू शकते. एआयला अन्न किंवा राहण्यासाठी घराची गरज नाही, ते केवळ मानवाची उत्पादन क्षमता अनेक पटींनी वाढवू शकते. त्यामुळे एआयला घाबरण्याऐवजी ते समजून घेऊन त्याचा योग्य वापर करणे महत्त्वाचे आहे. युनायटेड नेशन्समध्येही त्याच्या सुरक्षित वापराबाबत जागतिक एकमत तयार केले जात आहे.एखाद्या राजकारण्याचा खोटा व्हिडिओ किंवा बनावट आवाजात पैशाची मागणी करणारा कुटुंबातील सदस्याचा कॉल किती नुकसान करू शकतो याची कल्पना करा. त्यामुळे समाजातील एकमेकांवरील विश्वास कमी होऊ शकतो. पण सर्वात मोठा धोका हा नाही की एआय अचानक दुष्ट होईल, तर खरा धोका मानवाच्या निष्काळजीपणाचा आहे. भविष्य एआय थांबवण्याबद्दल नाही तर जबाबदार एआय तयार करण्याबद्दल आहे. त्यासाठी सरकार, कंपन्या, शास्त्रज्ञ आणि सर्वसामान्य नागरिक यांना एकत्र काम करावे लागेल. आम्हाला कठोर सुरक्षा नियम, पारदर्शकता आणि मानवी देखरेखीची गरज आहे. आपण एआयच्या संभाव्यतेला जास्त महत्त्व देऊ नये आणि मानवांच्या बुद्धिमत्तेला कमी लेखू नये. शहाणपण आणि योग्य दिशा दाखवून आपण एआयच्या माध्यमातून एक मजबूत आणि समृद्ध भारत घडवू शकतो.

---

**लोकसंसद**

### जागतिक वारसा स्थळांच्या यादीत भारताची ७८ स्थळे!

युनेस्कोच्या संभाव्य जागतिक वारसा यादीत भारताच्या ५ नवीन स्थळांचा समावेश करण्यात आला असून यामुळे भारताची एकूण संख्या आता ७८ वर पोहोचली आहे. या ५ नवीन प्रस्तावित स्थळांमध्ये मध्य प्रदेशातील बाघ गुहा चित्रे; (चौथ्या ते सहाव्या शतकातील ९ बौद्ध लेण्यांचा समूह), चंबळ खोऱ्यातील मंदिर समूह; (आठव्या ते अकराव्या शतकादरम्यान बांधलेली नागरशैलीतील बटेश्वर, पदावली आणि काकरमठ येथील मध्ययुगीन मंदिरे), उदयगिरी गुहा; (गुप्त साम्राज्याच्या चौथ्या आणि पाचव्या शतकातील २० लेण्यांचा समूह. येथे भगवान विष्णूंचे प्रसिद्ध 'वराह' रूप आणि 'अनंतशयन' मूर्ती कोरलेली आहे) आणि गिन्नोरगड; (सोळाव्या ते अठराव्या शतकातील गोंड साम्राज्याचे, आदिवासी सांस्कृतिक वारशाचे प्रतीक) या ४ स्थळांचा समावेश आहे. तसेच सत्याग्रहाची ९ ठिकाणे हा भारत आणि दक्षिण आफ्रिकेचा एक संयुक्त आंतरराष्ट्रीय प्रस्ताव असून ज्यामध्ये महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या संबंधित भारतातील ७ ठिकाणे (महात्मा गांधी सत्याग्रह स्मारक; बिहार, साबरमती आश्रम, मणी भवन, हरीजन सेवक संघ, सेवाग्राम आश्रम, आगाखान पॅलेस, गांधी स्मृती) आणि दक्षिण आफ्रिकेतील २ ठिकाणे (पिटरमॅरिट्सबर्ग रेल्वे स्टेशन आणि फिनिक्स सेटलमेंट) समाविष्ट आहेत. जागतिक वारसा स्थळांच्या संभाव्य यादीतील भारताची संख्या ७८ वर पोहोचणे ही आनंदाची बाब असून लवकरच ही स्थळे अंतिम 'जागतिक वारसा स्थळे' म्हणून घोषित होतील अशी अपेक्षा आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

**दिनविशेष**

# जगावेगळे नेते

महात्मा गांधींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ आणि भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा जन्म याच पवित्र दिवशी २ ऑक्टोबर १९०४ रोजी झाला. आज जयंती दिवस. लाल बहादूर शास्त्री यांच्याबद्दल सर्वसामान्य माणसांना फारशी माहिती नाही. त्याचे कारण त्यांचा प्रसिद्धीपासून दूर राहण्याचा स्वभाव. सन १९९५ मध्ये म. गांधी वाराणशीत एका समारंभात साध्या वेषात बोलू लागले तेव्हा मॅट्रिकच्या वर्गात असलेला लाल बहादूर शास्त्री कान टवकारून त्यांचे भाषण ऐकत होता. गांधीजींचे भाषण म्हणजे देशभक्तीचा, लोकसेवेचा संदेश होता. देशाच्या हितासाठी, गोरगरिबांसाठी आपणही काही तरी केले पाहिजे, असे शास्त्रींना वाटू लागले. पूर्ण विचारांती त्यांनी



देशसेवेचा मार्ग धरला. जुलमी इंग्रजी सत्तेविरुद्ध म. गांधीजींनी पुकारलेल्या आंदोलनात ते सामील झाले. प्रकृतीने ठेंगणे, दुबले काहीसे बावले पण मनाने खंबीर व दृढनिश्चयी. त्याचा वेष साधा असे. नेत्यांची हाक येईल तेव्हा ते आंदोलनात उतरायचे. एरवी आपले शिक्षण ठेवायचे. काशी विद्यापीठात पदवी परिक्षेसाठी त्यांनी 'दर्शन' हा गहन विषय घेऊन 'शास्त्री' ही पदवी मिळवली. देशभक्त लाला लजपतराय यांच्या 'लोक सेवक समिती'मध्ये पाऊणशे रुपये पगारावर त्यांची समितीच्या सभासदपदी निवड झाली. म. गांधीजींनी दांडीयात्रा व मिठाच्या सत्याग्रहाने संपूर्ण देश खडबडून जागा केला. इंग्रज सरकारने दडपशाही सुरू केली. चळवळ करणाऱ्यांना तुरुंगात डांबले. लालबहादूर शास्त्रींना अडीच वर्षाची शिक्षा झाली. १९४२ पर्यंत शास्त्रीजी सातवेळा तुरुंगात गेले.त्यांनी एकूण नऊ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा भोगली. १९५२ सारी प्रथमच देशात सार्वत्रिक निवडणुका झाल्या. पं.नेहरूंच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सत्तारूढ झाली. शास्त्रीजींच्या निरलस सेवेचा गौरव करण्यासाठी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात घेऊन त्यांच्याकडे रेल्वे वाहतूक खात्याचे मंत्रीपद दिले. मंत्री असून त्यांनी दुसऱ्या किंवा तिसऱ्या डब्यातून प्रवास केला. त्या दरम्यान प्रवाशांच्या अडचणी, सोयी गैरसोयीची पाहणी केली. आपल्या कारकिर्दीत रेल्वे भाडेवाढ होऊ दिली नाही. झोपेसाठी राखीव जागा, विजेचे पंखे, जेवणाची बसल्या जागी सोय या सुधारणा त्यांनीच घडवून आणल्या. पण कधी कधी निसर्गाची किंवा देवाची अशा लोकप्रियतेला दृष्ट लागते. १९५६ सारी आंध्र व मद्रासमध्ये दोन मोठे अपघात झाले. सुमारे २६० लोक ठार झाले, अनेक जखमी झाले. ही आपल्या खात्याची जबाबदारी आहे म्हणून त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. पं. नेहरूंनी तो मोठ्या दुःखाने स्वीकारला. दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत, ४ एप्रिल १९६१ रोजी शास्त्रीजींनी गृहमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली. दोन सव्वादोन वर्षे त्यांनी गृहमंत्री म्हणून अतिशय कार्यक्षमतेने आणि कणखरपणे काम केले. पदावर येताच आसामी विरुद्ध बंगाली हा भाषिक वाद त्यांनी सर्व संमतीने सामोपचाराने सोडविला. तसेच मास्टर तारासिंग यांचे 'स्वतंत्र पंजाबी सुभा' हे आंदोलन कणखर भूमिका घेऊन हळूहळू अस्तंगत केले. १९६२ चीनचे आक्रमण. त्यावेळचे संरक्षण मंत्री कृष्ण मेनन यांच्या विरोधात साऱ्या देशात असंतोष पेटला होता. देशहित लक्षात घेऊन शास्त्रीजींनी मेनन यांना राजीनामा देण्यास लावा असा स्पष्ट सल्ला नेहरूंना दिला. आणि शास्त्रींचा सल्ला त्यांना मानावा लागला. पंडितजींनी मेनन यांचा राजीनामा स्वीकारला. श्री. यशवंतराव चव्हाण यांची संरक्षणमंत्रीपदी नेमणूक केली. योगायोग असा चीनेने युद्ध थांबवले.

पंडित जवाहरलाल नेहरूंचे २७ मे १९६४ रोजी निधन झाले. आणि फारसा बोलबाला नसलेल्या शास्त्रीजींची पंतप्रधानपदी नियुक्ती झाली. ९ जून १९६४ रोजी भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांचा शपथ विधी झाला. मंगळवार ११ जानेवारी १९६६ रोजी भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचे निधन झाले. लोकप्रियतेच्या शिखरावर विराजमान झालेला 'लाल तारा' अचानक निखळून पडला.

**- राजाराम भगत**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२ ऑक्टोबर
१) श्री.अलीम सत्तार शेख
श्रीबाग-२ अलिबाग
दि.२-१०-१९५२
२)श्रीम.मदुरा मदन मोरे
बाजारपेठ, अलिबाग
दि.२-१०-१९५५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते

**विश्वनाथ (विलास)**
**निगळ्ये, ठाणे**



**कै. दामोदर धर्मा पाटील, स्मरणार्थ अलिबाग**

## महात्मा गांधी

*मोहनदास करमचंद गांधी*
*देशाचे झालात तुम्हीं बापू*
*जागवली स्वातंत्र्य भावना*
*इंग्रजी सत्ता लागली कापू*
*हाती धरूनी झाडू*
*मार्ग तुम्हीं झाडियेला*
*स्वच्छतेचा दिलात मंत्र*
*पाजिले अमृत जनतेला*
*दांडी यात्रेचा केलात गजर*
*सत्य, अहिंसेचे हाती हत्यार*
*भारतीयांना दिला साहसाचा धीर*
*मीठाचा सत्याग्रह केलात अमर*
*'चले जाव'चा दिलात नारा*
*इंग्रजी सत्ता पुरी हादरली*
*लाठीचा सर्वत्र झाला मारा*
*अहिंसा जनतेमध्ये जागविली*
*दिले देशास स्वातंत्र्य मिळवून*
*स्वातंत्र्यासाठी रातदिन झटला*
*शांततेचे महान पुजारी तुम्ही*
*कवटाळले हसत हसत मरणाला*

*राजाराम भगत*
*मोठे शहापूर, अलिबाग*

# सूर्या प्रकल्पग्रस्तांना मिळणार न्याय

## ■ पालघरच्या नेवाळे, हनुमाननगरमधील जमिनींच्या फेरवाटपास मान्यता

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

पालघर जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पामुळे बाधित नेवाळे येथील सर्व्हे क्रमांक ६८ आणि हनुमाननगर येथील सर्व्हे क्रमांक ५ मधील शासनातर्फे करण्यात आलेल्या जमीन वाटपांची तपासणी करून, पात्र लाभार्थ्यांचे हक्क कायम ठेवण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या जमिनीचे वाटप १९७० मध्ये झाले होते. मात्र प्रत्यक्ष वहिवाटीनुसार सातबाऱ्यावर नोंद झाली नव्हती. या निर्णयामुळे फेरवाटप करून शेतकऱ्यांना सातबारा मिळणार आहे.



नेवाळे येथील सर्व्हे क्रमांक ६८ मधील जमीन भूमिहीन, शेतमजूर व स्वातंत्र्यसैनिकांना करण्यात आलेल्या वाटपाच्या १९७० च्या आदेशांमधील अटी व शर्तींची तपासणी करण्यात येणार आहे. ज्या प्रकरणांमध्ये अटी व शर्तींचा भंग झाला असून संबंधितांचा प्रत्यक्ष ताबा नाही, अशा प्रकरणांत सुनावणी घेऊन जमीन शासनखाती जमा करण्यात येईल. त्यानुसार संबंधित अधिकार अभिलेख रद्द करून दुरुस्त अभिलेख तयार करण्यात येतील. मात्र, वाटप आदेशानुसार त्यांना दिलेल्या क्षेत्राचा प्रत्यक्ष ताबा असल्यास संबंधितांच्या नावाची अधिकार अभिलेखात नोंद असल्यास त्यांचे हक्क कायम ठेवून फेरवाटप केले जाईल.

सूर्या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना नेवाळे व हनुमाननगर येथे पुनर्वसन विभागामार्फत करण्यात आलेल्या जमीन वाटपांच्या प्रकरणांचीही तपासणी करण्यात येणार आहे. वाटपाचे आदेश उपलब्ध असूनही ७/१२ उताऱ्यावर नावाची नोंद नसलेल्या आणि वाटप आदेशातील सर्व्हे किंवा गट क्रमांकापेक्षा अन्य ठिकाणी ताबा असलेल्या प्रकरणांत वाटप आदेशातील क्षेत्रानुसार ७/१२ वर नोंद घेण्यात येईल. वाटप आदेशापेक्षा अतिरिक्त क्षेत्र ताब्यात असल्यास ते अतिरिक्त क्षेत्र शासनखाती जमा करून संबंधितांच्या हक्काचे क्षेत्र कायम ठेवत फेरवाटपाचे आदेश देण्यात येतील. वाटप आदेश उपलब्ध नसले, मात्र ७/१२ वर संबंधितांची नोंद असल्यास ७/१२ वरील क्षेत्र आणि प्रत्यक्ष वहिवाट यांचा ताळमेळ घेण्यात येईल. ज्या प्रकरणांत वाटप आदेशही उपलब्ध नाहीत आणि ७/१२ वरही संबंधितांची नोंद नाही, मात्र प्रत्यक्ष वहिवाट आढळून येते, अशा प्रकरणांत उपलब्ध पुराव्यांची तपासणी केली जाईल. अशा अतिक्रमणांपैकी कुटुंब हा घटक गृहीत धरून कमाल २ एकरपर्यंतचे शेतीच्या वापरातील अतिक्रमण त्याच ठिकाणी विशेष बाब म्हणून नियमानुकूल करण्यात येणार आहे. या प्रक्रियेत महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर (एमआरएसएसी) च्या प्रतिमा तसेच भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) आणि ड्रोन सर्व्हेचा वापर करून भू-संदर्भित नकाशे तयार करण्यात येणार आहे.

# जागतिक कौशल्य स्पर्धेत महाराष्ट्राचा डंका

## ■ एका रौप्यसह तीन उत्कृष्टता पुरस्कारांवर कोरले नाव

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

चीनमधील शांघाय येथे नुकत्याच पार पडलेल्या 'वर्ल्डस्किल्स शांघाय २०२६' या जागतिक कौशल्य स्पर्धेत महाराष्ट्राच्या पाच युवा कौशल्यवंतांनी भारताचे प्रतिनिधित्व करत देदिप्यमान यश संपादन केले आहे. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी या स्पर्धेत एक रौप्यपदक आणि तीन 'मेडलियन ऑफ एक्सलेन्स' (उत्कृष्टता पुरस्कार) पटकावत महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीयस्तरावर नेले आहे. जागतिक स्तरावर महाराष्ट्राच्या युवा प्रतिनिधींनी मिळवलेले यश हे राज्याच्या कौशल्य विकास परिसंस्थेसाठी अभिमानास्पद आहे, अशा शब्दात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी विशेष कौतुक केले.

शांघाय येथे २२ ते २७ सप्टेंबर २०२६ दरम्यान आयोजित या स्पर्धेत जगभरातील ६८ देशांतील युवा कौशल्यवंत ६३ प्रकारच्या कौशल्यांमध्ये सहभागी झाले होते. भारतीय संघात समाविष्ट असलेल्या महाराष्ट्राच्या पाच प्रतिनिधींनी चमकदार कामगिरी केली. यामध्ये कोविड गंग्राडे याने डिजिटल इंटरॲक्टिव्ह मिडिया प्रकारात रौप्यपदक पटकावले. तर खुशराज राठोड (आयटी नेटवर्क एडमिनिस्ट्रेशन), संपदा देसाई (केमिकल लेबोरेट्री तंत्रज्ञान) आणि तहसीन सुतार (ब्युटी थेरपी) यांनी उत्कृष्टता पदक मिळवून भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.याशिवाय, महाराष्ट्राच्या हर्ष पवार याने ऑस्ट्रेलियात पार पडलेल्या 'ग्लोबल स्किल चॅलेंजस २०२६' मधील थ्री-डी डिजिटल गेम आर्ट या प्रकारात रौप्यपदक पटकावून उल्लेखनीय यश मिळवले.

जागतिक, राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करणाऱ्या या गुणवंतांसाठी राज्य शासनाकडून विशेष रोख पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. शांघाय व ऑस्ट्रेलिया स्पर्धेतील रौप्यपदक विजेत्या कोविड गंग्राडे आणि हर्ष पवार यांना प्रत्येकी ३ लाख रुपये तर उत्कृष्टता पदक विजेते: खुशराज राठोड, संपदा देसाई व तहसीन सुतार यांना प्रत्येकी १ लाख रुपयांचे पारितोषिक जाहिर केली आहेत.

# पैशांच्या वादातून दोघांना मारहाण

**खोपोली :** उसने घेतलेले पैसे परत मागितल्याचा राग अनावर झाल्याने तरुणाने कॅफेतच दोघांना मारहाण केली. ही घटना सोमवार दि.२८ सप्टेंबर रोजी रात्री पावणे दहाच्या सुमारास खोपोलीतील मोमोज कॅफे येथे घडली. अभिषेक कैलास परदेशी (वय २९, रा. यशवंत नगर, खोपोली) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयिताचे नाव आहे.

अक्षता प्रभाकर कदम (वय २६, रा. घोडवली) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, अभिषेकने अक्षता आणि साहिल गायकवाड यांच्याकडून पैसे उसने घेतले होते. सोमवारी रात्री तो कॅफेत आला असता, दोघांनी त्याच्याकडे उसने घेतलेले पैसे परत मागितले. मात्र, अभिषेक टाळाटाळ करीत असल्याने साहिलने त्याचा मोबाईल घेतला. मोबाईल घेतल्याचा राग अनावर झालेल्या अभिषेकने शिवीगाळ करीत कॅफेतील फायबर स्टूल काचेवर आपटले. अक्षताने याबाबत जाब विचारला असता, अभिषेकने तिच्या डोक्यात हाताच्या बुक्क्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. अक्षताला मारहाण होत असल्याचे पाहून साहिल मध्ये पडला असता, अभिषेकने हातातील लोखंडी कड्याने साहिलच्या कपाळावर आणि गालावर मारून त्याला जखमी केले.

या घटनेनंतर जखमी अक्षता कदम आणि साहिल गायकवाड यांनी खोपोली पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून अभिषेक परदेशी याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सुपारीच्या शंभर रोपांची लागवड

## ■ वासांबे ग्रामपंचायतीचा स्तुत्य उपक्रम

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

'स्वच्छता ही सेवा' अभियान तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत ग्रामपंचायत वासांबे-मोहोपाडा यांच्या वतीने मोहोपाडा आळी-आंबिवली परिसरात सुपारीच्या शंभर रोपांची लागवड करण्यात आली.

'झाडे जगवा, झाडे वाचवा' या उद्देशाने तसेच सेवा संकल्प अभियानांतर्गत ग्रामपंचायतीतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला. ग्रामपंचायत वासांबे-मोहोपाडा सरपंच उमाताई संदिप मुंढे यांच्या हस्ते सुपारीच्या रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य केदार भोईर यांच्यासह ग्रामपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते. लागवड करण्यात आलेल्या सर्व रोपांची नियमित देखभाल व संगोपन ग्रामपंचायतीचे कर्मचारी आणि सदस्य करणार आहेत. त्यामुळे या उपक्रमातून परिसरातील हरित क्षेत्र वाढण्यास तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होणार आहे. ग्रामपंचायतीच्या या पर्यावरणपूरक आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# महिलांना कौशल्याची नवी दिशा

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

ग्रुप ग्रामपंचायत वासांबे (मोहोपाडा) येथील ग्रामपंचायत सभागृहात मंगळवारी (दि.२९) 'कौशल्य विकासातून आर्थिक स्वावलंबनाकडे' या महिला कौशल्य विकास व आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अल्काइल अमाइन्स केमिकल्स लिमिटेड यांच्या सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) अंतर्गत २८ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. महिलांना कौशल्याच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करून स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने



आयोजित या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या प्रशिक्षणामध्ये वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायत हद्दीतील महिलांना शिवणकलेचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांना स्वतःचे कौशल्य विकसित करून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करता याव्यात आणि कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात हातभार लावता यावा, यावर विशेष भर देण्यात आला.

प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी प्रशिक्षणार्थी महिलांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी अल्काइल अमाइन्स केमिकल्स लिमिटेडच्या सीएसआर निधीतून ग्रामपंचायतीला आधुनिक शिलाई मशीन भेट देण्यात आल्या.

## बबन राजिवले यांचे निधन

**खांब :** रोहा तालुक्यातील वरसगावचे रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते बबन रामजी राजिवले यांचे शनिवार दि.२६ सप्टेंबर रोजी निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ६८ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे, दोन भाऊ, एक बहीण, पुतणे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी सोमवार दि.५ आक्टोबर रोजी, तर अंतिम धार्मिकविधी बुधवार दि.७ ऑक्टोबर रोजी राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या कुटुंबियांकडून देण्यात आली.



# साबळे पतसंस्थेची वार्षिक सभा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

लोकनेते अशोक दादा साबळे ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची २३वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २७ सप्टेंबर रोजी संस्थेच्या कार्यालयात उत्साहात पार पडली. यावेळी चेअरमन अरुण पवार यांनी सभासदांशी संवाद साधत संस्थेच्या २५ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला. सभासदांचा विश्वास, संचालक मंडळाचे मार्गदर्शन आणि कर्मचारीवर्गाची मेहनत यामुळे संस्थेने प्रगतीची वाटचाल कायम ठेवली असल्याचे त्यांनी सांगितले. तर सभासदांनी संस्थेवर ठेवलेला विश्वास, प्रेम आणि आपुलकी हीच संस्थेची खरी ताकद असल्याचे चेअरमन अरुण पवार यांनी आपल्या मनोगतात नमूद केले.



संस्थेच्या योग्य व्यवस्थापनामुळे आणि वेळोवेळी घेतलेल्या आवश्यक निर्णयांमुळे संस्थेने उल्लेखनीय प्रगती साधली आहे. संस्थेचे संपूर्ण संगणकीकरण करण्यात आले असून पीएमजी एजंट, पीएमजी कलेक्शन मशीन तसेच क्यूआर कोडची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे सभासदांना बँकिंग व्यवहार अधिक सुलभ झाले असून संस्थेचा कारभार अधिक गतिमान, पारदर्शक आणि आधुनिक झाला आहे. संस्थेच्या आर्थिक शिस्तीची आणि नियोजनबद्ध कारभाराची दखल घेत पतसंस्थेला 'अ' लेखापरीक्षण वर्ग मिळाल्याबद्दल सभेत संचालक मंडळ व कार्यकारिणीचे अभिनंदन करण्यात आले. संस्थेने स्थापनेपासून नफ्यात राहण्याची परंपरा जपली असून, इतर कोणत्याही बँकेकडून कर्ज न घेता स्वबळावर कारभार उभा केला आहे. भविष्यात स्वतःची मालकीची भव्य इमारत उभारण्याचे स्वप्नही सभासदांच्या सहकार्याने साकार करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी सह्याद्री बाजारचे माजी चेअरमन तथा रिक्षा संघटनेचे अध्यक्ष संजय साबळे यांनी केलेल्या सामाजिक योगदानाबद्दल त्यांचा संस्थेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. तसेच संस्थेचे हितचिंतक मारुती मालोरे आणि रवींद्र पारखे यांचाही सत्कार करण्यात आला.

## सेवानिवृत्तांच्या संघटनेची सभा

**श्रीवर्धन :** रायगड जिल्हा सेवानिवृत्तांच्या संघटनेची २०२५-२६ची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दि.३० सप्टेंबर रोजी श्रीवर्धन येथील कुळकर्णी हॉलमध्ये पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष धुरंधर मढवी तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते अशोक मापुस्कर उपस्थित होते. यावेळी मढवी, मापुस्कर व २०-२२ वर्षे श्रीवर्धन शाखेची धुरा समर्थपणे सांभाळलेल्या रोहिणी क्षीरसागर आदिंचा सन्मान करण्यात आला. तसेच जिल्ह्यातील पदाधिकारी, तालुका अध्यक्षांचाही सत्कार करण्यात आला.

**कामोठ्यात 'बाल वाचन चळवळ'** | **एकता सामाजिक संस्थेचा उपक्रम**

# चला, पुस्तकांच्या विश्वात पुन्हा रमूया!

**। खांदेश्वर । प्रतिनिधी ।**

मोबाईलच्या छोट्या पडद्याने आज लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच आपल्या कवेत घेतले आहे. या बदलत्या परिस्थितीत पुन्हा एकदा पुस्तकांशी मैत्री करण्याचा संदेश देण्यासाठी एकता सामाजिक संस्थेच्या वतीने 'बाल वाचन चळवळ' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

'या दिवाळीत मोबाईल-टीव्हीला देऊ सुट्टी... पुस्तकांशी करूया घट्ट मैत्री!' असा संदेश देत या उपक्रमातून वाचनाची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. विशेष म्हणजे हा उपक्रम केवळ लहान मुलांपुरता मर्यादित नसून पालक, तरुण, ज्येष्ठ



नागरिक आणि वाचनप्रेमी अशा सर्वांसाठी खुला असणार आहे.

आज एकाच घरात बसलेले कुटुंबीय वेगवेगळ्या मोबाईलच्या पडद्यामध्ये हरवलेले दिसतात. पूर्वी घरामध्ये गोष्टी सांगितल्या जायच्या, पुस्तके वाचली जायची, वर्तमानपत्रावर चर्चा व्हायची; मात्र आता या सवयी कमी होत चालल्या आहेत. त्यामुळे पुस्तक वाचन आणि मोबाईल पाहणे यातील फरक समजून घेण्याची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर कामोठ्यात निसर्गाच्या सान्निध्यात सकाळी ७ ते ११ या वेळेत वाचनाचा आनंद घेण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. मुलांना त्यांच्या बालपणाची आठवण करून देणारे 'चांदोबा', 'चंपक', विविध गोष्टींची पुस्तके, साहसकथा आणि संस्कारकथा वाचण्यासाठी मिळणार आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील संतपरंपरा, विविध महापुरुषांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग, त्यांच्या संघर्षाच्या कथा आणि समाजासाठी केलेले कार्य मुलांना वाचता तसेच ऐकता येणार आहे. त्यामुळे पुस्तकांमधून केवळ मनोरंजन नव्हे, तर इतिहास, संस्कार, विचार आणि प्रेरणाही मुलांपर्यंत पोहोचणार आहे.

या उपक्रमाचे खरे यश केवळ काही मुलांनी पुस्तके वाचण्यात नसून, कामोठ्यातील प्रत्येक कुटुंबाने, पालकांनी, तरुणांनी आणि ज्येष्ठ नागरिकांनी या चळवळीत सहभागी होण्यात आहे. पालकांनी स्वतः पुस्तक हातात घेतले तर मुलेही त्याचे अनुकरण करतील. त्यामुळे 'मुलांनी वाचावे' एवढेच नव्हे, तर 'आपण सर्वांनी वाचावे' हा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे. पालकांनी आपल्या मुलांना या उपक्रमात सहभागी करून घ्यावे, घरातील जुनी पण चांगली पुस्तके इतर मुलांसाठी उपलब्ध करून द्यावीत, तसेच वाचनासाठी आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# निवडक



## वरोसे येथे कापडी पिशव्यांचे वाटप

**रसायनी :** वासांबे मोहोपाडा जिल्हा परिषद विभागातील वरोसे येथे गुरुवारी (दि.१) जन शिक्षण संस्थान (जे.एस.एस.) रायगड यांच्या वतीने 'कापडी पिशवी वाटप व स्वच्छता जनजागृती' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सामान्य नागरिकांमध्ये स्वच्छता, आरोग्य, विविध शासकीय योजना तसेच कौशल्य विकासाबाबत जनजागृती निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे यांच्या उपस्थितीत प्रशिक्षणार्थींना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी प्लास्टिकचा वापर टाळणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे आवाहन करण्यात आले. उपस्थित प्रशिक्षणार्थींना कल्पना म्हात्रे यांच्या माध्यमातून स्वच्छतेची शपथ देण्यात आली. संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर आणि संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यात दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत स्वच्छता ही सेवा उपक्रमांतर्गत विविध स्वच्छताविषयक जनजागृती कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात येत आहेत.



## अमोल पाटील यांना पुरस्कार

**रेवदंडा :** अलिबाग तालुक्यातील पेझारी गावचे सुपुत्र अमोल आत्माराम पाटील (बुवा) यांच्या गेल्या ३५ वर्षांपासून भजन क्षेत्रासह ऑर्केस्ट्रा व महफिल क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची तसेच समाजसेवेतील कार्याची दखल घेत बी. द चेंज फाउंडेशन, शिर्डी यांच्या वतीने त्यांना 'महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. शिर्डी येथील साई पालखी निवारा, साईबाबा मंदिर परिसर येथे रविवारी (दि.२७) राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. अमोल पाटील यांनी गेली ३५ वर्षे भजन क्षेत्रात सातत्याने योगदान देत ऑर्केस्ट्रा व महफिलीच्या माध्यमातूनही आपल्या कलेचा ठसा उमटविला आहे. तसेच सामाजिक कार्यातही त्यांनी योगदान दिले आहे. त्यांच्या या दीर्घकाळाच्या कार्याची दखल घेत मिळालेल्या या पुरस्कारामुळे पेझारी गावासह अलिबाग तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. अमोल पाटील यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## 'जेन-झी आंदोलन' पोस्टर प्रदर्शन

**मुंबई :** दिल्लीसह देशाच्या विविध भागांत तरुणाई अर्थात 'जेन-झी' पिढीने रस्त्यावर उतरून विविध प्रश्नांवर आवाज बुलंद केला. विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाची देशभर चर्चा झाली. या आंदोलनात वापरण्यात आलेल्या अनोख्या आणि प्रभावी पोस्टर्सचे विशेष प्रदर्शन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त, २ ऑक्टोबर रोजी मुंबईतील टिळक भवन येथील महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे नवनियुक्त प्रभारी डॉ. सिरीवेल्ली प्रसाद यांच्या हस्ते होणार आहे. पेपरफुटीच्या प्रश्नावर विद्यार्थ्यांनी दिल्लीतील जंतरमंतरसह देशाच्या विविध भागांत आंदोलन केले. विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाला त्यांच्या सर्जनशील आणि उपरोधिक पोस्टर्समुळे विशेष प्रसिद्धी मिळाली. या पोस्टर्समधून विद्यार्थ्यांनी शिक्षण व्यवस्था, पेपरफुटी, बेरोजगारी आणि तरुणांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे भाष्य केले. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध मागण्यांसाठी सरकारवर दबाव निर्माण केला. या आंदोलनातील वैशिष्ट्यपूर्ण पोस्टर्सची सर्वत्र चर्चा झाली होती. त्याच पोस्टर्सचे संकलन करून हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. २ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार आहे.



## समाधान म्हात्रे यांना पुरस्कार

**उरण :** ग्रीन वर्ल्ड आणि जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात साई भवानी एंटरप्रायझेसचे संचालक तथा उरण तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते समाधान म्हात्रे यांना 'आयकॉनिक लिडर ऑफ महाराष्ट्र' या पुरस्काराने गौरविण्यात आले. पुणे येथील ॲड. शार्दूलराव सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल २, नऱ्हे पुणे येथे हा पुरस्कार सोहळा पार पडला. समाधान म्हात्रे यांना मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला ज्ञानेश्वर खिलारे अतिरिक्त आयुक्त जमा बंदी आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), उदय बोरावके कृषी उद्योजक तसेच कृषी व कृषी संलग्न अभ्यासाचे प्रसारक आणि डॉ. पराग काळकर प्र. कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच ॲड. शैलेंद्र जाधवर, उपाध्यक्ष जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट आणि लेखक गौतम कोतवाल, अध्यक्ष लीड जीडब्ल्यू फाउंडेशन तथा संचालक राजगुरुनगर सहकारी बँक लि.तसेच महिला सामाजिक कार्यकर्त्या मीना जगदाने यांचीही उपस्थिती होती.

## विठोबा खराडे यांचे निधन



**कोलाड :** रोहा तालुक्यातील पुई गावचे रहिवासी विठोबा नाना खराडे यांचे शनिवारी (दि.२६) निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८० वर्षे होते. ते प्रेमळ व शांत स्वभावाने सर्वांना परिचित होते. तसेच सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय होते. त्यांच्या मृत्यूची वार्ता समजताच त्यांच्या अंत्यदर्शनासाठी त्यांचे नातेवाईक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्षेत्रातील नागरिक तसेच समस्त पुई ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, तीन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे व मोठा खराडे परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवार दि.५, तर उत्तरकार्य विधी गुरुवार दि.८ ऑक्टोबर रोजी पुई येथील त्यांच्या निवासस्थानी होणार आहेत.

# मांगुर पालनामुळे पाताळगंगा प्रदूषित

## तलावातील दुर्गंधीयुक्त पाणी नदीत; मृत मासे जाळल्याने परिसरात दुर्गंधी

**| खोपोली | प्रतिनिधी |**

पाताळगंगा नदीला रासायनिक प्रदूषणाचा विळखा असतानाच आता नदीकिनारी सुरू असलेल्या कथित बेकायदेशीर मांगुर मासेपालनामुळे प्रदूषणात आणखी भर पडत असल्याची तक्रार स्थानिकांकडून होत आहे. महड, धामणी, पौध, कोपरी आणि मोहपाडा परिसरात मोठ्या प्रमाणात मांगुर मासेपालनासाठी तलाव तयार करण्यात आले असून, या तलावांतील दुर्गंधीयुक्त पाणी ठराविक कालावधीनंतर नदीपात्रात सोडले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे.



### नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम

पाताळगंगा नदीचे पाणी परिसरातील नागरिकांकडून विविध दैनंदिन गरजांसाठी वापरले जाते. त्यामुळे दूषित व दुर्गंधीयुक्त पाणी नदीत मिसळत असल्यास त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. साथीचे आजार पसरण्याची शक्यताही नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

मांगुर माशांना खाद्य म्हणून प्रामुख्याने कोंबड्यांचे टाकाऊ अवशेष वापरले जात असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. हे खाद्य तलावात कुजल्याने पाणी मोठ्या प्रमाणात दूषित होऊन दुर्गंधी निर्माण होते. तलावापासून सुमारे एक ते दीड किलोमीटरपर्यंत या दुर्गंधीचा त्रास जाणवत असल्याचे नागरिक सांगतात.

> “महड देवस्थान परिसरात मांगुर माशांचे तलाव असल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत आहे. तलावातील घाण व मृत माशांमुळे परिसरातील नागरिक तसेच भाविक त्रस्त झाले आहेत. याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन कारवाईची मागणी करणार आहोत.”
>
> –गीता पाटील
> महड ग्रामस्थ

पावसाने सध्या विश्रांती घेतल्याने पाताळगंगा नदीची पाणीपातळी कमी झाली आहे. त्यामुळे नदीकिनारी असलेल्या तलावांमधून येणाऱ्या दुर्गंधीचा त्रास अधिक तीव्रतेने जाणवत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यातच तलावातील मृत मासे जाळले जात असल्याने महड गाव, मंदिर परिसर, खालापूर, सावरोली पूल आणि धामणी परिसरात हवेतून दुर्गंधी पसरत आहे.

मांगुर पालनावर बंदी असल्याचे सांगितले जात असतानाही नदीकिनारी मोठ्या प्रमाणावर त्याचे संवर्धन सुरू असल्याचा आरोप होत आहे. या प्रकारामुळे नदीच्या प्रदूषणात भर पडत असताना संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष होत असल्याने स्थानिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड आणि मत्स्य विभागाने या संपूर्ण प्रकाराची तातडीने पाहणी करून मांगुर पालन करणाऱ्या तलावांची तपासणी करावी, तसेच तलावातील पाणी नदीपात्रात सोडले जात आहे का, मृत मासे कुठे व कशा पद्धतीने नष्ट केले जातात, याची चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# निवडक



## महानगरपालिकेत गुलाब पुष्पाने स्वागत

**खांदा कॉलनी :** पनवेल महानगरपालिकेच्या स्थापनेला १ ऑक्टोबर रोजी दहा वर्षे पूर्ण झाली. वर्धापन दिनानिमित्त महापालिका कार्यालयात येणाऱ्या नागरिकांचे प्रवेशद्वारावर गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. मात्र, हे स्वागत करण्याची जबाबदारी महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या कर्मचाऱ्यांकडे असल्याचे पाहायला मिळाले. महापालिका कार्यालयात प्रवेश करणाऱ्या नागरिकांना महाराष्ट्र सुरक्षा बलाचे कर्मचारी गुलाबाचे फूल देत वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देत होते. नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले असले, तरी महापालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त नागरिकांचे स्वागत करण्यासाठी महापालिकेने स्वतःच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती का केली नाही, असा प्रश्न यावेळी काही नागरिकांकडून उपस्थित करण्यात आला. महापालिकेला दहा वर्षे पूर्ण झाल्याने वर्धापन दिन हा प्रशासनासाठी तसेच नागरिकांसाठी महत्त्वाचा दिवस आहे. या निमित्ताने नागरिकांशी थेट संवाद साधण्याची आणि त्यांचे स्वागत करण्याची संधी महापालिका कर्मचाऱ्यांना देता आली असती, अशी चर्चा महापालिका परिसरात होती.

## पनवेलमधून ४३ वर्षीय इसम बेपत्ता

**पनवेल :** पनवेल मधील तक्का येथील मोराज रिव्हरसाइड पार्क येथून सचिन विलास सुर्यगंध (४३) हे बेपत्ता झाले आहेत. याप्रकरणी त्यांच्या पत्नी नमिता सुर्यगंध यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. सचिन सुर्यगंध हे बीएमसी, मुंबई येथे कामाला जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडले. मात्र, त्यानंतर ते घरी परतले नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यांचा शोध घेऊनही ते न सापडल्याने पनवेल शहर पोलीस ठाण्यात मिसिंग नोंद करण्यात आली. बेपत्ता सचिन यांचा रंग सावळा, उंची सुमारे ५ फूट ६ इंच, मध्यम बांधा, गोल चेहरा असून डोक्याचे केस काळे-पांढरे आहेत. घरातून बाहेर पडताना त्यांनी निळ्या रंगाचा टी-शर्ट, काळी पॅन्ट आणि चप्पल परिधान केली होती. ते मराठी व हिंदी भाषा बोलतात.सचिन सुर्यगंध यांच्याबाबत कोणाला माहिती मिळाल्यास पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस अंमलदार तेजश्री काशिद करीत आहेत.

## अलिबाग येथे डाक अदालतीचे आयोजन

**अलिबाग :** अधीक्षक डाकघर, रायगड विभाग, अलिबाग यांच्या कार्यालयामार्फत दि. ०९ ऑक्टोबर रोजी, दुपारी ठीक दुपारी ०३.०० वाजता अधीक्षक डाकघर, रायगड विभाग, अलिबाग येथे डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे. रायगड विभागातील डाक सेवेसंबंधित ज्या तक्रारी/समस्या ६ आठवड्यांच्या कालावधीत निकाली काढण्यात आलेल्या नाहीत, अशा टपाल, स्पीड पोस्ट, काऊंटर सेवा, बचत बँक, मनीऑर्डर आदी सेवांशी संबंधित तक्रारींचा डाक अदालतीमध्ये विचार करण्यात येईल. तक्रारीमध्ये सविस्तर माहिती जसे की तक्रारीचा दिनांक, ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार दाखल केली त्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा आदी माहिती असणे आवश्यक आहे. इच्छुक ग्राहकांनी आपली तक्रार २ प्रतींमध्ये, अधीक्षक डाकघर, रायगड विभाग, अलिबाग यांच्याकडे दिनांक ०७ ऑक्टोबरपर्यंत पोहोचेल अशा रीतीने पाठवावी. त्रैमासिक होणारी डाक अदालत आता दरमहा होणार आहे. दि.०९ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात येणारी डाक अदालत ही या उपक्रमाची दुसरी डाक अदालत असेल. त्यानंतर दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी दुपारी ०३.०० वाजता डाक अदालत आयोजित करण्यात येईल, ज्या महिन्यात पहिल्या समोवारी पब्लिक हॉलिडे येईल त्या महिन्यात दुसऱ्यादिवशी डाक अदालत घेतली जाईल. याचे स्वतंत्र वेळापत्रक दिले जाईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी असे सांगण्यात आले आहे.

## बसफलकावर म्हसळा स्थानकाचे नाव गायब

**म्हसळा :** श्रीवर्धन आगारातून धावणाऱ्या काही एसटी बसच्या नामफलकावर ‘म्हसळा’ स्थानकाचे नाव नमूद नसल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. म्हसळा हे श्रीवर्धनकडे जाणाऱ्या मार्गावरील




महत्त्वाचे स्थानक असतानाही बसच्या फलकावर त्याचा उल्लेख नसल्याने बाहेरगावाहून येणाऱ्या प्रवाशांना बस नेमकी कुठे थांबणार, याबाबत संभ्रम निर्माण होत असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. बसच्या नामफलकावर मार्गावरील प्रमुख स्थानकांची नावे स्पष्टपणे नमूद करावीत, तसेच म्हसळा हे तालुक्याचे ठिकाण असल्याने स्थानकाचे नाव ठळकपणे दर्शवावे, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.एसटी प्रशासनाने याची दखल घेऊन बसच्या नामफलकांमध्ये आवश्यक सुधारणा करावी, अशी अपेक्षा प्रवाशांनी व्यक्त केली आहे.


## क्लासिफाईड
**जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी**

- **नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे: रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन २ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (३ जागा), ओरिएंटल कुक १ जागा, इंडियन चायनीज कुक १ जागा, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा WhatsApp वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२
- **अलिबाग एसटीस्टॅन्डजवळ** दुकान गाळा विक्री करणे आहे. संपर्क : ९७६४५४८६७९
- **झेरॉक्स दुकानात मराठी टायपिंगसाठी** मुलगी पाहिजे. संपर्क : ९९२१५५०१२९
- जन्नावार हॉस्पीटल चेंढरे अलिबागमध्ये कामासाठी मावशी, स्टाफ नर्ससाठी जागा आहे. संपर्क : ७७९८० ३४५०९
- **Vacancy for Store Manager in furniture Store** Experience in Sales - 5+ years, Salary - 40,000 per Mouth, Location Zirad. Contact - 9823585321
- **Vacancy in Furniture Factory as a office boy/girl,** Education - Graduation, Experience 3-4 years,Salary 20,000 per month, Location : Bamansure, Chondli. Contact - 9823585321.

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

नशा मुक्त युवक फॉर विकसित भारत या अभियानांतर्गत मेरा स्वास्थ्य, मेरा गर्व-माझे आरोग्य, माझा अभिमान या संकल्पनेखाली जेएसएम महाविद्यालय, अलिबाग येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे, नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व पटवून देणे तसेच निरोगी व व्यसनमुक्त युवक घडविणे हा या शिबिराचा प्रमुख उद्देश होता. या शिबिरामध्ये वैद्यकीय अधिकारी अमित सोनवणे, गणेश सुतार, कल्पना गाडे यांनी विद्यार्थ्यांची विविध आरोग्य तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील, उपप्राचार्य डॉ. प्रविण गायकवाड, प्रा. अश्विनी आठवले, डॉ. पंकज घरत उपस्थित होते.



जनता शिक्षण मंडळ, अलिबागचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी युवकांनी आपल्या आरोग्याची काळजी घेत व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन प्राचार्या डॉ. सोनाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. प्रविण गायकवाड, प्रा. अश्विनी आठवले आणि डॉ. पंकज घरत यांनी केले. निरोगी युवा-व्यसनमुक्त युवा-विकसित भारत या संदेशातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य, स्वच्छता, व्यसनमुक्ती आणि सामाजिक जबाबदारीबाबत सकारात्मक जाणीव निर्माण करण्यासाठी हे शिबिर महत्त्वपूर्ण ठरले.

# ‘वृक्षलागवड मानवाच्या भविष्याची गरज’

**| माणगाव | प्रतिनिधी |**

मानवाच्या जीवनात निसर्गाचे स्थान अनन्यसाधारण आहे. निसर्गाने माणसाला जगण्यासाठी हवा, पाणी, अन्न यांसोबतच वृक्षरूपी अमूल्य देणगी दिली आहे. मात्र, या वृक्षांचे खरे महत्त्व आपण अजूनही पूर्णपणे जाणलेले नाही. त्यामुळे वृक्षलागवड, संवर्धन आणि त्यांची जोपासना ही केवळ आजची गरज नसून मानवाच्या पुढील पिढ्यांच्या सुरक्षित भविष्यासाठीची मोठी जबाबदारी आहे, असे प्रतिपादन नक्षत्रवनचे संस्थापक दीपक जोशी यांनी श्रीवर्धन-म्हसळा येथे आयोजित कार्यक्रमात केले. ‘नक्षत्रवन’ आणि ‘श्री स्वामी समर्थ संस्कार केंद्र’ यांच्या माध्यमातून जोशी हे प्रत्येक व्यक्तीच्या जन्मनक्षत्राशी संबंधित वृक्षांची लागवड करण्याबरोबरच त्या वृक्षांचे मानवी जीवनातील महत्त्व लोकांना समजावून सांगत आहेत. वृक्ष केवळ लावणे नव्हे, तर त्यांची काळजी घेणे, त्यांचे संवर्धन करणे आणि पुढील पिढीपर्यंत त्यांचे महत्त्व पोहोचवणे, हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू आहे.म्हसळा तालुक्यातील वडघर-पांगलोली येथे विविध प्रकारची तब्बल ३५०० झाडे लावून जोशी यांनी निसर्ग संवर्धनाचे अनोखे कार्य उभे केले आहे. या झाडांशी त्यांचे केवळ पर्यावरणीय नव्हे, तर भावनिक नाते निर्माण झाले आहे.

# भांडण सोडविण्यास गेलेल्याच्या डोक्यात मारली बाटली

**| पनवेल | प्रतिनिधी |**

बहिणी आणि मेहुण्यामध्ये सुरू असलेले भांडण सोडविण्यास गेलेल्या २२ वर्षीय महिलेच्या डोक्यात बिअरची बाटली मारून तिला जखमी केल्याची घटना कृष्णाळे तलाव परिसरात घडली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रिती पटनी (२२, रा. कृष्णा तलाव, जुने पनवेल) या बहिणीचे भांडण सोडविण्यास गेल्या असता मेहुणा गणेश चौहान (३०) याने बिअरच्या बाटलीने त्यांच्या डोक्यात मारल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच आकाश काळे (२९) याने लाथाबुक्क्यांनी पोटात मारहाण केली. बहीण अंजली गणेश चौहान (२८) हिने खांद्याला चावा घेतल्याचेही फिर्यादीने सांगितले. या मारहाणीत प्रिती जखमी झाल्या असून, बहिणीच्या मोबाईलचेही नुकसान झाल्याचा आरोप आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिन्ही आरोपींना अद्याप अटक झालेली नसून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुशांत दृड्डे करीत आहेत.

# वाजेकर महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय विद्यार्थ्यांना पोलीस व पॅरामिलिटरी सेवांमध्ये करिअरच्या विविध संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने यावर्षीपासून सुरू करण्यात आलेल्या Short Term Course in Police Paramilitary Training या प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे उद्घाटन पार पडले.



यावेळी विक्रम बारी यांनी विद्यार्थ्यांना पोलीस भरतीच्या लेखी परीक्षेची पूर्वतयारी तसेच परीक्षेच्या कालावधीत अभ्यासाचे नियोजन व तयारी कशी करावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. लेखी परीक्षेसाठी विषयवार अभ्यास, वेळेचे नियोजन, सराव प्रश्नपत्रिका सोडविणे आणि नियमित उजळणीचे महत्त्व सांगितले. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शारीरिक क्षमता, शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्वगुण तसेच स्पर्धात्मक परीक्षांसाठी आवश्यक असलेल्या विविध कौशल्यांचा विकास करण्याची संधी मिळणार आहे.

याप्रसंगी न्हावाशेवा पोलिस स्टेशनचे घनश्याम पाटील, विक्रम बारी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, एलसीसी अधिकारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संबंधित विभागाने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक कोर्सचे समन्वयक डॉ. आर. डी. कांबळे यांनी केले तर सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. योगेश कुलकर्णी यांनी केले.

# जवाद काझी यांची निवड

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल एज्युकेशन सोसायटीच्या अँग्लो उर्दू हायस्कूल, बारापाडाच्या अध्यक्षपदी जवाद काझी यांची निवड झाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल पनवेल महानगरपालिकेचे अब्दुल काझी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी काझी यांच्या हातून उत्तम कार्य घडावे, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.

# सांगुर्ली शाळेची यशोगाथा राष्ट्रीय संकेत स्थळावर




**| पनवेल | प्रतिनिधी |**

शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमांतर्गत पनवेल तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या सांगुर्ली शाळेची यशोगाथा राष्ट्रीय स्तरावरील संकेतस्थळावर प्रकाशित झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराच्या मानकरी आणि शाळेच्या मुख्याध्यापिका मानसी मिलिंद भोसले यांनी लिहिलेल्या या यशोगाथेत ग्रामीण भागातील शाळेचा शैक्षणिक परिवर्तनाचा प्रेरणादायी प्रवास उलगडण्यात आला आहे.

शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२५-२६ मध्ये सामग्री व मजकूर निर्मिती या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रातील निवडक १०० शाळांच्या प्रेरणादायी यशोगाथांची निवड करण्यात आली. शालेय शिक्षण अधिकाऱ्यांच्या माध्यमातून संकलित करण्यात आलेल्या या यशोगाथा राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था आणि राष्ट्रीय शालेय नेतृत्व केंद्र, नवी दिल्लीच्या राष्ट्रीय संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आल्या आहेत.

या उपक्रमामध्ये पनवेल तालुक्यातील सांगुर्ली जिल्हा परिषद शाळेच्या यशोगाथेलाही स्थान मिळाले आहे. हुशार व प्रतिभावान विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण देणाऱ्या शाळेची यशोगाथा या शीर्षकाखाली ही यशोगाथा प्रकाशित करण्यात आली आहे. या यशोगाथेत शाळेचा विकास व परिवर्तन, आदर्श शाळा निर्मिती, नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांच्या प्रवेशात झालेली वाढ, पालकांचा सहभाग, स्थानिक समुदायाचा सहभाग तसेच विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांवर विशेष प्रकाश टाकण्यात आला आहे.




# शेतकऱ्यांसाठी गोपीनाथ मुंडे अपघात सुरक्षा योजना

। चिरनेर । प्रतिनिधी ।

शेती व्यवसाय करताना होणाऱ्या अपघातांमुळे शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांवर आर्थिक संकट ओढाऊ नये, यासाठी राज्य सरकारने स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी भूमीहीन शेतमजूर महिला शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना जाहीर केली आहे. या योजनेचा लाभ वहीतीधारक खातेदार शेतकऱ्यांसह भूमिहीन शेतमजूर, महिला शेतकऱ्यांनाही मिळणार आहे. योजनेत वहीतीधारक खातेदार शेतकरी, भूमिहीन शेतमजूर आणि महिला शेतकरी तसेच त्यांच्या कुटुंबातील आई-वडील, पती, पत्नी, मुलगा, अविवाहित मुलगी, घटस्फोटीत मुलगी, विधवा मुलगी यांचा समावेश करण्यात आला आहे. १० ते ७५ वर्ष वयोगटातील पात्र सदस्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास संबंधित लाभार्थी अथवा कायदेशीर वारसदार सानुग्रह अनुदानासाठी पात्र ठरणार आहेत. ही योजना १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०३१ या पाच वर्षाच्या कालावधीत राबविण्यास शासनाने म ान्यता दिली आहे. संबंधितांनी विलंब न करता तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

---

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक १४१/२०२५

श्रीमती मानसी महादेव घाणेकर वगैरे ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही ... सामनेवाला

सर्व लोकांना या जाहीर नोटीस द्वारे असे कळविणेत येते की, श्रीमती मानसी महादेव घाणेकर आणि श्री. मयूर महादेव घाणेकर हे कै. महादेव सदाशिव घाणेकर यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे नावे वारस दाखला मिळणेकरीता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ अन्वये अर्ज केला आहे.

सदर अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही कै. महादेव सदाशिव घाणेकर यांना कायदेशीर वारस नाहीत असे अर्जदार यांचे कथन आहे.

अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणी कै. महादेव सदाशिव घाणेकर यांचे अन्य कोणीही वारस असल्यास त्यांनी या न्यायालयांत दिनांक ०५/११/२०२६ रोजी सकाळी १०-३० वाजता समक्ष अगर योग्य ते अधिकार व माहिती दिलेल्या प्रतिनिधीमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे.

दिनांक ०५/११/२०२६ रोजी या जाहीर नोटीसला अनूसरुन अन्य कोणीही आपला हक्क अधिकार सांगितला नाही तर हे न्यायालय अर्जदार याचे लाभात वारस दाखल जारी करणेची पुढील कार्यवाही करेल याची सर्वानी नोंद घ्यावी.

आज रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व माझे सहीनिशी जाहीर केले.

अलिबाग

(कोर्टाचा शिक्का)

अधिक्षक,
दिवाणी न्यायालय,
वरिष्ठ स्तर,अलिबाग

---

## शुद्धीपत्रक

तमाम जनतेस या शुद्धीपत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे की, ता. १/१०/२०२६ रोजीचे दैनिक कृषीवलचे पान नं.७ वर मौजे म्हात्रोळी येथील मिळकतीबाबत प्रसिद्ध झालेल्या जाहीर नोटीसीमध्ये मिळकतीच्या मालकांचे नाव 'भाविका निमिश सोलावाला' असे चुकीचे छापण्यात आले आहे. त्याऐवजी ते दुरूस्त करून 'भाविका निमिश सोनावाला' असे वाचण्यात यावे.

नोटीसीतील उर्वरित मजकूर जसाच्यातसा वाचण्यात यावा.

अलिबाग
तारीख : २/१०/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग', को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे पोटल ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे विद्यमान मालकांकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहेत सदर जमिन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे पोटल, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ६६ | ३ | ०-२८-८० | २-८४ |
| ६६ | ४ | ०-२७-३० | २-८९ |
| ६६ | ६/अ | १-३४-८० | ४-९५ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०२/१०/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**वृषाली देविदास पाटील**
फ्लॅट नं. ६०४, निळकंठ व्हॅली,
खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड ४१०२०३
मो. ८०८७५७५७८९

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे साळोख तर्फे नीड आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे विद्यमान मालक दिपक रघुनाथ कोतेकर यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहेत सदर जमिन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे साळोख तर्फे नीड आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ११ | ५ | ०-२८-३० | ५-१२ |
| १२ | ३ | १-१५-६० | २०-०० |
| १३ | ६ | ०-२६-५० | ४-०० |
| १८ | २/अ | ०-४३-०० | ७-१२ |
| १८ | ३ | ०-४१-५० | ७-१२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०२/१०/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**वृषाली देविदास पाटील**
फ्लॅट नं. ६०४, निळकंठ व्हॅली,
खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड ४१०२०३
मो. ८०८७५७५७८९

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पुनाडे, ता. उरण, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १३०/१८६ | एकूण क्षेत्र ०-६२-०० हे.आर | ८.३१ |
| १३१/३६ | एकूण क्षेत्र ०-५५-९० हे.आर | ३.०० |
| १३०/१६२ | एकूण क्षेत्र ०-४९-३० हे.आर | ६.६२ |

वरील क्षेत्रापैकी मंजुळा हिरा उर्फ हिराजी पाटील याचे हिश्याचे ०-२३-८७ हे.आर एवढे क्षेत्र वगळून

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-२/१०/२०२६

सही
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

---

दिनांक : ०२ ऑक्टोबर २०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.- पॉ. | रुपये | पैसे |
| भुषण यशवंत जाधव | ९ | ८/अ | ०-५७-७० | ० | ६९ |
| | ९ | ९ | ०-०८-०० | ० | ०५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. अशोक मारुती कोकणे**
मो.नं. ७०५८७७८६५३
दिनांक :-०२/१०/२०२६

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे नेवाळी, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही माझे अशिल यांनी दि.२०/१२/२०२४ रोजीचे नोंदणीकृत खरेदीखताने मालकीहक्काने कायमस्वरूपी विकत घेतलेली आहे. सदर खरेदी खताचा दस्त क. पवल /४/२२०८८/२०२४ असा आहे. तरी खरेदीखत माझे अशिलांचे लाभात नोंदणी करतेवेळी श्रीमती. गंगाबाई सखाराम फडके व श्रीमती. रमाबाई पदु पाटील हे अनुपस्थित होते. त्यांना वेळोवेळी सांगून सुद्धा ते सह निबंधक ऑफिस येथे खरेदीखत नोंदणी करणेकामी हजर राहिले नाहीत. याउलट उर्वरीत मालक यांनी माझे अशिलाचे लाभात खरेदीखत नोंदणी करून दिलेले आहे.

**वरीलप्रमाणे परीशिष्ट**
**मौजे नेवाळी, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| मिळकत मालकाचे नाव | गट नं. व उपविभाग क्र | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १. श्री. गणपत सोमा काथारा<br>२ श्रीमती गंगाबाई सखाराम फडके<br>३ श्रीमती. रमाबाई पटु पाटील<br>४ श्रीमती आनु लक्ष्मण भोईर<br>५ श्रीमती. फाशीबाई आत्माराम फडके<br>६. श्री. शशी आत्माराम फडके<br>७ श्री. विजय वसंत काथारा<br>८ श्री. मच्छिंद्र वसंत काथारा<br>९ श्री. कांता वाघाराम पाटील<br>१० श्रीमती. बेबी जनार्दन उलवेकर<br>वरील सर्व रा. मौजे- नेवाळी, ता. पनवेल, जि. रायगड | २७/१ | एकुण क्षेत्र ०-०३-३० | ०.४४ |

तरी सर्व जनतेस कळविण्यात येते की, वर परीशिष्टात वर्णन केलेली मालमत्ता ही माझे अशिल यांनी विकत घेतलेने माझे अशिल यांचे हक्क, हितसंबंध व अधिकार गुंतलेले आहेत. तरी सदरहू मालमत्ता बाबत कोणीही श्रीमती. गंगाबाई सखाराम फडके व श्रीमती. रमाबाई पदु पाटील यांच्याबरोबर समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, भाडेपट्टा, सब लीज, अंडर लीज, लियन किंवा इतर कुठल्याही प्रकारचा व्यवहार करू नये आणि इतर कुठल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो माझे अशिल यांच्यावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०२/१०/२०२६

**श्री. किशोर धाकड**
ॲडव्होकेट
ऑफिस नं. २१, म्युनिसिपल कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके चौकाजवळ नाट्यगृह, पनवेल, ता. पनवेल, ४१०२०६
Email-Kishordhakad@yahoo.co.in
मो.नं. ९८६७०५१३३०

---

दिनांक : १/१०/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. बाळकृष्ण गोविंद खेर यांच्या सांगण्यावरून सदर नोटीस प्रसिद्ध करण्यात येते की, कै. गोविंद आत्माराम खेर यांनी रजिस्टर खरेदीखताने विकत घेतलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती मौजे कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड येथे आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १) कामार्ले | नवीन गट नं. ४३<br>जुना स.नं. १९/३<br>२०/२, २०/३ | ०-३९-३०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण ०-४०-८० | ५-४० |
| २) कामार्ले | नवीन गट नं. ३१<br>जुना स.नं. २२/५ अ व २३ | ०-१५-३०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-१५-८० | १-३५ |
| ३) कामार्ले | नवीन गट नं. ११४/२<br>जुना स.नं. ७/१ | ३-७९-००<br>पो.ख. १-११-००<br>एकूण ४-९०-०० | ५-६९ |
| ४) कामार्ले | नवीन गट नं. ४८<br>जुना स.नं. १४/० | ८-८१-००<br>पो.ख. १-६५-००<br>एकूण १०-४६-०० | १५-८७ |
| ५) कामार्ले | नवीन गट नं. ४७<br>जुना स.नं. १६/० | ०-३८-३०<br>पो.ख. ०-०४-००<br>एकूण ०-७२-३० | ८-९४ |
| ६) कामार्ले | नवीन गट नं. ४६<br>जुना स.नं. १७/०<br>१७/१, १७/२ | ०-३३-९०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण ०-३५-४० | २-०६ |
| ७) कामार्ले | नवीन गट नं. ४४<br>जुना स.नं. १९/४ | ०-१४-२०<br>पो.ख. ०-०४-००<br>एकूण ०-१८-२० | ०-१६ |
| ८) कामार्ले | नवीन गट नं. ४०<br>जुना स.नं. २१/१ | ०-०५-६०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-०६-१० | ०-३१ |

वरील वर्णनाच्या मिळकती आमचे अशिल बाळकृष्ण गोविंद खेर यांचे वडील कै. गोविंद आत्माराम खेर यांनी दि. १४/०७/१९४७ कायदेशीररित्या नरसिंह उर्फ नरसिंग देशपांडे यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेतलेल्या आहेत. नरसिंह उर्फ नरसिंग देशपांडे यांनी त्या मिळकती न्यायालयातून झालेल्या दरखास्तीच्या कामी लिलावातून विकत घेतल्या होत्या.

कै. गोविंद यांना त्यांच्या पश्चात आमचे अशिल श्री. बाळकृष्ण, भरत, जयश्री, शशिप्रभा उर्फ शशिकला ही चार मुले तसेच सुलोचना ही पत्नी असे वारस आहेत. दरम्यानच्या काळात सुलोचना यांचाही मृत्यू झाला आहे. साहजिकच आई वडिलांच्या मृत्युनंतर सदरची मिळकत मालकी हक्काने आमचे अशिलांचेकडे आलेली आहे. तिच्याशी अन्य कोणाचाही कसलाही संबंध नाही. आमचे अशिलांना सदर मिळकतीस अन्य इसमांनी त्यांची नावे सातबारा उताऱ्यास बेकायदेशीररित्या लावून घेतल्याची बाब काही दिवसापूर्वी समजली आहे. त्यामुळे त्याबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई आमचे अशिलांनी चालू केली आहे. सदरची मिळकत ही आमचे अशिलांच्याच ताबेकब्जात व वहिवाटीत आहे.

सदर मिळकतीवर आमचे अशिलांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नव्हता व नाही. मात्र मिळकतीचे सातबाऱ्यावर नाव असल्याचा गैरफायदा घेऊन संबंधित उषा वैभव कुलकर्णी अथवा त्यांचे वालीवारस नोकर चाकर, एजंट सदर मिळकतीत अन्य त्रयस्थ इसमांचे हक्क हितसंबंध निर्माण करण्याची शक्यता आहे. त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार म्हणजेच साठेकरार, खरेदीखत, सामंजस्य करार, भाडेकरार वा अन्य कसल्याही प्रकारचा व्यवहार वर नमूद इसमांसोबत अथवा त्यांचे वतीने अन्य कोणासोबतही करू नये याउपर कोणीही वरील मिळकतीबाबत कसल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार बेकायदेशीर होईल व तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०१/१०/२०२६

सही/-
**ॲड. प्रविण मधुकर ठाकूर**
जिल्हा व सत्र न्यायालय
रायगड-पनवेल/अलिबाग

---

दिनांक : ०२ ऑक्टोबर २०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - शिंगढोळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| प्रियंका मनोज ओसवाल | १ | १८ | १-४८-०० | ० | ८९ |
| | या पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र हे ० आर ८४ पॉ ०० मात्र. | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- ०२/१०/२०२६

---

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे वावे, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक यांचेकडून विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदर मिळकती निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) | मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| वावे<br>ता.मुरूड<br>जि.रायगड | ४२/३ | क्षेत्र ०.४०.००<br>पो.ख ०.००.००<br>एकुण ०.४०.००<br>पैकी<br>क्षेत्र ०.१६.००<br>पो.ख ०.००.००<br>एकुण ०.१६.०० | ७.३५<br><br><br><br>२.९४ | १) जितेंद्र पद्माकर वर्तक<br>२) विलास चांगदेव दिवकर<br>३) सुजित सदानंद पाटील<br>४) संदेश दत्ताराम नाईक<br>५) प्रितम रमेश चौलकर |
| वावे<br>ता.मुरूड<br>जि.रायगड | ४२/३ | क्षेत्र ०.४०.००<br>पो.ख ०.००.००<br>एकुण ०.४०.००<br>पैकी<br>क्षेत्र ०.२४.००<br>पो.ख ०.००.००<br>एकुण ०.२४.०० | ७.३५<br><br><br><br><br>४.४१ | निदा समीर दाते |

तरी वरील मिळकतींच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व विनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक २९/०९/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

---

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे बागदांडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री.रमाकांत पांडुरंग पाटील, राहणार मुंबई, यांच्या खुद्द मालकीची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री.रमाकांत पांडुरंग पाटील, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बागदांडा, ता.अलिबाग, | २५ | ०-३२-१०<br>०-००-५० पो.ख.<br>०-३२-६० एकूण | ४-५६ |

अलिबाग,
दिनांक : ०१/१०/२०२६

सही /-
**(ॲड.महेश प्र.वेंगुर्लेकर)**
मोतीबाग, जिल्हा न्यायालया समोर
टिळक रोड, अलिबाग, ता.अलिबाग,
जि. रायगड. खरेदीदारांचे वकील

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे आसलपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|
| | | | रुपये | पैसे |
| परशुराम मालू शेंडे, ममता अनंता शेंडे, रघुनाथ मालू शेंडे, सावित्रीबाई मालू शेंडे, सुमन पांडुरंग डायरे, निराबाई परशुराम आगिवले, जिजाबाई पंढरीनाथ ठोंबरे | १४/४/ब | १.५४.०० गुंठा | ०.७० | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता: गणेश कृपा बिल्डींग फ्लॅट नंबर २०१ गारपोली पोस्ट कोषाणे
ता.कर्जत, जि.रायगड.४१०१०१
दिनांक :- ०१/१०/२०२६

सही /-
**ॲड. दामिनी अरुण बासरे उर्फ गायकर**
मो.नं.९७६७६३६०५२

---

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे आसलपाडा, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| श्री राजाराम शिवाजी रसाळ | १७/२/क | ००-४०-०० हे.आर.पॉ | ०-६९ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कुळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०१/१०/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

---

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे मुरूड, ता.मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक परेश चंद्रकांत साळी यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| मुरूड<br>ता.मुरूड<br>जि.रायगड | २४१/३ | क्षेत्र ०.४७.००<br>पो.ख ०.०६.००<br>एकुण ०.५३.०० | ०.३१ |

वर नमुद मिळकतीपैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे क्षेत्र ०.३८.०० हे.आर पो.ख ०.०४.०० एकुण क्षेत्र ०.४२.०० हे.आर, आकार ०.२५ रू.पैसे

तरी वरील मिळकतींच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करारमदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व विनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २९/०९/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो.झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं.९८२२१८६७४०

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक विक्रम एस चोक्सी यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे शिलार तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|
| २१/८/ए | एकुण क्षेत्र ०-६३-०० हे आर पॉ |
| २१/९ | एकुण क्षेत्र २-१५-०० हे आर पॉ |
| २९/९० | एकुण क्षेत्र ०-५७-०० हे आर पॉ |
| २१/१८ | एकुण क्षेत्र ०-०६-०० हे आर पॉ |
| २१/१९ | एकुण क्षेत्र २-४७-०० हे आर पॉ |

**मौजे शिलारवाडी तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|
| ५०/३ | एकुण क्षेत्र ०-४५-५० हे आर पॉ | ५२/२/अ | एकुण क्षेत्र ०-४०-०० हे आर पॉ |
| ५२/२/ब | एकुण क्षेत्र ०-५२-०० हे आर पॉ | ५२/३ | एकुण क्षेत्र ०-४६-०० हे आर पॉ |
| ५२/८ | एकुण क्षेत्र १-३८-०० हे आर पॉ | ५२/९ | एकुण क्षेत्र ०-७१-०० हे आर पॉ |
| ५२/११ | एकुण क्षेत्र १-३४-०० हे आर पॉ | ५२/१२ | एकुण क्षेत्र ०-५१-०० हे आर पॉ |
| ५२/१३ | एकुण क्षेत्र ०-५४-०० हे आर पॉ | ५२/१४ | एकुण क्षेत्र ०-१०-०० हे आर पॉ |
| ५२/१६ | एकुण क्षेत्र ०-२२-०० हे आर पॉ | ५३/२ | एकुण क्षेत्र ०-४१-०० हे आर पॉ |
| ५३/३ | एकुण क्षेत्र ०-०३-०० हे आर पॉ | ५३/५ | एकुण क्षेत्र ०-३४-०० हे आर पॉ |
| ५३/६/अ | एकुण क्षेत्र ०-८६-०० हे आर पॉ | ५३/६/ब | एकुण क्षेत्र ०-८८-०० हे आर पॉ |
| ५३/७ | एकुण क्षेत्र ०-३५-०० हे आर पॉ | ५३/८ | एकुण क्षेत्र ०-८३-०० हे आर पॉ |
| ५३/९ | एकुण क्षेत्र ०-३२-०० हे आर पॉ | ५३/१० | एकुण क्षेत्र ०-८७-०० हे आर पॉ |
| ५२/१०/ब | एकुण क्षेत्र ०-२२-०० हे आर पॉ | ५३/४ | एकुण क्षेत्र ०-६७-०० हे आर पॉ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०१/१०/२०२६

खरेदीदारातर्फे वकील **ॲड.निलेश कान्हु मोरे**
**मोबा. ९८२२६९११०९**
पत्ता - दहिवली तर्फे नीड तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
मोबाईल : ९८६०६५८५६५

**गणेश चतुर्थी पासून सुरु झालेल्या गणेशोत्सवाची सांगता अनंत चतुर्दशीला झाली. त्यानंतर मंगळवार दि.२९ सप्टेंबर रोजी आलेल्या अंगारकी संकष्टी चतुर्थीला रायगड जिल्ह्यात साखर चौथीच्या म्हणजेच गौरा गणपतीचे आगमन झाले. साधारणतः दीड दिवस, अडीच दिवस, पाच दिवस तर काही ठिकाणी अकरा दिवसांच्या मुक्कामानंतर या बाप्पाला निरोप दिला जाणार आहे. रायगड जिल्ह्याच्या उत्तर भागात हा साखर चौथीचा गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. रायगड जिल्ह्यात उरण, पनवेल, पेण, कर्जत, अलिबाग या तालुक्यांमध्ये हा उत्सव साजरा केला जातो. गावातील सार्वजनिक ठिकाणांसह मंदिरांच्या प्रांगणात मोठमोठे मंडप, आकर्षक रोषणाई, सांस्कृतिक कार्यक्रम, भव्य दिव्य विसर्जन मिरवणूक ही या गणेश उत्सवाची ओळख बनली आहे.**

# ‘रेवदंड्याचा राजा’च्या चरणी गाव एकवटले

**निलेश फुंडे**
**। रेवदंडा ।**

सण-उत्सव हे केवळ धार्मिक परंपरेचे प्रतीक नसतात, तर ते समाजातील एकजूट, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा जपणारे संस्कारमंच असतात. रेवदंडा नगरीत यंदा साजरा झालेला साखरचौथीचा ‘‘रेवदंड्याचा राजा’’ उत्सव याच सामाजिक ऐक्याचे आणि लोकसहभागाचे जिवंत उदाहरण ठरला. उत्सवाच्या यशामागे कोणत्याही एका व्यक्तीचा वाटा नसून, मंडळातील प्रत्येक सदस्य, कार्यकर्ता, वर्गणीदार आणि रेवदंड्यातील नागरिकांच्या सामूहिक सहभागाची ही यशोगाथा असल्याची भावना मंडळातील पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

यंदा ‘‘रेवदंड्याचा राजा’’ आपल्या १५ व्या वर्षात पदार्पण करत असताना उत्सवाला नागरिकांकडून अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. गणेशोत्सवाच्या प्रारंभापासून विसर्जनापर्यंत प्रत्येक क्षण भक्तिभाव, उत्साह आणि सामाजिक ऐक्याने भारलेला होता. मंडप उभारणीपासून सजावट, विद्युत रोषणाई, सांस्कृतिक कार्यक्रम, शिस्तबद्ध व्यवस्थापन, स्वच्छता, सुरक्षा आणि विसर्जन मिरवणुकीपर्यंत प्रत्येक कामात कार्यकर्त्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. विशेष म्हणजे, संपूर्ण उत्सव नागरिकांनी स्वखुशीने दिलेल्या लोकवर्गणीतून पार पडला. कोणत्याही प्रकारची कमतरता न भासता सर्व कार्यक्रम यशस्वीपणे पार पडणे, ही रेवदंडेकरांच्या विश्वासाची आणि मंडळावरील प्रेमाची पावती ठरली. गावातील ज्येष्ठ, तरुण, महिला आणि बालगोपाळ अशा सर्वच स्तरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



मंडळातील निलेश खोत यांनी सांगितले की, ‘‘आम्ही सर्वजण केवळ निमित्तमात्र आहोत. हा उत्सव घडवून आणणारा खरा सूत्रधार म्हणजे आपला गणराया. बाप्पाच्या कृपेने आणि सर्वांच्या सहकार्याने हा उत्सव यशस्वी झाला. मंडळातील प्रत्येक सदस्याने स्वतःची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली. त्यामुळेच हा उत्सव सर्वांच्या मनात घर करून गेला.’’

यंदाच्या उत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सर्वधर्मसमभाव आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन. विविध धर्म, जाती आणि समाजघटकांतील नागरिकांनी कोणताही भेदभाव न ठेवता ‘‘रेवदंड्याचा राजा हा आपला बाप्पा’’ मानत उत्सवात सहभाग घेतला. गावातील अनेक ठिकाणी बाप्पाचे स्वागत फुलांची उधळण, हार अर्पण आणि जयघोषाने करण्यात आले. या प्रसंगी रेवदंडा नगरी भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाली होती. दीड दिवसांच्या गणरायाच्या विसर्जन मिरवणुकीत बेंजो पथक, ढोल पथक, पारंपरिक वाद्यांचा गजर, जल्लोषमय वातावरण आणि भक्तीचा उत्साह पाहायला मिळाला. ‘‘गणपती बाप्पा मोरया’’च्या जयघोषात तरुणाईसह आबालवृद्धांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. आनंद, उत्साह आणि परंपरेचे भान राखत विसर्जन सोहळा शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

गेल्या १५ वर्षांत ‘‘रेवदंड्याचा राजा’’ हा केवळ गणेशोत्सव न राहता रेवदंडा गावाच्या एकात्मतेचे प्रतीक बनला आहे. समाजातील मतभेद, राजकीय भिन्नता आणि वैचारिक अंतर बाजूला ठेवून सर्वांना एकत्र आणण्याचे काम या उत्सवाने सातत्याने केले आहे. त्यामुळेच हा उत्सव रेवदंडेकरांच्या भावविश्वाचा अविभाज्य भाग बनला आहे. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व नागरिकांचे, वर्गणीदारांचे, मंडळांचे, ज्येष्ठांचे, महिला भगिनींचे, युवकांचे आणि उत्सवात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष योगदान देणाऱ्या प्रत्येकाचे निलेश खोत यांनी मंडळाच्या वतीने मनःपूर्वक आभार मानले.

## निवडक

### देखाव्यातून मराठी कर्तृत्वाचा इतिहास

**खरोशी :** पेण तालुक्यातील बोरी येथील हनुमान क्रीडा मंडळाने साकारलेला यंदाचा साखरचौथ गणपतीच्या देखाव्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. लेखक, साहित्यिक, कलाकार, गायक यांच्यासह विविध क्षेत्रांतील मराठी कर्तृत्वाची मांडणी करताना ऐतिहासिक संदर्भ आणि वर्तमानातील सामाजिक परिस्थितीवरही व्यंगातून भाष्य करण्यात आले आहे. ३४ वर्षांची उत्सव परंपरा आणि तीन पिढ्यांची एकजूट हे या मंडळाचे वैशिष्ट्य ठरले आहे. सजावट विनीत तांडेल व आशिष नाईक, तर मूर्ती सूरज पाटील व चैतन्य म्हात्रे यांनी साकारली आहे. मराठी माणसाची प्रगती, सांस्कृतिक ओळख, सामाजिक योगदान आणि देशाच्या राजकारणातील ऐतिहासिक स्थान अधोरेखित करणारा तसेच इतिहास, कर्तृत्व आणि वर्तमानातील सामाजिक परिस्थिती यांचा सुरेख मेळ साधणारा हा देखावा नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे.





● (छायाचित्र : महेश पवार)

### सायबर क्राईमवर जनजागृती

**नागोठणे :** नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, सपोनि रविंद्र पारखे यांनी साखरचौथ गणेशोत्सवाच्या निमित्ताने नागोठण्यात विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना मंगळवारी भेटी देऊन साखरचौथ गणरायाचे दर्शन घेतले. याच अनुषंगाने मंगळवारी रात्री वरवठणे गावातील गणेश आळी येथील गणेशोत्सव मंडळाच्या साखरचौथ गणपती बाप्पाचे दर्शन घेऊन सपोनि रविंद्र पारखे यांनी उपस्थित ग्रामस्थ, तरुण व महिला वर्गाला सायबर क्राईमपासून सावध राहण्याचे आवाहन आपल्या बहुमोल मार्गदर्शनातून केले. यावेळी मार्गदर्शन करताना सपोनि रविंद्र पारखे म्हणाले की, आज प्रत्येक नागरिक आपल्या मौल्यवान वस्तू व पैसे सुरक्षित ठेवण्याबाबत जागरूक झाला आहे. नागरिक आपले पैसे व दागिने बँकेत ठेवत असल्याने घरफोडी करून चोरी करण्याचा प्रयत्न केला तरी चोरांच्या हाती फारसे काही लागत नाही. त्यामुळे चोरट्यांनीही आता आपली कार्यपद्धती बदलली असून, मोबाईलच्या माध्यमातून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्याचा मार्ग स्वीकारला आहे. ते पुढे म्हणाले की, सायबर क्राईम म्हणजे मोबाईल किंवा इंटरनेटच्या माध्यमातून नागरिकांची आर्थिक फसवणूक करून पैसे लुटणे होय. त्यामुळे नागरिकांनी अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. कोणत्याही अनोळखी व्यक्तीला आपला ओटीपी, एटीएम पिन, बँक खात्याची माहिती, पासवर्ड किंवा इतर गोपनीय माहिती देऊ नये, तसेच काही चुकीचे वाटल्यास १९३० व ११२ या क्रमांकावर तक्रार करावी असे आवाहनही सपोनि रविंद्र पारखे यांनी केले.



## ‘एफ.एस. लाईनचा राजा’ला निरोप

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

कोलाड एफ.एस लाईनचा सखारचौथच्या गणपती बाप्पाचा विसर्जन सोहळा बुधवार, दि.३० सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात, आनंदात व भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी गणरायाला निरोप देण्यासाठी सर्व ग्रामस्थ व व्यापारी वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. तसेच, महिला, युवक आणि लहान मुलांनी देखील मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विसर्जन मिरवणुकीदरम्यान ढोल-ताशांचा गजर, गणपती बाप्पाच्या जयघोषाने आणि भक्तिमय वातावरणाने परिसर दुमदुमून गेला. यावेळी गणपती बाप्पाला निरोप देताना अनेक भाविकांच्या चेहऱ्यावर आनंदासोबतच भावुकतेचे वातावरण दिसून आले.

## उरणमध्ये समाजपयोगी उपक्रमांवर भर

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

गणेश चतुर्थी पासून सुरु झालेल्या गणेशोत्सवाची सांगता अनंत चतुर्दशीला झाली. त्यानंतर मंगळवारी (दि.२९) आलेल्या अंगारकी संकष्टी चतुर्थीला रायगड जिल्ह्यात साखर चौथीच्या म्हणजेच गौरा गणपतीचे आगमन झाले. साधारणतः दीड दिवस, अडीच दिवस, पाच दिवस तर काही ठिकाणी अकरा दिवसांच्या मुक्कामानंतर या बाप्पाला निरोप दिला जाणार आहे. उरण तालुक्यातील चिरनेर येथील विघ्नहर्ता सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, अंकुश परदेशी मित्र मंडळ, श्रीराम सांस्कृतिक कला क्रीडा मंडळ, आदर्श गणेश मित्र मंडळ, कुंभारआळी गणेश मित्र मंडळ, श्री महागणपती मित्र मंडळ, गावदेवी गणेश मित्र मंडळ, गोरोबाकाका मित्र मंडळ, नवतरुण गणेश मंडळ तसेच अन्य सार्वजनिक गणेशोत्सवांच्या माध्यमातून हा साखर चौथीचा गणेशोत्सव चिरनेर गावात साजरा केला गेला. यावेळी गणेशोत्सवापुरते धार्मिक कार्यक्रम न ठेवता मंडळांकडून वर्षभर विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबविले गेले. या सामाजिक उपक्रमांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याची माहिती कार्यकर्त्यांनी दिली. यंदा अंकुश परदेशी मित्र मंडळाच्यावतीने अष्टविनायक अष्टविनायकातील मोरगावच्या मोरेश्वराच्या रूपात शाडू मातीची प्रतिकृती मंडळाने साकारली असून, मोरगावच्या मंदिराचा देखावाही हुबेहूब साकारला आहे.



## साखरचौथ गणपती भाविकांचे आकर्षण

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील मजगांव आगरआळी येथे सप्तरंगी मित्र मंडळातर्फे साखरचौथ गणपतीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी मंडळातर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. सोमवारी गणपतीचे आगमन झाले. दुसऱ्या दिवशी मंगळवार दि.२९ सप्टेंबर रोजी रोजी सकाळी श्री मुर्तीची विधिवत पूजा अर्चा करून प्राण प्रतिष्ठापना व आरती करण्यात आली. त्यानंतर संपुर्ण दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर बुधवारी दि. ३० सायंकाळी ४.०० वाजता श्रींची उत्तर पूजा झाल्यानंतर गावातून वाजत गाजत मिरवणूक काढून उत्सवाची सांगता करण्यात आली.



## बाळसईच्या राजाला निरोप



**। सुकेळी । प्रतिनिधी ।**

नागोठणे जवळच असलेल्या बाळसई येथील साखरचौथच्या बाळसईच्या राजाला बुधवारी सायंकाळी वाजत-गाजत भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला. यावर्षीचे बाळसई गावातील साखरचौथच्या गणपती बाप्पाचे १३वे वर्ष होते. मंगळवारी दि.२९ सप्टेंबर रोजी सर्व बाळसई ग्रामस्थांच्या उपस्थितीत गणपती बाप्पाचे आगमन व प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्याचप्रमाणे सायंकाळी ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ बाळसई यांचा हरिपाठ झाल्यानंतर लहान मुलांसाठी खेळ व महिलांसाठी पैठणीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर बुधवार दि.३० सप्टेंबर रोजी सायंकाळी बाळसईच्या राजाची फटाक्यांच्या आतषबाजीत व डीजेच्या ताजरवर नाचत भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर बाळसईच्या राजाचे येथील अंबा नदी घाटावर विसर्जन करण्यात आले.

## जलाशयात विधीवत विसर्जन

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

साखर चौथीनिमित्त प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या गणरायाला पाली शहर व परिसरात गुरुवारी भक्तिमय वातावरणात भावपूर्ण निरोप देण्यात आला. ‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’च्या जयघोषात भाविकांनी आपल्या लाडक्या बाप्पाचे जलाशयात विधीवत विसर्जन केले. यावेळी पारंपरिक वाद्यांचा गजर आणि गणरायाच्या जयघोषाने संपूर्ण पाली शहर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेले.

यंदाचे साखर चौथीच्या गणपतीचे विसर्जन डीजेमुक्त पद्धतीने पार पडले. ध्वनिप्रदूषण टाळत भाविकांनी ढोल-ताशे, पारंपरिक वाद्ये आणि भक्तिगीतांच्या साथीने गणरायाच्या विसर्जन मिरवणुका काढल्या. पारंपरिक वाद्यांच्या तालावर निघालेल्या या मिरवणुकांमुळे गणेशोत्सवातील भक्तीमय आणि पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडले. दरम्यान, गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांच्या मार्गदर्शनाखाली पाली पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. विसर्जन घाट, प्रमुख मार्ग तसेच मिरवणुकीच्या मार्गावर पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. विसर्जन मिरवणुका शांततेत पार पडाव्यात आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेण्यात आली.



● (छायाचित्र : गौसखान पठाण)

## ‘बाजारपेठ राजा’चे विसर्जन



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड बाजारपेठ राजाची मंगळवारी विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर गुरूवारी गणपतीचे थाटामाटात विसर्जन करण्यात आले. यावेळी फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांचा गजर आणि डीजेवरील गणपतीच्या गाण्यांच्या तालावर तरुण-तरुणींनी ठेका धरत विसर्जन मिरवणुकीत उत्साहाने सहभाग घेतला. विसर्जन मिरवणुकीदरम्यान बाजारपेठ परिसरात गणेशभक्तांची मोठी गर्दी झाली होती. फटाक्यांच्या आतषबाजीने आणि आकर्षक रोषणाईने परिसर उजळून निघाला. डीजेवरील भक्तिगीतांच्या तालावर नृत्य करत बाप्पाला निरोप दिला. मिरवणुकीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मुरूड पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी पोलीस मकरंद पाटील यांच्या सह चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलिसांच्या देखरेखीखाली विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडली.

## उत्सवातून वाचन संस्कृतीचा जागर

**। खांदेश्वर । प्रतिनिधी ।**

गौरा गणपती उत्सवानिमित्त नवीन पनवेलमधील पोदी परिसरातील सिद्धिविनायक मंडळाने यंदा भक्तीबरोबरच वाचन संस्कृतीचा संदेश देणारा अनोखा देखावा साकारला. महाराष्ट्रातील ‘पुस्तकांचे गाव’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भिलारच्या धर्तीवर मंडळाने पुस्तकांचा देखावा उभारला असून, हा उपक्रम नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे.

मोबाइल आणि डिजिटल माध्यमांचा वाढता वापर यामुळे विशेषतः मुलांमध्ये वाचनाची सवय कमी होत असल्याचे चित्र आहे. ही बाब लक्षात घेऊन सिद्धिविनायक मंडळाने गणरायाच्या हातात पुस्तक देत वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. देखाव्यामध्ये इतिहास, समाजसुधारक, थोर विचारवंत, महापुरुष तसेच विविध ज्ञानवर्धक विषयांवरील पुस्तके ठेवण्यात आली आहेत.



**‘वाचाल तर वाचाल’**

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता त्यातून सामाजिक आणि शैक्षणिक संदेश समाजापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांची विचार करण्याची क्षमता वाढावी आणि ज्ञानाची गोडी लागावी, हा मंडळाचा प्रयत्न आहे. ‘वाचाल तर वाचाल’ या संदेशातून प्रत्येकाने दररोज काही वेळ वाचनासाठी द्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. गौरा गणपती उत्सवाच्या माध्यमातून ज्ञान आणि भक्तीचा संगम घडविणाऱ्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.

**रायवाडीकरांनी जपली १५ वर्षांची परंपरा | शिस्तबद्ध नियोजनाची सर्वत्र चर्चा**

## ‘रायवाडीचा राजा’ला भावूपर्ण निरोप

**संतोष राऊळ**
**। अलिबाग ।**

अलिबाग तालुक्यातील आक्षी येथील रायवाडी गावात श्री गणेश मित्र मंडळाच्यावतीने मोठ्या उत्साहाने साखरचौथ गणेशोत्सव साजरा करण्यात आला. मंगळवार, दि.२९ सप्टेंबर रोजी विराजमान झालेल्या ‘रायवाडीचा राजा’ला बुधवार, दि.३० सप्टेंबर रोजी भावपूर्ण निरोप देण्यात आला. यंदा या गणेशोत्सवाचे १५वे वर्ष सरले असून, आजही या मंडळाच्या शिस्तबद्ध नियोजनाचे सर्वत्र कौतूक होत आहे.

रायवाडी गावात गेल्या १५ वर्षांपासून श्री गणेश मित्र मंडळातर्फे साखरचौथ गणेशोत्सव साजरा केला जातो. या मंडळाची स्थापना २०१२ साली काही मोजक्या तरूणांनी केली. या मंडळाचे पहिले वर्ष खडतर होते. त्यावेळी मंडळातील बहुतांश तरूण हे शाळा-कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते. तसेच, वेळही कमी असल्यामुळे मिळालेल्या तुटपूंज्या लोकवर्गणितून हा उत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर मंडळातील युवकांच्या परिश्रमातून यंदा १५ व्या वर्षी या साखरचौथ गणेशोत्सवाला भव्य रूप आले. यंदा मंगळवारी संकष्ट चतुर्दशीला सकाळी गणरायांचे थाटात आगमन करण्यात आले. त्यांनतर विधिवत पुजा संपन्न झाल्यावर गणेश भक्तांनी ‘रायवाडीचा राजा’चे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली. त्यानंतर सायंकाळच्या सुमारास भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यानंतर रात्री बाप्पाची आरती झाल्यानंतर महिला व लहानमुलांसाठी विविध खेळांचे आयाजेन करण्यात आले होते.



दुसऱ्या दिवशी म्हणजे बुधवारी दुपारच्या सुमारास ‘रायावाडीचा राजा’ची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीत अलिबाग तालुक्यातील परहुरपाडा येथील विघ्नहर्ता बिट्स बँजो पथक विशेष आकर्षण ठरले. यावेळी विशेषतः महिला वर्गामध्ये मोठा उत्साह दिसून आला. ही विसर्जन मिरवणूक रात्री उशीरा नागाव येथील भिमेश्वर तलावाजवळ पोहोचली. त्यानंतर ‘रायवाडीचा राजा’ची मनोभावे आरती करून भावपूर्ण निरोप देण्यात आला.

दरम्यान, मिरवणूक निघाल्यापासून ते बाप्पाच्या मूर्तीचे विसर्जन होईपर्यंत कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. साखरचौथच्या पहिल्या गणेशोत्सवापासून ते १५व्या उत्सवापर्यंत श्री गणेश मित्र मंडळातील कार्यकर्त्यांनी शिस्तबद्ध नियोजनाची परंपरा कायम राखली. तसेच, बाप्पाच्या मूर्तीचे विसर्जनही योग्य पद्धतीने करण्यात आले. त्यामुळे त्यांच्या या नियोजनाची सर्वत्र चर्चा सुरू आहे.

## गणेशोत्सव साजरा



**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील ग्रामीण भागात साखरचौथ गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अंगारकीच्या दिवशी मोठ्या भक्तीभावाने या गणरायाची स्थापना करून यथोचित पूजाविधी व आरती करण्यात आली. तर संपूर्ण दिवसभरात व रात्रौ उशिरापर्यंत विविध प्रकारचे धार्मिक तथा अध्यात्मिक व सामाजिक उपक्रम संपन्न करण्यात आले. यामध्ये सर्वसाधारणपणे गणेशाचे पूजन, महिलांसाठी हळदीकुंकू, हरिपाठ, प्रवचन व व्याख्यान तसेच विविध प्रकारचे मनोरंजक कार्यक्रम, जागर भजन इत्यादी कार्यक्रमांची रेलचेल दिसून आली. तर, दुसऱ्यादिवशी बुधवारी विसर्जन मिरवणुकीच्या दिवशी विविध वाद्ये वाजवून तसेच फटाक्यांची आतषबाजी करून गणरायाचे रात्री उशिरापर्यंत भक्तीभावाने विसर्जन करण्यात आले.






## राशीभविष्य

- **मेष :** श्री शक्तीदेवीची उपासना करावी. कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. कामं मनासारखी होतील.
- **वृषभ :** विद्यार्थ्यांना स्पर्धामध्ये यश मिळेल. नव्या योजना मार्गी लागतील. आर्थिक अडचणीतून मार्ग निघेल.
- **मिथुन :** अपेक्षित कामं मनासारखी होतील. उपजत कला-गुणांचा गौरव होईल. जनसंपर्क वाढता राहील.
- **कर्क :** आर्थिक कामं मनासारखी होतील. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. महत्त्वाची कामं मार्गी लागतील.
- **सिंह :** उपजत कला-गुणांचा विकास होईल, सरकारी कामं मनासारखी होतील, नव्या ओळखी वाढतील.
- **कन्या :** उत्साहानं कामं यशस्वी होतील. गृहसजावटीच्या व्यवसायात प्रगती होईल. नव्या संधी लाभतील.
- **तूळ :** अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या कामांना गती प्राप्त होईल. उपजत कला-गुणांचा गौरव होईल.
- **वृश्चिक :** कार्यक्षेत्रात उत्साह, धडाडी वाढेल. नव्या विचारांना चालना मिळेल. प्रशासन सेवेत अधिकार वाढतील.
- **धनु :** नव्या विचारांना चालना मिळणार आहे. गुरूकृपेनं सर्व मनासारखं घडत जाईल. नव्या संधी लाभतील.
- **मकर :** कार्यक्षेत्रात समाधानकारक प्रगती होईल. गुंतवणूक विचारानं करावी. समस्यांबाबत समाधान लाभेल.
- **कुंभ :** हाती घेतलेली कामं मनासारखी होतील. अडचणीतून मार्ग निघेल. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी.
- **मीन :** आर्थिक व्यवहारात लाभ होईल. व्यवसायात नवे बदल हितकर ठरतील. प्रवास लाभदायक ठरेल.

स्टाईल स्टेटमेंट

## ट्रेंडी क्युलॉट्स

जीन्स, पलाझो, लेगिंग्ज असे बॉटम्स आपण नेहमीच घालत असतो. पण यंदा क्युलॉट्स हा प्रकार ट्राय करता येईल. क्युलॉट्स आरामदायी आणि स्टायलिश दिसतात. कॅज्युअल आणि फॉर्मल अशा दोन्ही प्रसंगांमध्ये तुम्ही क्लुलॉट्स कॅरी करू शकता. क्युलॉट्सवर विविध प्रकारचे टॉप्स शोभून दिसतात. यावर क्रॉप टॉप, शर्ट, टी शर्ट, कुर्ता, टँक टॉप, लाँग ट्युनिक असं बरंच काही कॅरी करता येईल. फ्लोरल किंवा स्ट्राईपवाल्या क्युलॉट्सवर प्लेन शर्ट किंवा टॉप घाला. हाय वेस्ट क्लुलॉट्सवर क्रॉप टॉप शोभून दिसतो. उंच महिला वाईड बॉटमवाल्या गडद रंगाच्या क्युलॉट्स कॅरी करू शकतात. प्लेटेड क्युलॉट्सही मिळतात. त्यावर कॉलरवाला शर्ट घालता येईल. यामुळे तुम्हाला फॉर्मल लूक मिळू शकतो. विविध प्रसंगांसाठी क्युलॉट्ससोबत वेगवेगळी कॉम्बिनेशन्स करता येतील. क्युलॉट्ससोबत छानशा ॲक्सेसरीज कॅरी करता येतील. क्युलॉट्स आणि कुर्त्यांवर स्टेटमेंट नेकलेस घाला. तसंच बारीक फॉर्मल बेल्ट किंवा नक्षीकाम केलेला बेल्टही वापरता येईल. यावर अँकलेट्सही घालता येतील. क्युलॉट्सवर साजेशी पादत्राणं घाला.

## २ ऑक्टोबर

दिनविशेष

**महात्मा गांधी जयंती, लालबहादूर शस्त्री जयंती, स्वातंत्र्य दिन : गिनी**

**१९०४ :** भारतीय पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचा जन्म.
**१९७१ :** संगीतकार आणि गायक कौशल इनामदार यांचा जन्म
**१९७५ :** तमिळनाडूचे मुख्यमंत्री कुमारस्वामी कामराज यांचे निधन.
**१९९० :** चीनचे अपहृत विमान उतरवताना झालेल्या अपघातात १३२ ठार.
**२०१४ :** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्वच्छ भारत मोहिमेस प्रारंभ केला.

नॉलेज

## प्लास्टिकमुक्त पृथ्वीसाठी...

दोस्तांनो, प्लास्टिकमुळे होणाऱ्या दुष्परिणामांची तुम्हाला माहिती आहे. प्लास्टिकचं विघटन होत नाही हेही तुम्ही जाणता. एकदाच वापरल्या जाणाऱ्या म्हणजे सिंगल यूज प्लास्टिकमुळे प्रदूषणात मोठी भर पडते. प्लास्टिकच्या पिशव्या, ग्लास, शीतपेयांच्या बाटल्या, स्ट्रॉ यासारख्या वस्तूंची गणना सिंगल यूज प्लास्टिकमध्ये होते. या वस्तू आपण एकदाच वापरतो आणि टाकून देतो. म्हणूनच हळूहळू सिंगल युज प्लास्टिकचा वापर कमी करत त्यावर पूर्णपणे बंदी घालण्याची योजना आखली जात आहे. या योजनेअंतर्गत २०२२ पर्यंत देशात सिंगल यूज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे.

म्हणूनच मित्रमैत्रिणींनो तुम्हीही प्लास्टिकचा वापर कमी करायला हवा. प्लास्टिकच्या पिशव्या वापरणं बंद करायला हवं. फक्त पिशव्याच नव्हे तर तुमच्या शालेय साहित्यातल्या बऱ्याच वस्तूही प्लास्टिकच्या असतात.

(क्रमश:)

आरोग्यमंत्र

## सहजसोपे व्यायामप्रकार

शरीरस्वास्थ्य जपण्यासाठी नियमित व्यायाम गरजेचा असतो. व्यायामाने शरीरयंत्रणा योग्य पद्धतीने सुरू रहाते आणि आरोग्याशी संबंधित अनेक संभाव्य धोके दूर राहतात. मात्र पावसाळ्यात व्यायामात खंड पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण हे कारण देऊन व्यायाम टाळू नये. पावसाळ्यात घरच्या घरी व्यायाम करता येईल. घरच्या घरी करण्यासारखे असेच काही सहजसोपे व्यायामप्रकार पाहू या.



* जमिनीवर झोपून पिलाटेस हा व्यायामप्रकार करता येईल. यामुळे संपूर्ण शरीराचा व्यायाम होतो. * दोरीच्या उड्या हा सुद्धा उत्तम व्यायामप्रकार आहे. दोरीच्या उड्या मारताना खूप मजा येते. * स्पॉट जॉगिंग हा सुद्धा व्यायामाचा अत्यंत साधा आणि सोपा प्रकार. तुम्ही घरच्या घरी जॉगिंग करू शकता. * सकाळी उठल्यावर पलंगावर बसून शरीर ताणण्याचे व्यायाम करता येतील. हात आणि पाय ताणल्यामुळे शरीर लवचिक होईल. * घरच्या घरी योगासनं करता येतील. * शीर्षासन हासुद्धा चांगला व्यायाम आहे. यामुळे रक्ताभिसरणाची प्रक्रिया सुधारते. * नृत्यामुळे शरीरातल्या कॅलरी जाळल्या जातात. त्यामुळे वेळ मिळाला की नृत्याचा आनंद लुटा. * घरच्या घरी पुश अप्स करा. पुश अप्समुळे छाती, पोट, मनगट, मांड्या, पाय या अवयवांना व्यायाम घडतो. * मेडिसीन बॉल विकत घ्या. या बॉलच्या आधाराने विविध व्यायामप्रकार करता येतील.

## पंचांग

**शुक्रवार, २ ऑक्टोबर २०२६**
**(गांधी/लालबहादूर शास्त्री जयंती)**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, भाद्रपद कृ. ६, चंद्रराशी : वृषभ, नक्षत्र : मृगशीर्ष, योग : व्यतिपात, सूर्योदय ६.३२, सूर्यास्त ६.२४

## फॉरवर्ड्स

**कमियाँ ढूँढ़ने में क़ोई दिक़्क़त नहीं हैं साहब...**

**बस लोग़ शुरुवात ख़ुद से करें...!**

## भटकंती

राजस्थानमध्ये गेल्यावर जयपूर, उदयपूर, जैसलमेर, जोधपूर अशा शहरांची सैर केली जाते. मात्र या राज्यात सुंदर आणि नयनरम्य अशी बरीच ठिकाणं आहेत. त्यापैकी एक ठिकाण म्हणजे बूंदी. बूंदी शहराच्या सभोवताली अरवली पर्वतारांगा आहेत. या पर्वतारांगांच्या मधोमध वसलेलं बुंदी आपल्याला आकर्षित करतं. राजस्थानातली बरीचशी शहरं किल्ले आणि महालांसाठी प्रसिद्ध आहेत. पण बूंदी खास चित्रकलेसाठी ओळखलं जातं. इथल्या चित्रकलेला खूप प्राचीन इतिहास आहे. कलेची आवड असणाऱ्यांना इथे सुंदर अशा चित्रकृती बघता येतील. (क्रमश:)

## सूत्रसंचालक व्हायचंय?

करिअरवाटा

सध्या मनोरंजन विश्व विस्तारलं आहे. कार्यक्रमांची संख्या वाढत आहे त्याचप्रमाणे निर्माते आणि वाहिन्यांची टीम सादरीकरणात वैविध्य आणण्याच्या प्रयत्नात आहेत. यातूनच छोट्या पडद्यावर कारकिर्दीच्या नवनवीन संधी उपलब्ध होत आहेत. सध्या उत्तम सूत्रसंचालकांना चांगली मागणी आहे. या मंडळींची कमाईही प्रचंड असते. अर्थात सूत्रसंचालक म्हणून काम



करण्यासाठी काही कौशल्यांची गरज असते. त्यांचं सामान्य ज्ञानही उत्तम असावं लागतं. हे ज्ञान मिळवण्याची प्रक्रिया सतत सुरू असते. टीव्हीवरील कार्यक्रमाचं निवेदन करणं, सामाजिक- सार्वजनिक कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करणं, वृत्तनिवेदन करणं, वृत्तविषयक चर्चेचं संचालन करणं, विविध क्रीडा सामन्यांचं समालोचन करणं आदी जबाबदाऱ्या पार पाडताना अँकरला याचा उपयोग होतो. रटाळ पद्धतीने निवेदन करण्यापेक्षा ते अधिक मनोरंजक किंवा उद्बोधक कसं होईल याला महत्त्व असतं. हे प्रशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था आहेत. टीव्ही जर्नालिझम अँन्ड अँकरिंग या विषयातला पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमही उपलब्ध आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन, नवी दिल्ली या संस्थेतही अँकरिंगचं प्रशिक्षण दिलं जातं. इच्छुकांनी त्याचा लाभ घ्यावा.

## खेचाखेची

### काकू नको म्हणू

'गणपती कसा दिला हा?'

'७०० रुपयांना'

'कमी करा की, ६०० रुपयांना द्या.'

'ओ काकू, मीच ६५० रुपयांना आणला आहे.'

'७५० घे, पण काकू नको म्हणू.'

## वेगळं काही

बँकेत बचत खातं उघडल्यानंतर आपल्याला एटीएम कार्ड मिळतं. पण मध्यंतरी ब्रिटनमधल्या 'द रॉयल मिंट' या कंपनीने सोन्याचं एटीएम कम डेबिट कार्ड तयार केलं होतं. हे जगातलं पहिलंच सोन्याचं एटीएम कार्ड ठरलं. १८ कॅरेट सोन्यापासून ते बनवण्यात आलं. हे एटीएम कार्ड घेण्यासाठी ग्राहकांना थोडीथोडकी नाही तर भलीथोरली रक्कम मोजावी लागली. वापरकर्त्याचं नाव आणि स्वाक्षरी या कार्डवर असेल. हे कार्ड घेण्यासाठी १८,७५० युरो एवढी किंमत मोजावी लागली. हे कार्ड काही मोजक्या श्रीमंत ग्राहकांसाठी तयार करण्यात आलं . 'रॅरिस' असं या कार्डचं नाव आहे. हे कार्ड खरेदी करण्याआधी विशेष खातं उघडणं बंधनकारक करण्यात आलं.

## काम होईल झटपट

स्मार्ट टिप्स

तयार होताना येणाऱ्या छोट्या-मोठ्या समस्यांवर वैतागून नव्हे, तर काही टिप्स अवलंबून उपाय शोधणं चांगलं. याविषयी...



* एखादा पेहराव घालायला काढल्यानंतर चुरगळलेला निघाला, तर खूप वैताग येतो. बराच काळ तसाच ठेवल्यानं इस्त्री केलेला पेहरावही चुरगळून जातो. इस्त्री करायला वेळ नसतो. अशा वेळी फक्त दोन मिनिटांमध्ये चुरगळलेला ड्रेस इस्त्री केल्यासारखा दिसू शकतो. तुम्ही ब्लो ड्रायरचा वापर करून कपड्यांच्या सुरकुत्या घालवू शकता. ब्लो ड्रायर लांब धरून चुरगळलेल्या भागावरून फिरवा. टॉवेलनेही सुरकुत्या घालवता येतील. चुरगळलेलं कापड टेबलवर पसरवून त्यावर ओला टॉवेल ठेवा. वरून दाब द्या. यामुळे सुरकुत्या निघून जातील. * काजळ संपलं असेल, तर तुम्ही घरच्या घरी नैसर्गिक काजळ तयार करू शकता. यासाठी चार- पाच बदाम, कोरफडीचा गर, खोबरेल तेल, भांडं असं साहित्य घ्या. बदाम काळपट होईपर्यंत गॅसवर ठेवा आणि थंड झाल्यावर वाटून घ्या. पाणी घालून पेस्ट बनवा. यात कोरफडीचा गर आणि खोबरेल तेल घाला. तुमचं काजळ तयार आहे. हे काळज हवाबंद डब्यात भरून ठेवा.

## सुडोकू १५५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ३ | | | | ७ | |
| | | | | | २ | | ५ | ९ |
| ४ | ९ | ८ | | | | ३ | | |
| | | | २ | | | | | ७ |
| | | ५ | | ६ | | ९ | | |
| २ | | | | | ४ | | | |
| | | ७ | | | | २ | १ | ६ |
| ३ | ५ | | ७ | | | | | |
| | ६ | | | | ९ | | | |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १५४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ६ | ३ | ८ | ७ | ४ | २ | १ | ५ |
| १ | ८ | ७ | २ | ६ | ५ | ३ | ४ | ९ |
| ४ | २ | ५ | ९ | ३ | १ | ८ | ७ | ६ |
| ३ | ४ | ८ | ७ | १ | ९ | ६ | ५ | २ |
| ५ | ९ | २ | ६ | ४ | ३ | १ | ८ | ७ |
| ७ | १ | ६ | ५ | ८ | २ | ४ | ९ | ३ |
| ६ | ७ | १ | ३ | ५ | ८ | ९ | २ | ४ |
| २ | ३ | ४ | १ | ९ | ७ | ५ | ६ | ८ |
| ८ | ५ | ९ | ४ | २ | ६ | ७ | ३ | १ |

## शब्दकोडे क्रमांक १५५



**आडवे शब्द :-**
१) मोरपिसाचा मुकुट घालून पहाटे देवाची गाणी म्हणत फिरणारा
५) पेशवाईतील आनंदीबाईंचा गारद्यांना दिलेले निरोप
९) त्रासलेला
१०) लक्ष्मी नारायण
१३) वर्तन
१४) तात्काळ मिळणारी लोकप्रियता
१५) दैव
१७) बेचव
१८) काड्यांची केरसुणी
१९) भांडणे लावणे
२०) प्रयत्न
२२) ढग, लवकर
२३) दृष्टी
२६) बारा वर्षाचा काळ
२८) गाय
३०) तलवारीचे म्यान
३१) नवरदेव
३३) (संधी) घालविणे, पिटाळणे
३५) शाळेतील बसण्याचे साधन
३६) मधुमक्षिका
३७) पत्र
३८) एक जुणी लेखणी
३९) जिम्मेदार
४०) एक चतुर्थांश
४१) त्वचारोग
४२) मुकुटमणी
४५) ठार मारण्यास योग्य
४७) वाहणारी हवा
४८) मर्कट
५१) जावळा
५२) समोरासमोरची छोटी लढाई
५४) निर्धन मनुष्य
५७) लेखणी
५९) अग्नी
६१) गवताचे पान
६३) भ्रंश, भ्रम
६४) कोवळ्या दुधाचा पदार्थ
६६) प्रभात
६७) एक जंगली फूल
६९) पावसाची झड
७०) मोठा भाऊ गल्लीतील गुंड
७१) धावणे
७२) घरगुती थंड पेय

**उभे शब्द :-**
१) चावट
२) मंद, आळसावलेला
३) पाटाचा जोडीदार
४) फिकीर
५) नवरा
६) आईची बहीण
७) धपाटा
८) धनी
११) धागे विणून कापड तयार करण्याचे साधन
१२) आभाराचा एक शब्द
१३) हलकी थप्पड
१४) वाकबगार पटाईत
१५) नूतन
१६) ऐतिहासिक गद्य लिखाण
१७) जोराचा शिडकावा, हबका
१९) गर्द लाल रंग
२१) किंचित कडू चव
२४) चकचकीत
२५) छोटी घागर
२७) गीत
२९) एकरूप तल्लिन,
३२) सपाटून
३४) कमीशन, व्यापारी बट्टा
३५) वडिलांचे मराठी संबोधन
३९) हिशेबाची एक बाजू
४०) चरण
४१) पोथीचे परत परत वाचन
४३) दागदागिने
४४) जनन
४५) यज्ञ
४६) ढग
४८) धनी
४९) अन्न घशाशी येणे, ढवळणे
५०) मोठे पसरट खोलगट ताट
५३) विळखा
५५) एक शेंगभाजी
५६) अनुत्तीर्ण
५८) मुरगळणे
६०) व्यायाम
६२) गुरांचा घोळका
६४) व्यय
६५) बारा महिन्याचा काळ
६६) सदोदित
६८) द्रवपदार्थ
६९) हिंदीत सर्व

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | स्त | मा | न | | अ | न | भि | ज्ञ | | बै | | भा | च | र |
| र | व | र | व | णे | | म | ळ | | वा | ल | थ | र | | ण |
| ण्य | | हा | ल | | म | ना | | पा | या | | डी | | आं | बा |
| वा | र | ण | | क | म | ला | क | र | | सा | स | रा | | व |
| स | वा | | पा | | | घ | ळ | | क | म | ला | | क | रा |
| | ना | ग | डा | उ | घ | डा | | पा | ट | | व | स्ता | द | |
| आ | | ज | व | | न | भ | स्क | ल | | गा | णे | | र | स्सी |
| क | च | रा | | वा | | र | | व | ल | य | | यं | दा | |
| स | रा | | मु | | पा | ते | रा | | व | रा | त | | न | वा |
| | च | र्म | का | र | | ल | वा | द | | न | ड | गी | | स |
| स | र | | द | स | रा | | चा | | हो | | का | र | खा | ना |
| म | | स | म | र | | आ | रं | भ | | मा | फ | | ज | |
| र | य | त | | शी | र | | क | | स | व | ड | | रा | त |
| स | | त | ह | त | | स | हो | द | र | | की | र | | या |
| ता | टी | | त्या | | प | ड | णे | | डा | का | | सा | क्ष | र |

## निवडक

### कोहली आयसीसी वनडे क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर

**नवी दिल्ली :** विराट कोहली आयसीसीच्या वनडे फलंदाजांच्या क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या



पहिल्या वनडेत नाबाद १३९ धावांची खेळी केल्याचा त्याला फायदा झाला.कोहलीचे आता ७९६ रेटिंग पॉइंट्स आहेत. तो अव्वल स्थानावर असलेल्या भारतीय कर्णधार शुभमन गिलपेक्षा केवळ २० पॉइंट्स मागे आहे. क्रमवारी दर आठवड्याला बुधवारी जाहीर केली जाते. २७ सप्टेंबर रोजी तिरुवनंतपुरम येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या वनडेत कोहलीने ८८ चेंडूंवर नाबाद १३९ धावा केल्या होत्या. हे त्याच्या वनडे कारकिर्दीतील ५५वे शतक होते. याच खेळीदरम्यान त्याने वनडे क्रिकेटमध्ये १५ हजार धावाही पूर्ण केल्या. सचिन तेंडुलकरनंतर हा टप्पा गाठणारा तो दुसरा फलंदाज ठरला. भारताने हा सामना ८ विकेट्सने जिंकला. फलंदाजांच्या क्रमवारीतील टॉप-४ मध्ये ३ भारतीय फलंदाजांचा समावेश आहे. शुभमन गिलनेही वेस्ट इंडिजविरुद्ध शतक झळकावले होते.

### भारताच्या हॉकी संघाचा पाकिस्तानवर रोमांचक विजय

**नागोया :** भारतीय पुरुष हॉकी संघाने २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान निश्चित केलं आहे. पुरुषांच्या हॉकीच्या पहिल्या उपांत्य सामन्यात भारताने पाकिस्तानचा पराभव केला. दोन्ही संघांमधील या रोमांचक सामन्याचा निकाल



अगदी शेवटच्या मिनिटाला लागला. त्या शेवटच्या मिनिटात भारताने पाकिस्तानवर विजय मिळवून अंतिम फेरीतील आपलं स्थान पक्कं केलं; भारताने हा सामना ४-३ अशा फरकाने जिंकला. पाकिस्तानविरुद्धच्या उपांत्य सामन्यात भारताने दमदार सुरुवात करत पहिल्याच सत्रात २-० अशी आघाडी घेतली. दुसऱ्या सत्रात ही आघाडी ३-० अशी वाढवल्याने टीम इंडियाची स्थिती अधिकच मजबूत झाली. मात्र, सामन्याच्या उर्वरित भागात भारताचा आक्रमक खेळ कमी आणि पाकिस्तानचा प्रति-आक्रमण अधिक दिसून आलं, काही वेळातच पाकिस्तानने ३-० ची पिछाडी भरून काढत धावसंख्या ३-३ अशी बरोबरीत आणली. पाकिस्तानने सामन्यात पुनरागमन केल्यामुळे सामना बरोबरीत आल्याने उत्कंठा शिगेला पोहोचली आणि दोन्ही संघ वर्चस्व मिळवण्यासाठी धडपडू लागले. दरम्यान, सामन्याच्या शेवटच्या मिनिटाला भारताच्या अभिषेक नैन याने गोल करत भारताचा विजय निश्चित केला.

### रोनाल्डोने अचानक सोडला पोर्तुगालचा कॅम्प!

**नवीदिल्ली :** दिग्गज फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोने पोर्तुगालच्या राष्ट्रीय संघाचा कॅम्प सोडला आहे. रोनाल्डो पोर्तुगालच्या कोपनहेगनमधील प्रशिक्षण शिबिरातून अचानक बाहेर पडला.



नेशन्स लीगपूर्वी रोनाल्डोने घेतलेल्या या निर्णयामुळे पोर्तुगालच्या फुटबॉलमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. पोर्तुगीज फुटबॉल महासंघाचे अध्यक्ष पेद्रो प्रोएन्सा यांच्याशी चर्चा केल्यानंतर आपण राष्ट्रीय संघाचा कॅम्प सोडण्याचा निर्णय घेतल्याचं रोनाल्डोने सोशल मीडियावर जाहीर केलं. योग्य वेळ आल्यावर या संपूर्ण प्रकरणामागचं सत्य आणि कॅम्प सोडण्यामागचं कारण आपण स्वतः सांगू, असंही त्याने म्हटलं आहे. मात्र, रोनाल्डोच्या या निर्णयानंतर युरोपियन माध्यमांमध्ये या प्रकरणाबाबत वेगवेगळ्या बातम्यासमोर येऊ लागल्या आहेत. प्रशिक्षक जॉर्ज जीझस, रोनाल्डो आणि फुटबॉल महासंघाचे प्रमुख यांच्यात नेमकं काय घडलं, याबाबतची माहिती समोर येत आहे. या घटनेमुळे रोनाल्डोचं राष्ट्रीय संघातील स्थान आणि प्रशिक्षकांसोबतचं त्याचं नातं पुन्हा एकदा चर्चेत आलं आहे. रोनाल्डोने सोशल मीडियावर लिहिलं, राष्ट्रीय संघाच्या प्रशिक्षकाची पत्रकार परिषद आणि त्यानंतर पोर्तुगीज फुटबॉल महासंघाच्या अध्यक्षांशी झालेल्या चर्चेनंतर मी राष्ट्रीय संघाचा कॅम्प सोडण्याचा निर्णय घेतला. योग्य वेळी माझ्या या निर्णयामागची कारणं आणि संपूर्ण सत्य मी पोर्तुगालच्या जनतेसमोर सांगेन. या राष्ट्रीय संघासाठी मी नेहमीच समर्पित राहिलो आहे.



### कडाव येथे जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा संपन्न

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील रॉयल गार्डन मंगल कार्यालयामध्ये क्रीडा युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड अलिबाग यांच्या माध्यमातून रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष भगवान दामू धुळे यांच्या अध्यक्षतेखाली हुतात्मा हिराजी पाटील ज्युनियर कॉलेज कडाव यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. यावेळी कर्जत पंचायत समिती सभापती नमिता घारे, तहसीलदार धनंजय जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड, उपसभापती चित्रा ठाकरे, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती नारायण डामसे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते मारुती आडकर, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ रायगड जिल्हा परिषद सदस्य बाबुशेठ उर्फ मारुती घारे, हुतात्मा हिराजी पाटील ज्युनियर कॉलेज कडावच्या प्राचार्या मनीषा बैकर यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचा शुभारंभ झाला. सर्व विजेत्या कुस्तीपटू पैलवानांना रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष भगवान दामू धुळे यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते मेडल्स, प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

# इंडियाने काढला वेस्ट इंडिजचा ‘धूर’

■ शुभमनने ठोकले खणखणीत द्विशतक

■ रोहितच्या शतकाचा सिंहाचा वाटा

| गुवाहाटी | वृत्तसंस्था |

भारतीय क्रिकेट संघाचा युवा कर्णधार शुभमन गिलने वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात जागतिक क्रिकेटच्या इतिहासाला गवसणी घातली. वेस्ट इंडिजने दिलेल्या ४०६ धावांच्या विशाल आव्हानाचा पाठलाग करताना गिलने अवघ्या ११७ चेंडूंमध्ये आपले द्विशतक पूर्ण केले. १३३ चेंडूत २२३ धावांची वादळी खेळी करताना त्याने २६ चौकार आणि ०८ गगनचुंबी षटकार लगावले. त्यासोबतच भारतीय संघाने इतिहासातील धावांचा पाठलाग करताना सर्वात मोठ्या विजयाची नोंद केली आहे. भारताने या सामन्यात ८ विकेटने विजय मिळवत मालिका २-० ने खिशात घातली.



या ऐतिहासिक खेळीसह शुभमन गिलने इशान किशनचा १२६ चेंडूत द्विशतकाचा विक्रम मोडीत काढत जगातील सर्वात वेगवान द्विशतकवीर बनण्याचा मान मिळवला आहे. गिलचे हे एकदिवसीय कारकिर्दीतील दुसरे द्विशतक असून, हा पराक्रम करणारा तो रोहित शर्मानंतरचा केवळ दुसरा भारतीय फलंदाज ठरला आहे. त्याच्या या खेळीमुळे भारताने वेस्ट इंडिजविरुद्धचा सामना सहज जिंकला. याआधी सचिन तेंडुलकर, वीरेंद्र सेहवाग यांनाही शुभमन मागे टाकले असून जगातील पहिला फलंदाज ठरलाय.

वेस्ट इंडिज संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना ५० ओव्हरमध्ये ४०५-७ धावा केल्या होत्या. यामध्ये सलामीवीर जॉन कॅम्पबेलने अवघ्या ६५ चेंडूत १०१ धावांची स्फोटक खेळी केली. त्यानंतर कर्णधार शाय होप याने ९४ चेंडूत ८ चौकार आणि ३ षटकारांसह १०४ धावांची संयमी आणि तितकीच आक्रमक खेळी केली. अखेरीस अमीर जांगू याने वादळी फलंदाजी करत अवघ्या ७० चेंडूंमध्ये नाबाद ११४ धावा कुटल्या आणि वेस्ट इंडिजला पहिल्यांदाच ४०० धावांचा टप्पा करून दिला होता. या डोंगराएवढ्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय फलंदाजांची परीक्षा होती. मात्र शुभमन गिलची विक्रमी द्विशतकी आणि रोहित शर्माच्या शतकी खेळीच्या जोरावर भारताने ओव्हरमध्ये सामना जिंकवला.

रोहित शर्माने वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांवर सुरुवातीपासूनच प्रहार करत अवघ्या ७५ चेंडूत १० चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने १०१ धावांची झंझावाती शतकी खेळी केली होती. रोहितने दुसऱ्या टोकाला असलेल्या शुभमन गिलसोबत पहिल्या विकेटसाठी २५५ धावांची ऐतिहासिक सलामी दिली, जी वनडे क्रिकेटच्या इतिहासात वेस्ट इंडिजविरुद्ध कोणत्याही विकेटसाठी झालेली सर्वोच्च भागीदारी ठरली. रोहित बाद झाल्यानंतर मैदानावर आलेल्या कोहली २९ धावा करून आऊट झाला. या संपूर्ण डावाचा खरा महानायक शुभमन गिल ठरला, ज्याने मैदानावर चौफेर फटकेबाजी करत अवघ्या १२५ चेंडूंत २५ चौकार आणि ८ गगनचुंबी षटकारांसह नाबाद २२३ धावांचे महाद्विशतक ठोकले.

### रोहित शर्माच्या १२,००० धावा पूर्ण

या सामन्यामध्ये रोहित शर्मानेही १०१ धावांची खेळी करताना आपले ३५वे शतक पूर्ण केले. त्यासोबतच एकाच देशात २०० षटकार मारण्याचा विक्रम ही त्याने नावावर केला आहे. रोहितने १२,००० धावांचा टप्पा पूर्ण करताना वनडे क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावांच्या यादीत तो तिसऱ्या स्थानी पोहोचला आहे. पहिल्या सामन्यात मोठी खेळी करण्यात अपयशी ठरलेल्या रोहितने शतकी खेळी करत आपली ताकद दाखवून दिली.

## एशियन गेम्सच्या फायनलमध्ये भारताची धडक

■ श्रीलंका ४५ वर ऑल आऊट

| मुंबई | प्रतिनिधी |

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ सेमी फायनल सामन्यात भारताने १२४ धावांनी विजय मिळवला आहे. या विजयासह भारताने फायनलमध्ये प्रवेश मिळवला असून सुवर्णपदकासाठी भारत-पाक लढत होणार आहे. या सामन्यामध्ये भारताने पहिल्यांदा फलंदाजी करताना २० ओव्हरमध्ये १६९-७ धावा केल्या होत्या. यामध्ये ईशान किशन याने ४६ चेंडूत नाबाद ८० धावांची तुफानी खेळी केली. त्यासोबतच वैभव



सूर्यवंशीनेही ३८ धावांची खेळी करत महत्त्वाचे योगदान दिले होते. या धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या श्रीलंका संघाने भारतीय गोलंदाजांसमोर शरणागती पत्करली. अवघ्या ४५ धावांवर त्यांचा डाव आटोपला.

भारतीय संघ फलंदाजीला उतरल्यावर अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसनदोघेही ७ धावा करून परतले. त्यानंतरवैभव सूर्यवंशी याने त्याची ताकद पुन्हा एकदा जगाला दाखवून दिली. वैभवने ३८ धावांची खेळी करत पॉवर प्लेमध्ये भारताला दमदार सुरूवात करून देत लवकर गेलेल्या विकेटचा दबाव येऊ दिला नाही. कॅप्टन श्रेयस अय्यरही फसला, १३ धावा करून तो माघारी परतला. अक्षर पटेल ८ धावा, तिलक वर्मा २ धावा करून परतले.

## बर्लिन मॅरेथॉनमध्ये साताऱ्याच्या यश मुचंडीची दमदार कामगिरी

**सातारा :** बर्लिन येथे झालेल्या बीएमडब्ल्यू बर्लिन मॅरेथॉन या जागतिक दर्जाच्या मॅरेथॉन स्पर्धेत येथील यश मुचंडी याने तीन तास २८ मिनिटे ५७ सेकंदांत पूर्ण करून उज्वल यश मिळविले. बर्लिन मॅरेथॉन ही जगातील सर्वात प्रतिष्ठेच्या आणि वेगवान मॅरेथॉन स्पर्धांपैकी एक मानली जाते.

जागतिक मॅरेथॉन स्पर्धेच्या मालिकेत आता बर्लिनसह टोकियो, बॉस्टन, लंडन, शिकागो, न्यूयॉर्क, सिडनी आणि केपटाऊन अशा आठ जागतिक मॅरेथॉनचा समावेश आहे. बर्लिन पूर्ण केल्यानंतर उर्वरित सात जागतिक मॅरेथॉन मेजर्स पूर्ण करून देशाचे आणि साताऱ्याचे नाव जागतिक स्तरावर पोहोचवण्याचा यशचा उद्देश आहे. बर्लिनमध्ये स्पर्धेच्या दिवशी अतिशय थंड वातावरण, कमी तापमान आणि जोरदार वाऱ्याचा सामना करत यशने संपूर्ण ४२.१९५ किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला.



## ग्रीफिन्स जिमखाना संघ कुमार गटात विजेता

| ठाणे | प्रतिनिधी |

ग्रीफिन्स जिम. संघाने ठाणे जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणीच्या कुमार गटात विजेतेपद पटकाविले. ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशने विजय लव स्पोर्टस् च्या सहकार्याने या स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

कुमार गटाच्या अंतिम सामन्यात ग्रीफिन्स जिम. ने बास्को स्पोर्टस् चा प्रतिकार ४४-२६ असा सहज मोडून काढत पहिल्यांदा जेतेपदाला गवसणी घातली. सामन्याच्या सुरुवातीच्या झटापटीचे काही क्षण वगळता सामना नंतर एकतर्फी झाला. विश्रांतीला १८-१२ अशी ग्रीफिन्स संघाकडे आघाडी होती. विश्रांती नंतर ग्रीफिन्सच्या मनीष धनावडे, वेदान्त दयाळ यांनी आपला खेळ अधिक गतीमान करीत सामना १८ गुणांनी आपल्या बाजूने झुकविला. बास्कोच्या प्रणव शिरसाटला अन्य कोणत्याही खेळाडूची साथ न मिळाल्याने त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. उपांत्य सामन्यात बास्कोने मध्यंतरातील १३-१७ अशा पिछाडीवरून श्री मावळी मंडळाला २८-२६ असे पराभूत केले. तर ग्रीफिन्स जिम. ने लव लाईन स्पोर्टस्ला ३६-३३ असे नमवीत अंतिम फेरीत धडक दिली होती.

यातून ठाणे जिल्ह्याचे संघ निवडण्यात येऊन ते पालघर जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने वसई विरार महानगर पालिकेच्या सहकार्याने आयोजित करण्यात येणाऱ्या कुमार कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत ठाणे जिल्हा संघाचे प्रतिनिधीत्व करतील.

## इंडिया ‘अ’ विरुद्ध ऑस्ट्रेलिया ‘अ’ चे पुनरागमन

■ सॅम हार्परने केले शतक

■ नचिकेत आणि मुलानीला ३ बळी

| पुडुचेरी | प्रतिनिधी |

भारत अ विरुद्ध दुसऱ्या अनधिकृत कसोटीत ऑस्ट्रेलिया अ ने पुनरागमन केले आहे. पुडुचेरीमध्ये पहिल्या दिवशी ऑस्ट्रेलिया अ ने ७ गडी बाद २८२ धावा केल्या.नाणेफेक जिंकून फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघाने १०४ धावांवर ५ गडी गमावले होते, मात्र यष्टिरक्षक-फलंदाज सॅम हार्परने नाबाद १०१ धावांची खेळी करत संघाचा डाव सावरला. भारताच्या नचिकेत भुटे आणि शम्स मुलानी यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले.



ऑस्ट्रेलिया अ ने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, मात्र विदर्भाचा वेगवान गोलंदाज नचिकेत भुटे आणि मुंबईचा डावखुरा फिरकीपटू शम्स मुलानीने अवघ्या १६ धावांत ३ गडी बाद केले.त्यानंतर नॅथन मॅकस्विनी आणि जेसन सांघा यांनी चौथ्या गड्यासाठी ८१ धावांची भागीदारी केली. सांघा ४६ धावा करून मुलानीच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर मॅकस्विनीही ३४ धावांवर तंबूत परतला आणि ऑस्ट्रेलिया अ ची धावसंख्या १०४/५ झाली. १०४/५ अशी धावसंख्या असताना, हार्परने सूत्रे हाती घेतली. लियाम स्कॉटने ८२ चेंडूंमध्ये ३४ धावा आणि टॉड मर्फीने ९१ चेंडूंमध्ये ३३ धावा केल्या. त्यांच्या भागीदारीमुळे हार्परला खेळपट्टीवर टिकून राहता आले.हार्परने प्रथम लियाम स्कॉटसोबत सहाव्या विकेटसाठी ८४ धावा आणि नंतर टॉड मर्फीसोबत ८९ धावांची भागीदारी केली. दिवसाचा खेळ संपेपर्यंत, हार्परने १४६ चेंडूंमध्ये आपले सहावे प्रथम-श्रेणी शतक पूर्ण केले होते. त्याच्या या खेळीत ७ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश होता.

### खेळाडूंना खेळावी लागणार रणजी

**मुंबई :** न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेपूर्वी बीसीसीआय वरिष्ठ भारतीय खेळाडूंना देशांतर्गत लाल चेंडूचे क्रिकेट खेळण्यास सांगू शकते. खेळाडूंनी किमान एक प्रथमश्रेणी सामना खेळावा, अशी अपेक्षा आहे. खेळाडूंचा वर्कलोड आणि वैद्यकीय पथकाची मंजुरी यावर हा निर्णय घेतला जाईल. दीप आणि नितीश यांच्यावरही निवडकर्त्यांची नजर असेल.बुमराहचा वर्कलोड पाहता त्यांना रणजी ट्रॉफी किंवा इंडिया-एसाठी प्रथम श्रेणीचे सामने खेळण्याचा पर्याय देऊ शकते.

## सूर्यवंशी टाइम मॅगझिनच्या रायझिंग स्टार्समध्ये

| मुंबई | प्रतिनिधी |

वैभव सूर्यवंशीला टाइम मॅगझिनच्या १०० यादीत स्थान मिळाले आहे. ही जगातील उदयोन्मुख तारकांची वार्षिक यादी आहे. विविध क्षेत्रांत झपाट्याने ओळख निर्माण करणाऱ्या व्यक्तींचा यात समावेश केला जातो.१५ वर्षीय वैभव या यादीत समाविष्ट झालेला सर्वात कमी वयाचा सदस्य आहे. टाइमने त्याचा समावेश क्रीडा जगतातील झपाट्याने उदयास येणाऱ्या तारकांच्या, म्हणजेच रायझिंग स्टार्सच्या श्रेणीत केला आहे.

वैभव हा ७ खेळाडूंच्या



■ यादीत समाविष्ट सर्वात तरुण खेळाडू

[illegible] जुलैमध्ये इंग्लंडविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात पदार्पण केले. मँचेस्टरमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात तो भारताकडून खेळणारा सर्वात कमी वयाचा पुरुष क्रिकेटपटू ठरला. त्याने सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला.वैभवने आतापर्यंत ६ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. त्याच्या नावावर १९३ धावा आहेत. त्याची सर्वोच्च धावसंख्या ८१ धावा आहे.

वैभवने २०२४ मध्ये बिहारकडून रणजी ट्रॉफीमध्ये पदार्पण केले होते. त्यावेळी त्याचे वय १२ वर्षे होते. कमी वयात प्रथमश्रेणी क्रिकेट खेळणाऱ्या भारतीय खेळाडूंमध्ये त्याचा समावेश झाला.त्याच वर्षी राजस्थान रॉयल्सने त्याला आयपीएल लिलावात १ कोटी रुपयांना विकत घेतले.

तिरंदाजी स्पर्धेत केली शानदार कमाल | देशासह महाराष्ट्राची उंचावली मान

# प्रिथिका प्रदीपने जिंकले सुवर्ण पदक

| जपान | वृत्तसंस्था |

सध्या जपानमध्ये सुरू असलेल्या एशियन गेम्समध्ये भारताने शानदार कामगिरी करून दाखवली आहे. अनेक क्रीडा प्रकारांत भारताने पदके जिंकली आहेत. दरम्यान प्रिथिका प्रदीपने भारताच्या आणि महाराष्ट्राच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला आहे. प्रिथिका प्रदीप हिने तिरंदाजीमध्ये गोल्ड मेडल जिंकले आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.



भारतीय महिला कंपाऊंड तीरंदाजी संघातून खेळताना प्रिथिकाने आपल्या अचूक निशाणा साधत देशाला गोल्ड मेडल जिंकून दिले आहे. या दैदिप्यमान यशामुळे पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे. जपानमधील आयची-नागोया येथे पार पडलेल्या या स्पर्धेतील महिला कंपाऊंड तिरंदाजीच्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने सुरुवातीपासूनच उत्कृष्ट वर्चस्व राखल्याचे पाहायला मिळाले.

अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या अंतिम लढतीत भारतीय महिला संघाने बलाढ्य चीनच्या संघाला पराभवाचा धक्का दिला. प्रिथिका प्रदीप हिने मोक्याच्या क्षणी मारलेले अचूक वेध या विजयात निर्णायक ठरले. अंतिम फेरीतील सर्वोत्तम कामगिरीच्या जोरावर भारतीय संघाने गोल्ड मेडल जिंकले आहे. प्रिथिकाच्या या अभूतपूर्व यशामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील क्रीडाप्रेमींमध्ये, तसेच तिच्या निवासस्थानी आनंदाचे वातावरण पसरले आहे. तिच्या कुटुंबियांवर आणि प्रशिक्षकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. स्थानिक नागरिक आणि विविध क्रीडा संघटनांनी फटाक्यांची आतषबाजी व मिठाई वाटून या विजयाचा आनंदोत्सव साजरा केला.

प्रिथिका प्रदीपने गेल्या अनेक वर्षांपासून तीरंदाजी क्षेत्रात सातत्याने कठोर परिश्रम घेतले आहेत. स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवरील अनेक स्पर्धांमध्ये तिने आपल्या कौशल्याची छाप पाडली होती. आता आंतरराष्ट्रीय स्तरावरील आशियाई क्रीडा स्पर्धेत देशाचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकावल्याने तिच्या या मेहनतीचे चीज झाले आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तिला शुभेच्छा दिल्या जात आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)